CMYK


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

लातूर | गुरुवार, १२ जून २०२५ | वर्ष ३ रे अंक १०३ | पाने १२ | किंमत रु. ६/- | RNI No. MAHMAR/2023/86477 | Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com



## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री

मा.श्री.

# विजयसिंह मोहिते-पाटील

आपणांस वाढदिवसाच्या

**मन:पूर्वक शुभेच्छा !**

थेंबा थेंबात अमृत...

शिवामृत®

सर्व संचालक मंडळ, सभासद,
अधिकारी व कर्मचारी वर्ग

## शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ मर्या,

विजयनगर-अकलूज ता.माळशिरस जि.सोलापूर

Phone : 02185 - 222126/222566
Email: shivamrutakluj@gmail.com

सोलापूर, पुणे, नांदेड, लातूर, सातारा येथे सुपर स्टॉकिस्ट नेमणे आहेत.
इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

---

Shivratna Shikshan Sanstha

सर्व संचालक मंडळ, शिक्षक,
शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी

## शिवरत्न शिक्षण संस्था

शिवरत्न नॉलेज सिटी, शिवामृत रोड, शंकरनगर-अकलूज,
ता.माळशिरस जि.सोलापूर
Phone : 02185 224952 / 227552
Email:shivratnashikshansanstha@gmail.com

स्वामीराज ॲड्स 95037 73073

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# कोण म्हणते व्हीआयपी दर्शन बंद झाले?

## प्रत्यक्षात वेगळेच सुरु; बुधवारी मंत्र्यांच्या वाहनांचा ताफा थेट मंदिरापर्यंत, भाविकांची कुचंबणा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.११ जून-**

येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या कार्यकारी अधिकाऱ्याने मोठा गाजावाजा करुन व्हीआयपी दर्शनासाठी सर्वसामान्य मंदिर कर्मचाऱ्यांना जबाबदार धरुन असे दर्शन घडविणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यासंदर्भात किंवा कारवाई करण्याची तंबी देणारा अजब फतवा काढला. त्यामुळे आता व्हीआयपी दर्शनाला आळा बसेल असे वाटत असतानाच बुधवारी राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन आणि खारभूमी विकास मंत्री भरतशेठ गोगावले यांनी थेट विठ्ठल मंदिरापर्यंत आपल्या गाड्यांचा ताफा नेत आपले पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या लवाजम्यासह विठ्ठलाचे दर्शन घेतले. त्यामुळे कोण म्हणते, व्हीआयपी दर्शन बंद झाले ? असा उद्विग्न सवाल आता सर्वसामान्य वारकरी भाविकांमधूनच उपस्थित केला जाऊ लागला आहे.

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरीत दिवसेंदिवस गर्दी वाढू लागलेली आहे. गोरगरीब वारकरी आपली तहानभूक हरपुन दर्शन रांगेत तासनतास ताटकळत उभे राहून सावळ्या विठुरायाचे पदस्पर्श दर्शन घेत आहेत. पदस्पर्श दर्शन घेताना ज्या यातना वारकऱ्यांना सोसाव्या लागतात. त्या अतिशय असह्य अशा असतात. मात्र विठ्ठलाच्या प्रेमापोटी वारकरी सर्व सहन करीत तासनतास दर्शनाच्या प्रतिक्षेत दर्शन रांगेच्या मार्गावरील खड्डे, चिखल, दादऱ्यांवरील चढउतार सोसत दर्शनासाठी आतुर झालेले असतात. चार दिवसांपूर्वी याच दर्शन रांगेतील लोकांना कईक तास दर्शन रांगेत थांबुन देखील दर्शनास विलंब होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे दर्शन रांगेतील भाविकांनी मंदिर समितीच्या एकंदर कामकाजा विषयी नाराजी व्यक्त करीत मंदिर समिती विरोधात घोषणाबाजी केली. मंदिर समितीच्या कामजाबद्दल समाज माध्यमांवर राज्यभरातील भाविकांमधून याबाबत टोकाची टिका देखील करण्यात आली.

त्यामुळेच मंदिर प्रशासनाकडून दर्शन रांगेतील भाविकांना न्याय देण्यासाठी अजब आदेश (फतवा) काढीत मंदिर कर्मचाऱ्यांना व्हीआयपी किंवा घुसखोरी करीत दर्शनासाठी मंदिर समितीचे सह अध्यक्ष , सदस्य तसेच मंदिर समितीचे कार्यकारी आणि व्यवस्थापक यांच्या परवानगी शिवाय कोणासही सोडण्यास मज्जाव केला. दरम्यान हा आदेश काढून एक, दोन दिवस होतात तोच बुधवारी (ता.११) राज्याचे रोजगार हमी मंत्री भरतशेठ गोगावले हे पंढरपूर दौऱ्यावर आले. या दौऱ्यात त्यांनी विठ्ठल दर्शन देखील घेतले. यावेळी मंत्रीमहोदयांनी आपल्या गाड्यांचा ताफा थेट मंदिरा पर्यंत आणला. मंत्री महोदयां बरोबर त्यांच्या जीवाभावाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची देखील मोठी गर्दी होती.

दरम्यान सध्या आषाढी यात्रा तोंडावर आलेली आहे. संतांचे पालखी सोहळे काही दिवसांतच पंढरीकडे मार्गस्थ होणार आहेत. त्यामुळे प्रस्थानाला देहू, आळंदीकडे मार्गस्थ होण्यापूर्वी वारकरी भाविक पंढरीनगरीत येवून पंढरीनाथाचे दर्शन घेण्यासाठी गर्दी करीत आहेत. त्यामुळे ऐरव्हीच्या मानाने पंढरपूरात सध्या वारकऱ्यांची गर्दी होताना दिसत आहे. त्यामुळे यात्रेच्या तोंडावर तरी मंत्री महोदयांनी आपल्या गाड्यांचा ताफा छत्रपती शिवाजी महाराज चौकात ठेवून तेथून पायी चालत मंदिरात येवून दर्शन घ्यावे. या बरोबरच आपल्या सोबत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा कमीतकमी लवाजमा आणावा अशी कळकळीची भावना वारकरी भाविकांमधून आता व्यक्त होताना ऐकावयास मिळत आहे.



**पंढरपूर : येथील विठ्ठल मंदिराच्या थेट प्रवेशव्दारापर्यंत बुधवारी मंत्री महोदयांच्या गाड्यांचा ताफा नेण्यात आला होता. त्यामुळे मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांच्या भाऊगर्दीतून मंदिर परिसरात भाविकांना वाट काढणे देखील मुश्किल झाल्याचे दिसत होते.**

### पालकमंत्र्यांचा आदर्श घ्यायला पाहिजे

आषाढी यात्रेच्या पूर्वतयारीची पाहणी करण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे हे नुकतेच येथे येवुन गेले. त्यावेळी त्यांनी आपल्या समवेत असणाऱ्या गाड्यांचा ताफा छत्रपती शिवाजी महाराज चौकात थांबवून ते स्वत: मंदिरा पर्यंत पायी चालत आले होते. विठ्ठल दर्शना नंतर त्यांच्या पीए ने मंत्री महोदयांना परत जाण्यासाठी मंदिर पर्यंत गाड्यांचा ताफा बोलाविला. त्यामुळे परत जाताना गोरे यांना नाईलाजाने गाड्यातून जावे लागले. मात्र गाडीत बसण्या अगोदर पालकमंत्री गोरे यांनी या प्रकारा बद्दल आपल्या पीएला खडसावले ते म्हणाले, कशाला गाड्या बोलाविल्यात कारण आपण संत नामदेव पायरी, संत चोखामेळा यांच्या समाधीचे दर्शन घेऊन मंदिराला उजवे घालून चालत पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौकात गेलो असतो. त्यामुळे मंत्री, आमदार, खासदार आणि वरिष्ठ शासकीय अधिकारी या सारख्या व्हीआयपीने पालकमंत्री गोरे यांचा आदर्श घेतला पाहिजे अशी प्रतिक्रिया मंदिर परिसरातील नागरिकांतून व्यक्त होत आहे.

### सर्वांनीच काही पथ्ये पाळणे आवश्यक

मंत्री गोगावले हे अपवाद आहेत. ऐरव्ही जाऊद्यात किमान यात्रांच्या अगोदर काही दिवस आणि यात्रे नंतर काही दिवस सर्वच पक्षीय आमदार, खासदार तसेच मंत्री आणि विविध विभागाचे उच्चपदस्थ शासकीय अधिकारी यांनी देखील दर्शनासाठी येताना स्वत: काही पथ्ये पाळणे आवश्यक आहेत. जेणे करुन दर्शन रांगेतील दर्शनाच्या प्रतिक्षेत तासनतास तिष्ठत थांबलेल्या गोरगरीब, वृध्द तसेच महिला आणि लहानमुले यांना आपल्या दर्शन घेण्याच्या एकंदर कार्यपध्दतीमुळे त्रास होणार नाही या बाबत दक्षता घेतली पाहिजे.

### गृहराज्यमंत्र्यांच्या नातेवाईकांच्या दर्शनासाठी पोलिस अधिकारी आणि मंदिर प्रशासनामध्ये तु..तु..मै..मै..

मंत्री गोगावले यांचे विठ्ठल दर्शन झाल्यानंतर काही वेळातच राज्याच्या गृहराज्यमंत्र्यांचे अत्यंत जवळचे नातेवाईक (आप्तस्वकीय) बुधवारी विठ्ठलाच्या दर्शनासाठी मंदिरात आले. यावेळी मंदिर प्रशासनाने गृहराज्यमंत्र्यांच्या नातेवाईकांना त्वरीत दर्शन न देता काहीवेळ थांबवुन ठेवले. त्यामुळे अगदी सोलापूरातील उच्चपदस्थ पोलिस आधिकाऱ्यांकडून या प्रकाराबाबत पंढरपूरातील पोलिस आधिकाऱ्यांना फोनाफोनी सुरु झाली. शेवटी पंढरपूरातील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची मंदिर प्रशासनातील अधिकाऱ्यांशी अगदी मंदिराच्या व्हीआयपी गेटसमोरच त तु मै मै सुरु झाली. या तु तु मै मै मध्ये पंढरपूरातील पोलिस अधिकाऱ्यांकडून देखील विठ्ठल मंदिराशी संबंधित असणाऱ्या उच्चपदस्थ कुणालाही मंदिरात या पुढे सोडण्यात येणार नाही अशा भिष्म प्रतिज्ञा देखील विठ्ठलाच्या दारातच केल्या गेल्या. शेवटी काही वेळानंतर गृहराज्यमंत्र्यांच्या आप्तस्वकीयांना विठ्ठल दर्शन घडविण्यात आले आणि पोलिस अधिकारी आणि मंदिर प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या सुरु असलेल्या तू तू मै मै ला अखेर पूर्णविराम मिळाला.

---


## महत्त्वाचे...

### सराईत गुन्हेगारावर बार्शी टोळनाक्याजवळ जीवघेणा हल्ला

**पंढरपूर, दि.११ जून-**

जबरी चोरी, हाणामारी अशा गंभीर गुन्ह्यातील गुन्हेगारावर बुधवारी सकाळी सातच्या सुमारास बार्शी रस्त्यावरील भोगाव परिसरात चाकून जीवघेणा हल्ला झाला. यात गंभीर झाल्याने त्याच्यावर सोलापुरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. तसेच हल्ला करणाराही कुंभारी परिसरातील रुग्णालयात उपचार घेत असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. संदीप लक्ष्मण पाटील उर्फ भैय्या पाटील (रा. पत्रा तालीम) असे हल्ला झालेल्याचे नाव आहे. तर विनायक बोगा असे हल्ला करणा-याचे संशयिताचे नाव आहे. यातील संदीप पाटील हा एका हॉटेलात काम करतो. त्यानंतर तो तेथीलच एका लॉजमध्ये रात्री झोपण्यासाठी असतो अशी माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान बुधवारी सकाळच्या युमारास तो भोगाव हद्दीतील हॉटेल सुखसागर येथे थांबला होता. त्यावेळी त्याची विनायक बोगाबरोबर तक्रार झाली. या वादातून विनायक बोगा याने त्याच्याकडील चाकूने संदीपच्या पोटात भोसकले. यानंतर गंभीर जखमी झालेल्या संदीपला तातडीने शहरातील एका खासगी रुग्णालयात उपचारास दाखल करण्यात आले. संदीप पाटील हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरूध्द पोलिसात अनेक गंभीर गुन्ह्याची नोंद आहे. जबरी चोरी, हाणामारी यासारख्या गुन्हे करणारा आरोपी असल्याने त्याच्यावर सन २०१८ ते २०२२ या दरम्यान स्थानबध्दतेची तसेच तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे.दरम्यान या भांडणात विनायक बोगा हाही जखमी झाला असून त्याच्यावार कुंभारी परिसरातील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत पोलिसात गुन्हा दाखल झाले नसल्याची माहिती तालुका पोलिसांनी दिली. वेटरला शिवीगाळ केल्याच्या कारणातून हा प्रकार घडला असल्याची प्राथमिक माहिती समोर येत असली तरी नेमके कारण अद्याप समोरं आलेले नाही.

**बुधवार सकाळची घटना; हल्ला झालेला व हल्ला करणारा असे दोघे जखमी**



---

# कमी दरातील सोने पडले महाग

## पोलिसांनी बारा तासात आरोपीसह दीड लाख रुपये आणि मोटारसायकल केली जप्त

### करमाळ्यात सोन्याचा ड्रॉप उघड

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.११ जून-**

करमाळा तालुक्यातील निमगाव येथील सविता छगन शिंदे व छगन बिरक्या शिंदे यांनी सोन्याचा ड्रॉप घडवून आणला आहे. यातील सविता शिंदे या आरोपीने ज्ञानेश्वर टेकाळे यांच्याशी मांढरदेवी या धार्मिक स्थळी ओळख निर्माण केली. आमच्याकडे अर्धा किलो सोने आहे. ते आम्ही आपणास कमी भावात विकत देतो असे सांगून करमाळा बस स्थानकावर बोलावले. चार महिन्यापूर्वीच्या ओळखीवर विश्वास ठेवून व कमी दरात सोने मिळेल या आशेने ज्ञानेश्वर शामराव टेकाळे व त्यांचा मित्र सतीश काळे यांनी ठरलेली रक्कम दीड लाख रु घेऊन आले.तेव्हा गावी चला तुम्हाला सोने देतो असे सांगून सविता शिंदे ,छगन शिंदे या आरोपींनी त्यांना पांडे गावाकडेच्या जंगलात नेले व तेथे दबा धरून बसलेला इतर सहकाऱ्यांच्या मदतीने ज्ञानेश्वर टेकाळे व सतीश शिंदे यांना बेदम मारहाण केली. चाकूचा धाक दाखवून रोख रक्कम व मोटारसायकल हस्तगत केली.

या गुन्ह्याची नोंद होताच करमाळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रणजित माने यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा पोलिस दलाची एक टीम तयार करून तात्काळ कारवाईसुरू केली. केवळ बारा तासात आरोपी छगन शिंदे, ज्ञानेशवर शिंदे, संतोष शिंदे यांना ताब्यात घेतले आहे.त्यांनी गुन्हयाची कबुली दिली आहे. या गुन्ह्याचा तपास रोहित शिंदे करत आहेत. सदरची कामगीरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि रणजीत माने, सपोनि रोहित शिंदे, सपोफौ विश्वास शिनगारे, पोहेकॉ नागेश नाईकनवरे, पोहेकॉ आप्पासाहेब लोहार, पोहेका अजित उबाळे, पोहेकॉ विलास भराटे, पोना मनिष पवार, पोकॉ योगेश येवले, पोकॉ मिलिंद दहिहांडे, पोकॉ अर्जुन गोसावी, पोकॉ अमोल रंदिल, पोकॉ रविराज गटकुळ, पोकॉ हरिदास निमगिरे, पोकॉ रमेश फुगे, मपोकॉ शितल पवार, पोकॉ धनाजी रामगुडे यांनी केली आहे.



### ड्रॉपचा प्रकार म्हणजे काय

काही विशिष्ट समाजाचे लोक इतर ठिकाणाच्या लोकांना विश्वासात घेवून ओळखी करून त्यांना आमच्याकडे स्वस्तात सोने आहे असे सांगतात. कमी बाजार भावात हे सोने आम्ही आपणास देतो असे सांगून काही खरे सोने दाखवून इतर सोने खरेदीसाठी दुस-या ठिकाणी बोलावून घेवून जातात. शेतात, फॉरेस्टमध्ये नेउन मारहाण करून चाकूचा धाक दाखवून सोने न देता फसवणुक करून मारहाण करून पैसे घेवून जातात. याला ड्रॉप असे म्हणतात. स्वस्त सोने मिळणे असा कोणताही प्रकार नसतो ते केवळ आमिष आहे. तरी सदरच्या अशा आमिषाला कोणीही बळी पडू नये तसेच असे काही प्रकार आढळल्यास पोलीस ठाणेशी संपर्क करावा.

---

# काँग्रेसचे भालके शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या वाटेवर

### मंत्री गोगावले यांची पदाधिकाऱ्यांसमवेत घेतली भेट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.११ जून -**

राज्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटात येण्यासाठी नेत्यांची संख्या वाढू लागली आहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेसचे नेते भगीरथ भालके यांनी बुधवारी रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्याबरोबर चर्चा केली; मात्र उपमुख्यमंत्री शिंदे यांनी अद्याप ग्रीन सिग्नल दिला नाही. यामुळे भालके यांना वेट अँड वॉच करावे लागणार आहे.काही दिवसापूर्वी सोलापूर जिल्ह्यातील काँग्रेसचे मातब्बर नेते व माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला तर दोन दिवसापूर्वी माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. यामुळे शिवसेना शिंदे गटात येण्यासाठी नेत्यांचे इनकमिंग सुरू झाले आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक डोळ्यासमोर ठेवून काँग्रेसचे नेते भगीरथ भालके यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत त्यांनी विश्रामगृह येथे रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्याबरोबर चर्चा केली. मात्र उपमुख्यमंत्री शिंदे यांनी भालके यांना वेट अँड वॉचची सूचना दिली असल्याचे समजते.




### पराभव झाल्यानंतर भालके होते गायब

भगीरथ भालके यांनी काँग्रेसकडून उमेदवारी मिळवून विधानसभेची निवडणूक लढविली होती. या निवडणूक प्रचारात त्यांनी पंढरपूर-मंगळवेढा येथील पदाधिकारी व कार्यकर्त तसेच नागरिकांचे प्रश्न सोडविले जातील, असे आश्वासन दिले होते. यामुळे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले. भालके यांना चांगली मते मिळाली; मात्र त्यांचा पराभव झाला. विधानसभा निवडणुकीनंतर गायब झालेले भालके सहा महिन्यानंतर प्रगट झाले असून त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाल प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

---

# तीन हजाराची लाच घेणारा तलाठी अँटी करप्शनच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.११ जून-**

खरेदी दस्तावरून सातबाराला नोंद घेण्यासाठी पाच हजाराची लाच घेणाऱ्या तलाटी अरुण मारुती शेवाळे याना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने धाड टाकून रंगेहात पकडले.

यातील तक्रारदार यांची वहिनी यांनी मौजे तळेवाड ता. अक्कलकोट जि. सोलापूर येथील गट क्रं. ५७/४/ब क्षेत्र १ हेक्टर शेतजमीन सह दुय्यम निबंधक, अक्कलकोट यांच्याकडील खरेदी दस्त क्रं. ३७१३/२०२५ दिनांक ०२/०६/२०२५ अन्वये रितसर खरेदी केली आहे. सदर खरेदी दस्तावरुन सात-बारा उता-यावर नोंद घेणेबाबत कळविले असता टलाटी अरुण मारुती शेवाळे यांनी पाच हजार रुपये लाचेची मागणी करुन तीन हजार रुपये तडजोड अंती लाच रक्कम स्वतः स्विकारली आहे. यावरुन वर नमुद लोकसेवक लोकसेवक अरुण मारुती शेवाळे वय ५३ वर्षे, पद- ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) नेम- तहसिल कार्यालय, अक्कलकोट वर्ग ३ यांचे विरुध्द अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ही कारवाई गणेश पिंगुवाले, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, सोलापूर पोलीस अंमलदार एएसआय एस. व्ही. कोळी पोना संतोष नरोटे पोकॉ गजानन किणगी व चालक पोह राहुल गायकवाड सर्व नेमणुक लाचलुचपत प्रतिबंध विभाग सोलापूर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

---

# पुणे विभागीय बोर्डाचा गलथान कारभार चव्हाट्यावर

### पुनर्मूल्यांकनामध्ये सुदर्शन उंबरे व तनुजा चोपडे 100 टक्के गुणांसह अव्वल

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ११ जून-**

दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेमध्ये महात्मा फुले विद्यालय टेंभुर्णी या विद्यालयाने परंपरेनुसार आपल्या निकालामध्ये बाजी मारलेली आहे. विद्यालयाचा सुदर्शन तानाजी उंबरे हा ९९.६० टक्के गुण घेऊन माढा तालुक्यात सर्वप्रथम आला होता, परंतु बोर्डाच्या काही पेपर तपासणारांकडून या विद्यार्थ्याचे काही विषयांचे गुण मुद्दाम हून कमी करण्यात आले होते. ज्यावेळेस बोर्डाकडे या विद्यार्थ्यांच्या पेपरची फोटोकॉपी मागवण्यात आली व त्यानंतर यामध्ये तपासणारांकडून खूप चुका झालेल्या आहेत, असे निदर्शनास आले. याबाबत गुण वाढ करण्यासाठी बोर्डाकडे प्रस्ताव दाखल केला. त्यानंतर त्या विद्यार्थ्याचे काही विषयांचे गुण वाढवून, त्या विद्यार्थ्याला १०० टक्के गुण मिळाले आहेत. तसेच समृद्धी सज्जन इंदलकर या विद्यार्थिनीला देखील ९९.४० टक्के गुण बोर्डाकडून देण्यात आले होते. हिच्या देखील पेपरमध्ये बोर्डाच्या तपासणाऱ्यांकडून गुण कमी देण्यात आले होते. हिचे देखील गुण पुनर्मूल्यांकननंतर ९९.८० टक्के झालेले आहेत. त्यामुळे ती माढा तालुक्यामध्ये दुसरी व मुलींमध्ये माढा तालुक्यात सर्वप्रथम आली. तसेच विद्यालयाच्या इकरा इरफान रास्तापुरे व यश बापू बागवाले या दोघांनी ९९.२० टक्के गुण मिळवून माढा तालुक्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे.

विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागलेला असून यामध्ये ९९ टक्केच्या पुढे ६ विद्यार्थी आहेत, तसेच ९५ टक्केच्या पुढे १९ विद्यार्थी आहेत व ९० टक्क्याच्या पुढे ४५ विद्यार्थी आहेत. गणित विषयांमध्ये सुदर्शन तानाजी उंबरे , कोमल जोतीराम पाटील व गजानन खंडू क्षिरसागर या तीन विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवलेले आहेत. तसेच मल्टी स्किल या टेक्निकल विषयांमध्ये तब्बल ५४ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवलेले आहेत. समाजशास्त्र विषयात समृद्धी सज्जन इंदलकर हिने १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नारायण भानवसे, माध्यमिकचे मुख्याध्यापक विजय यादव, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक शोएब बागवान, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक पालक संघ, बस विभाग यांनी अभिनंदन केले. दरवर्षी टेंभुर्णी केंद्रात व माढा तालुक्यात व परिसरात पहिले तीन क्रमांक याच विद्यालयाचे असतात, याची परंपरा आता देखील कायम राखली गेली आहे. इयत्ता दहावीला शिकवणारे शिक्षक नारायण भानवसे, विजय यादव, शरद सातव, विनोद जाधव, आनंद घळके, सचिन खडके, गगन गोडसे, योगेश शिंदे, सोहम व्यवहारे, संध्याराणी देशमुख या सर्वांचे अभिनंदन करण्यात आले. राज्यात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत सुद्धा मूल्यमापन योग्य होत नसेल तर सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या बाबतीत बोर्डाकडून काय होत असेल? याबद्दल सर्व विद्यार्थी व पालकांकडून पुणे विभागीय बोर्डाबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. बोर्डातील पेपर तपासणारे अधिकारी हे प्रामाणिक व विद्यार्थ्यांच्या कष्टाची जाणीव असणारे असावेत अशी विद्यार्थ्यांनी इच्छा व्यक्त केली.

> ज्यादिवशी निकाल जाहीर झाला त्यावेळेस जर माझा पेपर व्यवस्थित व पारदर्शक तपासला असता तर मला त्याच वेळेस १०० टक्के गुण मिळाले असते व महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वप्रथम येण्याचा मान मला त्यावेळेसच मिळाला असता. परंतु मला खात्री होती की, माझे कोणत्याही विषयांमध्ये गुण कमी होणार नाहीत, म्हणून मी माझे पेपर पुन्हा चेक करायला लावले.
>
> **- सुदर्शन उंबरे, टेंभूर्णी**

---

# पुनर्मूल्यांकनामध्ये सांगोला विद्यामंदिरची तनुजा चोपडे राज्यात प्रथम

### समृद्धी भोसले, अपूर्वा पाटील राज्य गुणवत्ता यादीत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.११ जून-**

दहावी बोर्ड परीक्षेमध्ये सांगोला विद्यामंदिर प्रशालेच्या विद्यार्थिनींनी पुनर्मूल्यांकनामध्ये राज्य गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवत उत्तुंग यश संपादन केले. पुनर्मूल्यांकनामध्ये तनुजा चोपडे १०० टक्के (राज्य-प्रथम) आणि समृद्धी भोसले ९९.६० टक्के (राज्य-तृतीय) या दोघींचे इतिहास-भूगोल या विषयांमध्ये तर अपूर्वा पाटील ९९.४० टक्के (राज्य-चतुर्थ) हिची विज्ञान विषयांमध्ये गुणवृद्धी झाली. या विद्यार्थ्यांना सुरेश मस्तुद, मकरंद अंकलगी, शुभांगी घोंगडे, बाळराजे सावंत, उन्मेश आटपाडीकर, शैलजा झपके, शिवाजी चौगुले, उज्वला कुंभार, सचिन बनकर, यतिराज सुरवसे, नागेश भोसले, नामदेव खंडागळे, सूर्यकांत कांबळे, श्रीकृष्ण वाघमारे, बंडू लेंडवे, उत्तम बेहेरे, अमोल रणदिवे, उमेश नष्टे, प्रशांत रायचुरे, अन्सार इनामदार, मुस्तफा नदाफ, गणेश हुंडेकरी, अनिता घोंगडे, प्रसाद कुलकर्णी, मारुती बोरकर, उत्तम सोनलकर, सिद्धेश्वर नवले, संतोष लवटे, सुभाष निंबाळकर या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, कार्यकारणी सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका. शाहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, मच्छिंद्र इंगोले, प्रदीप धुकटे यांनी अभिनंदन केले.







## विचारपुष्प



ज्याप्रमाणे अंतरात्मा सर्वव्यापी असून सुद्धा गुप्त असतो आणि दिसत नाही, त्याचप्रमाणे कुशल संघटक सर्वत्र असूनही कधीच समोर येत नाही. संघटकाने सर्व काही नि:स्पृहपणे करणे आवश्यक आहे, परंतु त्याला शोधल्यावर तो दिसू नये. अशा प्रकारे मागे राहून सर्वांना भक्तिमार्गी बनवले पाहिजे.

**- कुप्प्. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

## शिक्षकेतर कर्मचारी भरतीला स्थगिती

**नागपूर :** राज्य शासनाने सुधारित आकृतिबंध जाहीर करून खाजगी अनुदानित शाळांमध्ये लिपिक, पूर्णवेळ ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहायक ही शिक्षकेतर कर्मचारी भरती करण्याचे घोषित केले होते. मात्र, लागलीच पत्र काढून ही भरती स्थगित करण्याचे आदेश देण्यात आले. आता शिक्षकांप्रमाणे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरतीदेखील पोर्टलमार्फत होणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे इच्छुकांचे धाबे दणाणले आहे. २००५ नंतर खाजगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीला ब्रेक लागलेला होता. राज्य शासनाने २०१९ चा नवीन आकृतिबंध जाहीर झाल्यावर विविध लोकप्रतिनिधी व संघटनांनी न्यायालयीन तसेच अन्य मार्गाने लढाई लढून पदभरतीला सुरुवात केली होती.

# नदीजोड प्रकल्पातून सिंचन अनुशेष होईल दूर

- मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन
- १० लाख एकर शेतीला फायदा

**अकोला, ११ जून**

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून पश्चिम विदर्भातील सिंचनाचा अनुशेष दूर होईल व १० लाख एकर शेती क्षेत्र ओलिताखाली येईल, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले. ते अकोल्यात आज बुधवारी आयोजित विकास संवाद सभेत अकोला क्रिकेट क्लब मैदानावर विशाल सभेला संबोधित करताना बोलत होते.

अकोला जिल्ह्यातील २५८८ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे उद्घाटन व भूमिपूजनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुधवारी अकोला दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी विकास संवाद सभेलादेखील मार्गदर्शन केले. ते म्हणाले, भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द धरणाचे पाणी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून थेट बुलढाणा जिल्ह्यापर्यंत येणार आहे. या ४५० किलोमीटरच्या नदीजोड प्रकल्पाचा लाभ हा पश्चिम विदर्भातील अकोला, वाशीम, बुलढाणा, अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यांना होणार आहे. या प्रकल्पामुळे १० लाख एकर शेती ही ओलिताखाली येणार असून त्यासाठी सुमारे एक लाख कोटी खर्च केले जाणार आहेत.

भविष्यात पश्चिम विदर्भातून कोरडवाहूचे संपूर्ण क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. यामुळे उत्पादनात वाढ होऊन विदर्भातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. मंचावर भाजपाचे प्रदेश कार्याध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, पालकमंत्री आकाश फुंडकर, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार हरीश पिंपळे, भाजप जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, विजय अग्रवाल, महानगराध्यक्ष जयंत मसने, अनंतराव देशमुख आदी उपस्थित होते.



**ऑनलाईन सेवेसाठी 'मेटा'शी करार :** शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमात सुस्त पडलेले प्रशासन गतिमान झाले. आता आणखी १५० दिवसांचा कार्यक्रम राबविण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. यामध्ये सामान्य व्यक्तीला व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून अर्ज प्रक्रियेपासून शासनाच्या सर्व सेवा या ऑनलाईन मिळण्यासाठी 'मेटा'शी करार केला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलताना स्पष्ट केले.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्र लढणार

- चंद्रशेखर बावनकुळे

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. ११ जून-**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एखादा अपवाद वगळता महायुती एकत्रितपणे लढणार आहे, त्याबाबत आम्ही जिल्हास्तरावरील नेत्यांना सूचना दिल्या आहेत, अशी माहिती राज्याचे महसूलमंत्री व भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी दिली.



चंद्रशेखर बावनकुळे यांनी सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांची मुंबई सेंट्रल येथील निवासस्थानी भेट घेतली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, विधानसभा निवडणुकीत जनतेने महायुतीला मोठ्या मताधिक्याने निवडून दिले आहे, त्यामुळे येत्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीतही आम्ही महायुती म्हणूनच जनतेसमोर जाणार आहोत. अगदीच ज्या ठिकाणी उमेदवारीवरून संघर्ष उदभवेल, अशा एखाद्या मैत्रीपूर्ण लढत होईल, अशा जागा अपवादात्मकच असतील, असे सांगून ते म्हणाले की, निवडणुकींना एकत्रितपणे सामोरे जाण्याबाबतची सूचना आम्ही नेत्यांना व पदाधिकाऱ्यांना दिलेली आहे. त्यांच्याकडून स्थानिक स्तरावर कार्यकर्त्यांना त्याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. निवडणुकाबाबत संभ्रम असण्याचे कारण राहणार नाही.

**● युतीबाबत मुख्यमंत्री फडणवीस काय म्हणाले?**

भाजप महायुती म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढणार असल्याच्या बावनकुळेच्या विधानाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुजोरा दिला आहे. फडणवीस म्हणाले की, 'आमची भूमिका पक्की आहे, महायुती म्हणून आम्ही निवडणुका लढणार आहोत, मात्र एखाद्या ठिकाणी जिथे शक्य नाही तिथे मैत्रीपूर्ण लढत होईल.'

**● आगामी निवडणुका युतीत लढणार : प्रफुल्ल पटेल**

आगामी निवडणुकांमधील युतीबाबत बोलताना राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी म्हटले की, 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढणार आहोत, शक्य असेल तिथे युती केली जाईल. मात्र शक्य नसेल तिथे आपण आपल्या ताकदीवर लढू, यासाठी कार्यकर्त्यांना आतापासूनच तयारीला लागलं पाहिजे.'

**● निवडणुकीचे वेळापत्रक लवकरच जाहीर होणार**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा लवकरच होण्याची शक्यता आहे. ऑक्टोबर- नोव्हेंबरमध्ये या निवडणुका होण्याची शक्यता आहे. अलीकडेच राज्य सरकारने महापालिकांना प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता प्रशासनाकडूनही या निवडणुकांची तयारी केली जात आहे.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना कंत्राटी स्वरूपात पुन्हा संधी

**●आता ७० वर्षांपर्यंत करता येणार काम ●शासन निर्णय जारी**

**मुंबई, ११ जून**

शासकीय व निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना सेवा करारपद्धतीने पुन्हा शासनाच्या सेवेत काम करण्याची संधी मिळणार आहे. याबाबतचे एक परित्रक १० जून रोजी सामान्य प्रशासन विभागाने जारी केले आहे.

ही संधी किमान ६५ आणि कमाल ७० वर्षांपर्यंतच्या अधिकाऱ्यांना दिली जाणार असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. शासकीय व निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना सेवा करारपद्धतीने पुन्हा शासनाच्या सेवेत घेण्याबाबतचा निर्णय १७ डिसेंबर २०१६ रोजी शासनाने घेतला होता. यासंदर्भात एकूण चार वेळा विविध शासन निर्णय जारी करण्यात आले होते. हे सर्व अधिक्रमित करून आता नवे परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. सदर नियुक्ती करीत असताना पारदर्शक प्रक्रिया राबविण्याचा स्पष्ट उल्लेख परिपत्रकात करण्यात आला आहे. शिवाय आस्थापनेवरील एकूण मंजूर पदसंख्येच्या १० टक्के अधिकाऱ्यांना नियुक्ती देता येणार आहे.

सुरुवातीला करार एका वर्षासाठी केला जाणार असून, नंतर त्याला मुदवाढ देता येणार आहे. मात्र, हा कालावधी ३ वर्षांपेक्षा अधिक असणार नाही. दिली जाणारी मुदतवाढ किमान ६५ वर्षांपर्यंत किंवा काही विशेष परिस्थितीमध्ये कमाल ७० वर्षांपर्यंत देता येणार आहे. या नियुक्तीवेळी सेवानिवृत्त झाल्या दिवशीचे मूळ वेतन दिले जाणार आहे. सोबत १६,३८८ रुपये महागाई भत्ता दिला जाणार असून, निवास, प्रवास आणि दूरध्वनी भत्त्यापोटी १६,१५० रुपये दिले जाणार आहे. यासर्वांची बेरीज ही ८०,७५० एवढी असली पाहिजे. यापेक्षा जास्त मोबदला दिला जाणार नसल्याचे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा

**उच्च न्यायालयात मराठा आरक्षणावर सुनावणी**

**मुंबई, ११ जून-**

कोणताही स्थगिती आदेश नव्याने दिला नसल्याने मागील वर्षाप्रमाणेच यंदाही मराठा आरक्षण लागू करून शैक्षणिक प्रवेश सुरू राहतील व ते मराठा आरक्षण याचिकांच्या अंतिम आदेशाच्या अधीन राहतील, असे मुंबई उच्च न्यायालयाने सुनावणीत स्पष्ट केले.

४ जुलैपर्यंत मराठा आरक्षणाच्या विरोधी आणि समर्थनार्थ बाजू मांडणाऱ्या वकिलांना लेखी युक्तिवाद दाखल करण्याचा निर्देश न्यायालयाने दिला. राज्यातील मराठा आरक्षणाच्या कायदेशीर वैधतेवर मुंबई उच्च न्यायालयात बुधवारपासून नव्या खंडपीठासमोर सुनावणीला सुरुवात झाली. याआधी हे प्रकरण मुख्य न्यायाधीश देवेंद्र उपाध्याय प्रमुख असलेल्या खंडपीठासमोर सुरू होते. मात्र, त्यांची अन्य न्यायालयात बदली झाल्यामुळे आता न्या. रवींद्र घुगे, न्या. निजामुद्दीन जमादार आणि न्या. संदीप मारणे यांच्या विशेष खंडपीठासमोर या याचिकांची नव्याने सुनावणी झाली.







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# अंकुराचे होता रोप, होई रोपट्याचे झाड...

वेद-पुराणांमधील किंवा संत-साहित्यातील ज्ञान हे केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक स्वरूपाचा ऐवज असल्याचा समज आजही आहे. खरे तर वेद-पुराणे, श्रीमद्भगवद्गीता, रामायण, महाभारतादी पौराणिक ग्रंथांत तसेच संतांच्या उपदेशांत लौकिक व पारलौकिक जीवनातील अनेक गोष्टींचे अर्थ उलगडून दाखविलेले आहेत. त्यातलाच एक भाग आहे निसर्ग आणि मानवी जीवन यांच्यातील संबंधांचा! मत्स्य पुराणात वृक्षांचे महत्त्व सांगणारा एक श्लोक आहेः

**"दशकूपसमा वापी, दशवापीसमो ह्रदः।**
**दशह्रदसमो पुत्रो, दशपुत्रसमो द्रुमः॥"**

याचा अर्थ असा की, एक मोठा जलकुंड (जलाशय) दहा विहिरींच्या बरोबरीचा असतो. एक सरोवर अशा दहा जलकुंडांच्या बरोबरीचा असतो. दहा सरोवर एका पुत्राच्या बरोबरीचे असतात आणि एक वृक्ष दहा पुत्रांच्या बरोबरीचा असतो! निसर्गाला थेट मानवी जीवनाशी जोडणारे आणि वृक्षराजीचे महत्त्व सांगणारे असे दर्शन जगात कुठेही नाही. या दर्शनाचे भान ठेवून आपल्या संस्कृती-परंपरांच्या संवहनासह राष्ट्रनिर्माण कार्यातही निरंतर वाटा उचलत असलेल्या 'दैनिक तरुण भारत'चे यंदा शताब्दी वर्ष आणि आत्यंतिक निष्ठेने हे दैनिक चालवीत असलेल्या श्री नरकेसरी प्रकाशनाचा यंदा अमृत महोत्सव. हा सुवर्णयोग लक्षात घेऊन तरुण भारतने समाजाला काहीतरी द्यायचे ठरविले आणि त्यातून साकारली 'बीज अंकुरे अंकुरे' ही संकल्पना!

तरुण भारत हे विचारपत्र आहे. एक व्रत आहे. या पवित्र भारतभूमीवर शांतता, स्थैर्य नांदावे. सर्वांचे जीवन सुखी-समाधानी व्हावे आणि हे राष्ट्र परम वैभवाप्रत पोहोचावे, हे आमच्या प्रयत्नांचे ध्येय. ज्या राष्ट्रातील नागरिक सुखी, निरोगी असतात, तेच राष्ट्र सुखी व निरोगी मानले जाते. त्यामुळेच सजीव सृष्टीच्या निरामय जगण्याशी संबंधित 'बीज अंकुरे अंकुरे' उपक्रम आम्ही हाती घेतला आणि यशस्वीपणे राबविला. या वर्षात इतरही उपक्रम तरुण भारतने आखले आहेत आणि त्यातील बहुतांशी उपक्रमांचा संबंध पर्यावरण रक्षणाशी आहे. जगणे सुरक्षित असल्याशिवाय कोणत्याही चर्चेला अर्थ नसतो. पर्यावरण ऱ्हासामुळे आपण अनेक संकटे झेलत आहोत. या साऱ्या संकटांना मानवी हव्यास कारणीभूत आहे. पर्यावरणाचे नुकसान करून मानवानेच स्वतःचे जीवन धोक्यात घातले आणि त्यालाच ते सावरावे लागेल, हे सर्वांना कळावे म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करायची, असा निर्धार आम्ही केला आहे. या उपक्रमाला विशेष पृष्ठभूमी देखील आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प. पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी संघाच्या शताब्दी वर्षात समरसता, पर्यावरण, समाधानी कुटुंब, स्वदेशी आणि नागरी कर्तव्ये अशा पंचसूत्रींवर काम केले पाहिजे, असा विचार मांडला. त्यातील पर्यावरण हा विषय मध्यवर्ती ठेवून त्याची अन्य चार सूत्रांची सांगड या उपक्रमात घातली आहे. पर्यावरण रक्षणात प्रत्येकाची म्हणजे पर्यायाने कुटुंबांची सुरक्षितता व समाधान आहे. वृक्षलागवडीत कोणताही भेदाभेद नसतो. त्यामुळे त्याचा संबंध सामाजिक समरसतेशी आहे. पर्यावरण ऱ्हासावरील उपाय म्हणून वृक्षलागवड करायची असल्यामुळे तिचा संबंध नागरी कर्तव्याशी आहे. शिवाय, या उपक्रमात ज्यांचा प्रामुख्याने समावेश केलेला आहे, ते वृक्ष प्रामुख्याने स्वदेशी आहेत. ते सावली देणारे, उष्मा कमी करणारे, पक्ष्यांना अधिवास व खाद्य देणारे तसेच त्यांच्या प्रजननासाठी उपयुक्त आहेत. असा सूक्ष्म विचार करून तरुण भारतने 'बीज अंकुरे अंकुरे'साठी सहकार्याचे आवाहन केल्याबरोबर उदंड प्रतिसाद देत आमच्या सुजाण वाचकांनी चिंचोके, सुबाभूळ, बहावा, कवठ, शेवगा, सीताफळ, जंगली बदाम, बोर, बकुळ, बेल, चिचबिलाई, हेटी, आपटा अशा अनेक उपयुक्त झाडांच्या बिया आमच्या कार्यालयात आणून दिल्या. बाभूळ वृक्षाचा या उपक्रमात आम्ही जाणीवपूर्वक समावेश केला आहे. बाभळीची रोपे फारशी कुणी लावत नाहीत. वास्तवात बाभळीच्या झाडावर असंख्य पक्षी घरटी करतात. त्याचा पक्ष्यांच्या प्रजननाला उपयोग होतो. वड, बकुळ, बाभूळ ही वेगळ्या प्रकारची झाडे. त्यावर तीस-चाळीस प्रकारच्या पक्ष्यांचे जीवन अवलंबून असते. अशा विविध प्रकारच्या झाडांच्या बिया मिसळून कागदी पाकिटांमध्ये भरण्यात आल्या. या उपक्रमात आमच्या वाचकांनी, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांनी प्रचंड सहकार्य केले. रामदासपेठेतील कार्यालयात येऊन ही पाकिटे भरून दिली. यातले सगळे तरुण भारतचे वाचक होतेच असे नाही. सगळे पर्यावरणाप्रति जागरूक असलेले नागरिक आहेत हे नक्की! श्री दत्त जयंतीच्या मार्गशीर्ष पौर्णिमेपासून सुरू झालेल्या उपक्रमाचा प्रवास वटपौर्णिमेला पूर्णत्वास गेला. विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये छोट्या कागदी पाकिटांमधून मिश्र बियांचे वाटप करण्यात आले. याच मालिकेतील 'वसा वटपौर्णिमेचा' या उपक्रमांतर्गत वडाच्या रोपासोबत एकेक पाकीट देण्यात आले. या बियांची रोपे तयार करून आप्तांना भेट म्हणून देणे, परिसरात वृक्षारोपण करणे, उद्यानांत किंवा मंदिर परिसरात रुजविणे आम्हाला अपेक्षित आहे. संपूर्ण विदर्भात अशी हजारो पाकिटे वितरित केली गेली आहेत. त्यातील किमान एकेक प्रत्येकाच्या दारी, परसात किंवा कुठेही लागले आणि इतरांनी एकेक लावले तरी भविष्यात हजारो वृक्षांचे नवे आच्छादन आपल्या सर्वांसाठी उपलब्ध होईल. या पाकिटांत तुळस व झेंडूच्या बियाही दिल्या आहेत. कृष्ण जयंतीला त्या कुंडीत लावून त्यांचे संगोपन करावे, अशी अपेक्षा आहे. पावसाळ्यात लावलेल्या झेंडूच्या झाडांना दिवाळीत फुले येतील व ती तुळशी विवाहाला वापरता येतील, अशी त्यामागची कल्पना. विदर्भातील हजारो वाचकांच्या घरी बियाणांची पाकिटे पोहोचली आहेत. त्यांच्या वाटपासाठी तरुण भारतमधील सहकारी, गावोगावचे वार्ताहर, एजंट, वाचक आणि विशेषतः स्त्रीशक्ती मोठा हातभार लावत आहे. तरुण भारत परिवारातील जिल्हा प्रतिनिधींच्या अर्धांगिनींसह त्यांच्या कुटुंबीयांनीही यात आपुलकीने भाग घेतला. या साऱ्यांच्या योगदानाप्रति तरुण भारत परिवार कृतज्ञ आहे.

तुळशी विवाहाच्या महत्त्वाबद्दल थोडेसे सांगितले पाहिजे. आपल्याकडे पूर्वी तुळशी विवाहाला फार महत्त्व होते. धार्मिक महत्त्वाखेरीज तुळशी विवाहाचा सण हा पर्यावरण रक्षणाच्या संदर्भातील भारतीय विचारपरंपरेतील परमोच्च बिंदू. तुळशी असेल तेथे आजार येत नाहीत आणि प्राणवायूचे प्रमाण वाढते. जीवनदात्री वनस्पती म्हणून तुळशीचे महत्त्व पुरातन काळापासून भारतीयांना ठावूक आहे. त्याचे भान पुन्हा सर्वांना यावे, यासाठी आमचा प्रयत्न सुरू आहे. शताब्दीच्या उपक्रमाचा भाग म्हणून विदर्भातील प्रत्येक गावातल्या प्रत्येक गल्लीत किमान एक तुळशी विवाह थाटात साजरा व्हावा, अशी आमची अपेक्षा आहे. त्यासाठी तुळशी विवाहाच्या काळात सार्वजनिक उपक्रम आयोजित केले जातीलच. आम्ही मोठ्या प्रमाणावर तुळशीची रोपे तयार करीत आहोतच. आमच्या वाचकांनीही ती तयार करावीत आणि कृष्ण जयंतीला (१५ ऑगस्ट २०२५) ही रोपे घरच्या कुंडीत लावावीत. या रोपातून जे तुळशीचे झाड आकाराला येईल, ते वृंदावनात लावून त्याचा विवाह संपन्न व्हावा, असे आम्हाला वाटते. हा उपक्रम बिया लावण्यापुरता मर्यादित नाही. त्यामागे धर्म-संस्कृती-परंपरा आहेच; शिवाय भविष्यासाठीची दृष्टीही आहे. समाजाला काही तरी देण्याच्या आमच्या असोशीला तरुण भारतच्या वाचकांनी भक्कम आधार दिला. आम्हाला समाजाला द्यायचे आहे आणि वाचकांच्या माध्यमातून जे घडेल, ते देखील समाजालाच अर्पण करायचे आहे. विदर्भातील सामाजिक संस्थांनी आपापल्या स्तरावर अशा प्रकारचे उपक्रम राबवावेत, असे विनम्र आवाहन आम्ही करीत आहोत. ओल्या मातीच्या कुशीत बीजांचे अंकुरणे हे ईश्वरी आशीर्वादाचे मर्त्यलोकातील रूप असते, याचा प्रत्येकाने अनुभव घ्यावा. 'बीजा हवी निगराणी, हवी मायेची पाखरः लख्ख प्रकाश निर्मळ, त्यात कष्टाचा पाझर' अशा ओळी 'बीज अंकुरे अंकुरे' या कवितेतही आहेत. 'अंकुराचे होता रोप, होई रोपट्याचे झाड' हेही त्याच कवितेत म्हटलेले आहे. त्याच भावनेतून अनेकांचे हात या उपक्रमाला लागले. आता असंख्यांचे लागावेत, हा जगन्नाथाचा रथ सर्वांनी मिळून पुढे न्यावा आणि सर्वांचे जीवन सुखी, आनंदी व निरामय व्हावे, हीच जगन्नियंत्याला प्रार्थना!

## तंत्रवेध

# भविष्यातील क्रांतीचे प्रतीक ठरणारे तंत्रज्ञान

**डॉ. दीपक शिकारपूर**

इलेक्ट्रॉनिक युगाच्या सुरुवातीपासून (सुमारे १९७०) गेल्या ४५ वर्षांमध्ये सर्वाधिक वेगाने प्रसार झालेले उपकरण म्हणजे सेलफोन. या बाबतीत त्याने संगणकाला केव्हाच मागे टाकले. किंबहुना, हँण्डसेटमध्येच आता परिपूर्ण संगणक समाविष्ट झाला आहे. आता सेलफोन हवा असण्याच्या गरजेचे रूपांतर वेडामध्ये झाले आहे. इतके की, रोटी-कपडा-मकानसारख्या जीवनावश्यक गोष्टींमध्येच लोक आता कळत-नकळत सेलफोनचाही समावेश करू लागले आहेत. गेल्या दहा वर्षांमध्ये मोबाईल फोनच्या हॅण्डसेटचे स्वरूप किती बदलले हे सांगायला नकोच. हॅण्डसेट लहान आणि हलके बनले आणि मुख्य म्हणजे त्याद्वारे मिळणाऱ्या सुविधांमध्ये आश्चर्यकारक वेगाने वाढ झाली. सध्या प्रत्येकाच्याच हाती स्मार्टफोन्स दिसू लागल्याने हॅण्डसेटवरून 'लाईव्ह स्ट्रीमिंग व्हिडीओ' पाहणाऱ्यांची संख्या विलक्षण वाढणार आहे. ६जी हे पुढील पिढीचे वायरलेस कम्युनिकेशन तंत्रज्ञान आहे, जे ५जीपेक्षा खूपच वेगवान, अधिक विश्वासार्ह आणि अनेक नवीन क्षमतांसह येणार आहे. हे तंत्रज्ञान आपल्या दैनंदिन जीवनात क्रांती करेल. '६ जी' म्हणजे नक्की काय हे समजण्यासाठी आपल्याला मोबाईलचा इतिहास समजून घ्यावा लागेल. यातील 'जी' म्हणजे 'जनरेशन'. आपण याला आपल्या भाषेत पिढी अथवा आवृत्ती म्हणू.

सेल्युलर मोबाईल सेवा सर्वांत आधी रेडिओ टेक्नोलॉजी वापरत असे. तीच 'फर्स्ट जनरेशन' मानले जाते. त्यावरून फक्त कॉल करता येत असत. त्यानंतर रेडिओ टेक्नॉलॉजी नेटवर्कचे डिजिटल नेटवर्कमध्ये रूपांतर झाले. त्याला २ जी असे संबोधले जाते. २ जी मध्ये इंटरनेटची सुविधा नव्हती. २ जीने एसएमएस (शॉर्ट मेसेजिंग सर्व्हिस) या सुविधेचा प्रथम वापर सुरू केला. त्यानंतर मोठ्या प्रमाणात पसरल्या गेलेल्या आणि अधिक चांगल्या सोयी जास्त वेग व संपूर्ण सुधारित आवृत्तीला ३ जी म्हणता येईल. इंटरनेट मोबाईलवर आले ते ३ जीमुळे. स्मार्टफोनच्या आगमनानंतर लोक डेटा मोठ्या प्रमाणावर वापरायला लागले. त्यामुळे अधिक जलद इंटरनेटची गरज भासू लागली. त्यातून ४ जी नेटवर्कचा जन्म झाला. मोबाईल नेटवर्कच्या या चौथ्या आवृत्तीतील मुख्य सुधारणा म्हणजे अधिक जलद इंटरनेट सुविधा. ५ जी तंत्रामुळे आपण फक्त स्मार्टफोन नव्हे तर, सर्व उपकरणे जोडू लागलो. ५ जी मोबाईल नेटवर्कमध्ये खूप जास्त बॅण्डविड्थ उपलब्ध होईल आणि मोबाईल इंटरनेट अतिशय जलद असल्याचा अनुभव येईल. 'इंटरनेट ऑफ थिंग्ज' या संकल्पनेमुळे आता जवळजवळ प्रत्येक इलेक्ट्रॉनिक उपकरण इंटरनेटला जोडले जात आहे. स्मार्टफोनप्रमाणेच इतरही अनेक वस्तू आणि उपकरणे हुशार झाली असून इंटरनेट, ब्ल्यूटूथ, निअर फ्रीक्वेन्सी (एनएफ) इ. मार्गांनी परस्परांशी संवाद साधू लागली. वापरकर्त्याने आपल्या विशिष्ट गरजा एकदा स्मार्ट उपकरणांना सांगितल्या की ती उपकरणे एकमेकांशी 'बोलून' स्वतःच निर्णय घेऊ शकतात.




आता ६ जी कडे वळू. ६ जीची गती ५ जीपेक्षा अनेक पट जास्त असणार आहे. ६ जी हे एक अत्यंत वेगवान, अविश्वसनीय आणि अत्यंत सुरक्षित वायरलेस कम्युनिकेशन स्टॅण्डर्ड आहे. हे आपल्याला उच्च-गुणवत्तेचे व्हिडीओ कॉलिंग, आभासी वास्तविकता, ऑगमेंटेड रियलिटी आणि इंटरनेट ऑफ थिंग्जसारख्या अनेक तंत्रांचा व्यावहारिक अनुभव देऊ शकेल. टेराहर्ट्ज तरंगांचा वापर करून ६ जी सेवा अधिक डेटा प्रवाहित करण्यास सक्षम असेल. नेटवर्क स्लाईसिंगमुळे नेटवर्कला वेगवेगळ्या अनुप्रयोगांसाठी ऑप्टिमाइझ केले जाऊ शकते. ६ जी तंत्रज्ञान खूपच जटिल आहे आणि त्याच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात संशोधन आवश्यक आहे. नोकिया, एरिक्सन, हुआवेई आणि सॅमसंग हॅण्डसेट उत्पादक किंवा सेवा प्रदाते ६ जीवर चालू शकणाऱ्या मूलभूत अत्यावश्यक प्रणाली विकसित करण्यात अग्रेसर आहेत. ६ जी तंत्रज्ञान नवीन रेडिओ फ्रिक्वेन्सीवर कार्य करेल आणि लक्षणीय वेग, अधिक कार्यक्षमता प्राप्त करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करेल. ६ जी उद्योग आणि तंत्रज्ञान इकोसिस्टिम जागतिक आहे. सध्याचे प्रमुख ६ जी संशोधन प्रकल्प जपान, अमेरिका, चीन, दक्षिण कोरिया, जर्मनी, फिनलंड आणि विस्तीर्ण युरोपियन युनियनमध्ये होत आहेत. त्यातले नवीन नाव म्हणजे आपला भारत. पंतप्रधान मोदी यांनी मोबाईल काँग्रेसमध्ये घोषणा केली. दूरसंचार विभागाने 'भारत ६ जी व्हिजन' तयार करण्यासाठी तंत्रज्ञान अभिनव गट स्थापन केला आहे.

२०३० पर्यंत भारतात ६ जी तंत्रज्ञान विकसित करण्याचे धोरण आहे. या व्हिजनचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे ६ जी नेटवर्क तंत्रज्ञान तयार आणि तैनात करणे; जे सुरक्षित, बुद्धिमान आणि व्यापक कनेक्टिव्हिटी प्रदान करेल आणि नागरिकांना चांगले जीवन जगण्यास सक्षम करेल. इंटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन युनियन, टेलिकॉम मानकांच्या विकासावर देखरेख करणारी आणि जगभरातील स्पेक्ट्रम आणि सॅटेलाईट ऑर्बिट रिसोर्सेसचे व्यवस्थापन करणारी संयुक्त राष्ट्रांची संस्था आहे. या संस्थेने ६ जी व्हिजन फ्रेमवर्क स्वीकारले आहे. ६ जी प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये राबवण्याचा प्रस्ताव आहे. पहिला टप्पा २०२३ ते २०२५ दरम्यान आकाराला येईल. पहिल्या टप्प्यात अन्वेषणात्मक कल्पना, संघर्षमय तंत्र विकास आणि संकल्पनेचा पुरावा चाचण्यांना समर्थन प्रदान केले जाईल. दुसरा टप्पा २०२५ ते २०३० या काळात आकाराला येईल. जागतिक समविचारी गटाद्वारे स्वीकृतीसाठी वचन आणि क्षमता दर्शवणाऱ्या संकल्पनांना ६ जी प्रकल्पाच्या व्यावसायिकीकरणाकडे नेणारे अंमलबजावणीत्मक समर्थन दिले जाईल. ६ जी साठी पायाभूत सुविधांमध्ये भरीव गुंतवणूक आवश्यक आहे. उदाहरणार्थ, वेव्ह प्रसारित करणे आणि प्राप्त करणे अधिक कठीण आहे. त्यामुळे ६ जी नेटवर्कला नवीन अँटेना डिझाईन आणि सिग्नल प्रक्रिया तंत्र वापरण्याची आवश्यकता असेल.

विस्तारित वास्तविकता आणि मिश्रित वास्तविकता मोबाईलच्या या सहाव्या पिढीचा भाग असेल. शंभरच्या आसपास फ्रिक्वेन्सीवर ६ जी ऑपरेट करते. हे संवेदनांचे इंटरनेट आहे, भौतिक आणि आभासी जगाचे संमिश्रण हे ६ जीचे वैशिष्ट्य आहे. पुढील दशकात स्मार्ट उपकरणांना आयओटी (इंटरनेट ऑफ थिंग्स) या तंत्रामुळे सर्वत्र इंटरनेट बॅण्डविड्थ लागेल. इथेच ६ जी कामाला येईल. यामुळे मोबाईल कॉल्स वेगळ्या दर्जाचा अनुभव देतील. आता आपण द्विमिती व्हिडीओ जमान्यात आहोत. ६ जीमुळे मानवी आकाराचे ३ डी होलोग्राम प्रदर्शन शक्य होते. आपण संपर्क साधत असू शकणाऱ्या व्यक्ती रिअल टाईममध्ये (जशा आहेत तशा; प्रोफाईल चित्र नव्हे) आपल्याजवळ प्रकट होतात. अनेक पौराणिक टीव्ही मालिकांमध्ये मानवाच्या समोर देवदेवता प्रकट झाल्याचे दाखवले जाते. ६ जी होलोग्राम तंत्रामुळे हे तंत्र सर्वसामान्यांना उपलब्ध होईल. यामुळे दळणवळण क्षेत्रात क्रांती होईल. २०२६ च्या मध्यास हे प्रायोगिक तत्त्वावर सुरू होईल आणि २०३० पर्यंत सर्वत्र उपलब्ध होईल. त्यामुळे पारंपरिक द्विमिती मोबाईल फोनचा नक्कीच अस्त होईल. आपण ६ जी तंत्रज्ञान यशस्वीरीत्या कार्यान्वित केल्यास देशाला एक तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत राष्ट्र बनवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावू शकू. भारताला वैश्विक स्तरावर एक तंत्रज्ञान नेता देश म्हणून प्रस्थापित करण्यात ६ जी तंत्रज्ञान मदत करेल. विसाव्या शतकात आपली प्रतिमा तंत्रज्ञान आयातदार देश अशी होती. आता आपण प्रगत व निर्यातप्रधान म्हणून ओळखले जाऊ आणि हीच या नवतंत्रज्ञानाची खासियत असेल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# घातक व्यसनाधीनता करी जीवनाचा नाश

**गावच्या काही सज्जनांनी । लागावे व्यसन-निर्मूलनी ।**
**उत्तम गुणांच्या अनेक श्रेणी विकासाव्या गावी ॥**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी निर्मळ गावाची मांडणी ग्रामगीतेतून केली आहे. त्यांनी ज्या गोष्टी गावात अर्थात गावातील तरुण, आबालवृद्धांमध्ये असाव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली, त्यात व्यसनमुक्तता देखील आहे. वरील ग्रामगीतेच्या ओवींमधून हे स्पष्ट होते. समाज सुखी, संपन्न आरोग्यदायी असावा यासाठी समाज निर्व्यसनी असणे आवश्यक आहे. व्यसन कोणतेही असो वाईटच; पण दुर्दैवाने तरुणाईला आंतर्बाह्य पोखरणारी व्यसनाधीनता दिवसेंदिवस वाढतच असल्याचे दिसून येते. देशाचे भविष्य ज्या युवापिढीच्या हाती आहे, ज्यांच्याकडून सृजनाची अपेक्षा आहे तेच जेव्हा व्यसनाधीन होतात तेव्हा ही बाब केवळ व्यक्तिगत किंवा कौटुंबिक न राहता समाज आणि देशासाठी गंभीर समस्या ठरते. म्हणूनच समाजसुधारकांसह राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी देखील या संदर्भात त्या काळी जनजागरण करण्यासाठी पुढाकार घेतला. सद्य:स्थितीतही याबाबत व्यापक जनजागरणाची आवश्यकता आहे.

व्यसनाधीनतेची सुरुवात तारुण्याच्या उंबरठ्यावर होते असे म्हटले जाते. पण वय वर्षे १० ते १७ या वयोगटातील अल्पवयीनांमध्ये देखील वाढत असलेली व्यसनाधीनता चिंतेत भर टाकणारी आहे. सिगारेटने झालेली सुरुवात हळूहळू दारू आणि अमली पदार्थांच्या सेवनापर्यंत कशी पोहोचते हे त्या व्यसन करणाऱ्याच्या लक्षातही येत नाही. आणि जेव्हा लक्षात यायला लागते, त्याचे भयंकर दुष्परिणाम दिसू लागतात तेव्हा वेळ निघून गेलेली असते. चांगले वळण लागण्याची वेळ ही त्याच्या बालपणाची असते. त्या वयात केलेले संस्कार सातत्याने होत राहिले तर मनुष्य व्यसनाधीन होणार नाही अशी परिस्थिती निर्माण होते. पण या उलट झाल्यास वेगळे चित्र दिसून येते.



अमली पदार्थांच्या सेवनामुळे श्वसन संस्थेचे विकार आणि मेंदू आणि फुफ्फसांच्या तक्रारी सुरू होतात. अनेक मानसिक आजार, ताण, चिंता, नैराश्य, व्यसनामुळे निर्माण होतात आणि त्या ताणामुळे, नैराश्यामध्ये आणखी जास्त व्यसन केले जाते. कौटुंबिक व आयुष्यातील इतर तणावांमुळे व्यसन करणे आणि त्यामुळे वाढलेल्या तणावामुळे व्यसन अधिक वाढत जाणे हेच न संपणारे दुष्टचक्र आहे. मोबाईल वापराचे व्यसन, त्यात व्हिडीओ गेम्सचे व्यसन, समाज माध्यमांचा अतिरेकी आणि अविवेकी वापर, त्यातही अश्लील चित्रफितींच्या विघातक व्यसनांच्या सवयी तरुणाईचे सर्वच स्तरावरील मानसिक आरोग्य गिळंकृत करताहेत. ज्या वयात तरुण-तरुणींनी कंबर कसून अभ्यास करावा, तितक्याच उत्साहात खेळावे, व्यायाम करावा, मजा करावी, बागडावे, आयुष्याच्या या सोनेरी क्षणांचा आनंद पुरेपूर लुटावा, मनमुराद भटकंती करताना आलेल्या जीवनरसाचा हृदयंगम प्रत्यय मनात खेळवावा, मुरवावा, समाजासाठी काही करू पाहावं, ज्या वयात जीवनाची सुरेल स्वप्नं रंगवणाऱ्या मनाने जागेपणीही पाहावीत, त्या वयात व्यसनाच्या विळख्यात अडकलेली तरुणाई पाहून या देशाचे व समाजाचे होणार तरी काय असा गंभीर आणि चिंता करायला लागणारा प्रश्न उपस्थित होतो. 'रिकामे डोके सैतानाचे घर' अशी म्हण प्रचलित आहे. म्हणूनच रिक्त ठिकाण किंवा जागा ही कुठल्यातरी उपायाने भरलीच जाते हा सिद्धांत आहे. शरीरातील डोके, मेंदू व बुद्धी हे बालपणी रिक्त वाटत असतात म्हणून त्याच काळात ते उत्तम संस्कार, उत्तम विचार आणि आचार यातून भरायला हवे. त्यासाठी आपल्याकडे फार चांगली व्यवस्था पूर्वापार चालत आली आहे. ती म्हणजे एकत्र कुटुंब पद्धती. या एकत्र कुटुंब पद्धतीत कोणालाच आपण एकटे आहोत असे वाटत नाही. प्रत्येक जण प्रत्येकाला मदत करतो. इतकेच नव्हे तर वेळोवेळी विचारांचे त्या त्या प्रमाणात आदानप्रदान होते. हे चांगले विचार एकदा मनात पक्के बिंबले तर व्यसनांना जागा आणि वेळ मिळत नाही. परिणामी आपोआपच आयुष्य आनंदी, समाधानी होते. त्यामुळे आजही आपण आपल्या कुटुंबात एकत्र येण्याची, सगळ्यांनी परस्परांशी विचारविनिमय करण्याची, सगळ्यांनी एकत्र येऊन आनंद साजरा करण्याची पद्धत स्वीकारली तर व्यसनाचा हा राक्षस आपोआप मारला जाईल व कुटुंब, समाज आणि राष्ट्र बळकट व्हायला वेळ लागणार नाही. आपल्यासोबत कुणीतरी आपले आहे ही भावनाच आपल्याला व्यसनाधीनतेपासून दूर राखू शकणार आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# मोदी युग : भारताचा सुवर्णकाळ

**श्यामकांत जहागीरदार**

मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिले वर्ष ९ जूनला पूर्ण झाले. २०२४ च्या ९ जूनला नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती. हाही एक विक्रम होता. आतापर्यंत देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू वगळता सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेण्याचे भाग्य कोणालाच लाभले नाही. नेहरूंनंतर सर्वाधिक काळ पंतप्रधान राहण्याची संधी त्यांची कन्या इंदिरा गांधी यांना मिळाली. गांधी तीन टप्प्यात जवळपास १५ वर्षे पंतप्रधान होत्या. पण सलग तीन वेळा पंतप्रधानपद त्यांनाही भूषवता आले नाही. त्या अर्थाने मोदी यांनी सलग तीन वेळा पंतप्रधानपदाची शपथ घेत नेहरूंची बरोबरी केली, असे म्हणायला हरकत नाही.

मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेत सलग १० वर्षे पंतप्रधान राहण्याचा काँग्रेसचे डॉ. मनमोहनसिंग यांचाही विक्रम मोडला आहे. मोदी यांच्या आधी सलग १० वर्षे पंतप्रधानपद भूषवण्याची संधी कोणाला मिळाली नव्हती. राजीव गांधी, पी. व्ही. नरसिंहराव आणि अटलबिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधानपदाची पाच वर्षे पूर्ण केली होती. त्यामुळे मोदी यांच्या पंतप्रधानपदाच्या ११ वर्षांचे महत्त्व आपल्या लक्षात येईल. मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिले वर्ष नुकतेच पूर्ण झाले असले, तरी मोदी यांच्या पंतप्रधानपदाची ११ वर्षेही यामुळे पूर्ण झाली आहेत. मोदी यांच्या पंतप्रधानपदाच्या कामगिरीचा विचार करताना आम्हाला तिसऱ्या कार्यकाळातील एक वर्षाचा नाही तर पंतप्रधान म्हणून त्यांच्या एकूण ११ वर्षांच्या कार्यकाळाचा विचार करावा लागणार आहे. देशात आतापर्यंत होऊन गेलेले सर्व पंतप्रधान एका बाजूला आणि मोदी यांना एका बाजूला ठेवले, तरी पंतप्रधान म्हणून मोदी यांचेच पारडे जड राहणार आहे. मोदी यांनी पंतप्रधानपदाच्या ११ वर्षांत देशहिताचे अनेक धाडसी आणि लोकाभिमुख निर्णय घेतले. त्यातील काही निर्णय असे होते, जे घेण्याची त्यांच्या आधीच्या पंतप्रधानांची हिंमतही झाली नाही, तसा विचारही ते कधी करू शकले नाहीत. मोदी यांच्या ११ वर्षांतील सर्व लोकाभिमुख आणि निर्णयाचा आढावा घेतला तर ते किमान तीन डझन होतील. याचा अर्थ आधीच्या पंतप्रधानांच्या कार्यकाळाचे वा त्यांचेही अवमूल्यन करतो आहे, असे नाही. मात्र ही वस्तुस्थिती आहे आणि ती कोणालाही नाकारता येणार नाही. देशवासीयांशी 'मन की बात' करताना मोदी यांनी देशातील जनतेच्या मनातील गोष्टी ओळखून त्यांच्या इच्छा-आकांक्षांची तसेच अनेक स्वप्नांची पूर्तता केली. जनतेच्या मनातील ही अनेक स्वप्ने दीर्घकाळापासून प्रलंबित होती, पण आधी होऊन गेलेल्या पंतप्रधानांकडून त्यांच्या स्वप्नांची पूर्तता झाली नाही. त्यामुळे जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द करणे असो की अयोध्येतील राम जन्मभूमीवर रामललाचे भव्य मंदिर उभारणे असो. देशातील जनतेने नंतर नंतर तर ही स्वप्ने पाहण्याचेच सोडून दिले होते. पण मोदी यांनी लोकांच्या मनातील यासह अनेक स्वप्नांची पूर्तता केली; ती प्रत्यक्षात आणली. त्यामुळे लोकांचा अजूनही त्यावर विश्वास बसत नाही. आजही अयोध्येतील राम जन्मभूमीवर झालेले रामललाचे भव्य मंदिर पाहून तसेच कलम ३७० रद्द झाल्यानंतर श्रीनगरच्या लाल चौकाला भेट देत असताना लोकांचा आपल्या डोळ्यावर विश्वास बसत नाही. रामललाची मंदिरात विराजमान मूर्ती पाहून त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू येतात. त्यामुळे मोदी यांचा ११ वर्षांचा कार्यकाळ हा भारताच्या दृष्टीने सुवर्णकाळ म्हटला पाहिजे.

२०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मोदी यांना अपेक्षित बहुमत मिळाले नाही. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने स्वबळावर स्पष्ट आणि निर्विवाद बहुमत मिळविले होते. त्यामुळे कोणताही निर्णय घेणे पंतप्रधान म्हणून मोदी यांना सहजशक्य होते. पण आपल्या सलग तिसऱ्या कार्यकाळात भाजपाला बहुमत नसताना आणि सरकार मित्रपक्षांच्या पाठिंब्यावर अवलंबून असताना मोदी यांच्या घोडदौडीत कोणताच फरक पडला नाही. मोदींची धाडसी निर्णय घेण्याची प्रक्रिया कुठेच प्रभावित झाली नाही. कारण मोदींचे सर्व निर्णय हे स्वहिताचे आणि पक्षहिताचे नव्हते, तर समाजहित आणि राष्ट्रहिताचे तसेच देशातील गोरगरीब जनतेच्या कल्याणाचे होते. त्यामुळे मित्रपक्षही मोदी यांना काही म्हणू शकत नव्हते. उलट न मागता मोदी यांच्या निर्णयांना या मित्रपक्षांनी एकमुखाने पाठिंबा दिला. पहलगाम येथे निर्दोष भारतीय पर्यटकांची हत्या करणाऱ्या पाक पुरस्कृत अतिरेक्यांना धडा शिकवण्यासाठी मोदी यांनी राबविलेले 'ऑपरेशन सिंदूर' तसेच त्यानंतरच्या लष्करी कारवाईने मोदी यांनी पाकिस्तानवर मात करत देशातील जनतेची मने जिंकली.

देशातील सर्व राजकीय पक्षांची आणि त्यांच्या नेत्यांची विचार करण्याची प्रक्रिया जेथे संपते, तेथून मोदी यांची विचार करण्याची प्रक्रिया सुरू होते. आता समोर कोणताच मार्ग नाही. आता मोदी काय करणार, कोणता निर्णय घेणार असे वाटते, तेथे मोदी आश्चर्यचकित करणारा निर्णय घेत देशाला नव्या उंचीवर घेऊन जातात, याचा अनुभव आतापर्यंत अनेक वेळा देशाने घेतला आहे. दहशतवादाच्या विरोधातील भारताची लष्करी कारवाई आतापर्यंत व्याप्त काश्मीरपर्यंतच मर्यादित राहात होती. यावेळी भारतीय लष्कराने पाकच्या हद्दीत १०० किमीपर्यंत घुसून पाकिस्तानला कधी न विसरणारा धडा शिकवला. नवा भारत आता घरात घुसून मारतो, हे फक्त मोदी बोललेच नाही तर आपले शब्द त्यांनी खरे करून दाखवले. 'मेक इन इंडिया'चा नारा देत मोदींनी भारताला आत्मनिर्भर केले. पाकिस्तानविरुद्धच्या गनिमी काव्याच्या या युद्धात भारतीय लष्कराने तसेच हवाई दलाने ते सिद्ध करून दाखवले. कधीकाळी भारत जगातील अनेक विकसित देशांकडून शस्त्रास्त्रे आणि लढाऊ विमानांची खरेदी करत होता. आता जगातील अनेक देश भारताकडून क्षेपणास्त्रे तसेच अन्य शस्त्रास्त्रांची खरेदी करीत आहेत. हा चमत्कार मोदींनी 'मेक इन इंडिया' या मंत्राने करून दाखवला. पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात पंतप्रधान मोदी यांच्या मार्गदर्शनात केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या मंत्रालयाने केलेली प्रगती आश्चर्याने थक्क करणारी आहे. तीन तलाकच्या बेड्यातून मुस्लिम महिलांची सुटका करण्याचा ऐतिहासिक असा निर्णय घेत मोदी यांनी आपण देशातील लोकांच्या विशेषतः महिलांच्या कल्याणाचा निर्णय घेताना धर्माचे अवडंबर माजवत नाही, हे दाखवून दिले. समाजातील एकही वर्ग मोदी यांच्या कल्याणकारी निर्णयापासून वंचित राहिला नाही. २५ कोटी लोकसंख्येला त्यांनी गरिबी रेषेतून बाहेर काढले, तर ८० कोटी लोकसंख्येला गेल्या काही वर्षांपासून मोफत अन्नधान्य पुरवले जात आहे. मोदी यांच्या लोककल्याणकारी निर्णयावर विरोधी पक्ष टीका करत असला, तरी 'हाथी चले बाजार तो कुत्ते भौके हजार' याप्रमाणे मोदी दुर्लक्ष करत असतात. हेच मोदी यांच्या कार्यशैलीचे वैशिष्ट्य म्हटले पाहिजे आणि त्यांच्या या कार्यशैलीतच त्यांच्या लोकप्रियतेचे रहस्य दडले आहे.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### पर्यावरण शिक्षण निरंतर मिळायला हवे

पर्यावरण शिक्षण ही काळाची गरज आहे. पर्यावरण शिक्षणात ज्ञान,आकलन, कौशल्य व उपयोजन या चार पायऱ्यांचा समावेश असावा. पर्यावरण शिक्षण हे शाळेपुरते मर्यादित असू नये तर ते समाजाभिमुख असावे. आज पर्यावरण शिक्षणाची खरी गरज समाजाला आहे. पर्यावरण विषयक सकारात्मक दृष्टिकोन समाजातील प्रत्येक माणसामध्ये निर्माण करण्यासाठी सर्व स्तरावर सर्वंकष प्रयत्न व्हायला हवेत. मानव हा पर्यावरणाचा एक घटक आहे. मात्र या मानवाचा पर्यावरणातील प्रत्येक घटकात हस्तक्षेप वाढत चालला आहे. म्हणून पर्यावरणीय आपत्तीचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन, अध्यापन व त्यावर परिणामकारक उपाय करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाला पर्यावरण शिक्षण ही काळाची गरज आहे.

पर्यावरणाबाबत शिक्षण शालेय जीवनात मानवाने घेतले असेल तरी ते आज ते शिक्षण पूर्णपणे विसरलेले दिसतात म्हणून पर्यावरण संरक्षण, संवर्धन, संगोपन ही काळाची गरज असल्याने हे शिक्षण शालेय जीवनाबरोबर सामाजिक घटक यांनाही गरजेचे आहे त्यासाठी प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्याची नितांत गरज आहे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### आंतरराष्ट्रीय योग दिन, भारताची जगाला भेट

भारत सरकारच्या प्रयत्नाने २१ जून २०१५ रोजी योग दिवस युनोच्या मान्यतेने जागतिक पातळीवर पहिल्यांदा साजरा झाला. दरवर्षी २१ जूनला आंतरराष्ट्रीय योग दिन आता जगभर मोठ्या प्रमाणावर साजरा होत असल्याने या गौरवशाली भारतीय शास्त्राची महती जगाला समजली आहे.२०२० मधील कोरोना महामारीच्या उद्रेकानंतर योगाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर आज दहावा योग दिवस साजरा करण्यात येत आहे. भारतात २१ जून हा वर्षातील सर्वांत मोठा दिवस असल्याने या दिवशी योग दिनाची निवड करण्यात आली आहे.

योग प्राचीन भारतीय कलेचे प्रतीक मानले जाते. भारतीय सकारात्मकता आणि उत्साही आयुष्य टिकवण्यासाठी योगास महत्त्वपूर्ण स्थान दिले गेले आहे. सखोल विचार केल्यास योग ही अशी निरंतन प्रक्रिया आहे जी कायिक, वाचिक आणि मानसिक या तीनही पातळ्यांवर स्थैर्य प्रदान करून माणसाला निरोगी ठेवत सर्वार्थाने समृद्ध करते. सुश्रुतसंहितेत अनागतबाधा प्रतिवेध नावाचा अध्याय आला आहे. अनागतबाधा म्हणजे अद्याप जी आलेली नाहीत अशी दुखणी किंवा आजार. या अध्यायात दिनचर्येचे सविस्तर वर्णन करून या अद्यापनात न आलेल्या आजारांना दूर ठेवण्याचा मार्ग दाखवला आहे हेयम दुखम अनगतम असे सांगत असतानाच आचार्य पतंजली योगाची आरोग्यविषयक व्याप्ती दाखवतात. निरोगी राहण्यासाठी योग हे आपल्या दैनंदिन जीवनाचे अंग असायला हवे असे सांगताना जितक्या सहजतेने आपण श्वास घेतो तितका सहज योग आपल्यात भिनलेला हवा, असे ते म्हणतात. आयुर्वेदात सांगितल्याप्रमाणेच योगाची देखील आठ अंगे आहेत. प्रत्यक्षात ही आठ अंगे नसून मोक्षप्राप्तीच्या दिशेने जाणाऱ्या आठ पायऱ्या आहेत. यम, नियम, आसन आणि प्राणायाम हे बहिरंग योग आपल्या शरीराकडे अधिक लक्ष देतात. तर प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी हे अंतरंग योग मन आणि आत्मा यांच्या पातळीवर कार्य करून साधकाला मोक्षाप्रती पोहोचवतात. आसने आणि प्राणायाम यापुरतेच योगाला मर्यादित ठेवणे हे अयोग्य आहे. योगाला स्वतंत्र दर्शन म्हणून दिलेली मान्यता मानवी जीवन सर्वार्थाने उच्च प्रतीचे बनवण्यासाठी योगाच्या योगदानाची असलेली साक्षच आहे.

**डॉ. चंद्रकांत कुलकर्णी**/९९६०९६७१३२

### जब्बार पटेल यांची पुरस्कारासाठी सार्थ निवड

कोल्हापूर येथील राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्ट मार्फत सन २०२५ चा राजर्षी शाहू पुरस्कार हा चित्रपट आणि नाट्य क्षेत्रांत दिग्दर्शक म्हणून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पद्मश्री डॉ. जब्बार पटेल यांना जाहीर झाला. जब्बार पटेल यांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्रांतील दिग्गज व्यक्तींवर चित्रपट व माहितीपट बनविले आहेत. त्यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आधारित चरित्रपट इंग्रजीसह नऊ भारतीय भाषांमध्ये संपूर्ण भारत व परदेशात प्रदर्शित झाला होता. १९७५ मध्ये चित्रपट दिग्दर्शक म्हणून त्यांनी 'सामना' या मराठी चित्रपटाद्वारे पदार्पण केले. त्यानंतर 'घाशीराम कोतवाल' हे ऐतिहासिक व राजकीय पृष्ठभूमीवर आधारित नाटक केले. त्याला जागतिक स्तरावर प्रचंड प्रसिद्धी आणि मान्यता मिळाली. त्यानंतर त्यांनी जैत रे जैत, सिंहासन, उंबरठा, एक होता विदूषक, मुक्ता यासारखे पुरस्कार प्राप्त चित्रपट निर्माण केले. त्यांच्या पुरस्कार निवडीने दिग्गज दिग्दर्शकाचा गौरवच झाला आहे.

**संतोष राऊत**/९९६०१०४३४५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ॥ उसंतवाणी ॥

१५३७




अघोषित म्हणे । आहे आणीबाणी ।
कोणाची ही वाणी । ऐका जरा ॥१॥

आणीबाणी होती । घोषित ही जेंव्हा ।
लपलेले तेंव्हा । कोण कुठे? ॥२॥

लेखक नि नट । आणि पत्रकार ।
आले रस्त्यावर । किती तेंव्हा? ॥३॥

मोदी विरोधाची । येऊनी उबळ ।
जीभ वळवळ । करते जी ॥४॥

कोण ते हे 'कूळ' । काय ती 'करणी'।
पुरोगामी पाणी । ढवळीले ॥५॥

मांडीवर आता । कुणाच्या बसून ।
बोलती ठासून । आणीबाणी ॥६॥

कांत म्हणे टीका । बनली फॅशन ।
हरवे मिशन । चळवळ ॥७॥


श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
१० जून २०२५

# छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे नरसिंहाचेच अवतार

## अप्पाला प्रसादराव; शिवस्मारकतर्फे आयोजित शिवराज्याभिषेक सोहळ्याची उत्साहात सांगता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जून-**

स्वराज्यावर चाल करून आलेल्या अफजलखानाचा वध बुद्धिमत्तेचा वापर व पराक्रमाची शर्थ करून छत्रपती शिवरायांनी केला. मुघल आक्रमकांच्या त्रासातून रयतेला मुक्त करण्याचे काम शिवरायांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज हे त्याकाळी जणू नरसिंह अवतारच होते, असे प्रतिपादन अप्पाला प्रसादराव (आंध्र प्रदेश) यांनी केले.



सोलापुरात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त शिवस्मारकतर्फे सोलापुरात प्रथमच आयोजित तेलुगु भाषेतील व्याख्यानादरम्यान ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, माधवी कुलकर्णी उपस्थित होते.

अप्पाला प्रसादराव म्हणाले, उज्वल भविष्य घडवण्यासाठी नव्या पिढीला शिवसंस्कार व छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र प्रत्यक्षात आचरणात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हिंदू संस्कृती चिरंतन आहे. तिचे जतन करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. जिजाऊ मातेने स्वराज्यासाठी भगवान महादेवांकडे स्त्रियांवरील अत्याचार रोखण्यासाठी गोहत्या थांबवण्यासाठी व समस्त हिंदू बांधवांना ताकद व आधार देणाऱ्या पुत्राची मागणी केली असेल, हे छत्रपती श्री शिवरायांच्या संपूर्ण चरित्रातून दिसून येते. प्रत्यक्ष देव ज्या भूमीवर जन्म घेतात अशी ही भारतभूमी त्याकाळी म्लेंछानी त्रासली होती. त्यांच्या त्रासातून मुक्त करण्यासाठी जणू छत्रपती श्री शिवरायांचा जन्म झाला. अत्यंत कमी साधनातून छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. छत्रपती शिवराय एकटे पाच शाह्यांशी लढले. आज जगाला शिकवल्या जाणाऱ्या गोरीला वॉरची संकल्पना छत्रपती श्री शिवाजी महाराजांची आहे. त्यांच्या युद्धनीतीचे धडे आज देखील अमेरिका, फ्रान्स, रशिया यासारख्या देशात शिकविले जातात. छत्रपती शिवरायांनी हिंदूंना हिंदू म्हणून जगण्याचा विश्वास दिला, असेही त्यांनी सांगितले.

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला गागाभट्ट यांच्या उपस्थितीत महाराजांचा जिजाऊ मातेच्या डोळ्यासमोर राज्याभिषेक झाला, हा इतिहासातील सुवर्णक्षण होता. बालपणापासून अखेरपर्यंत रयतेसाठीच लढणारे छत्रपती शिवराय एकमेव राजे होते. छत्रपती शिवाजी महाराज अभेद्य भिंत म्हणून दक्षिणेसाठी कायमच उभे राहिले. शिवचरित्र एक दोन तासात न समजणारा विषय आहे. त्यासाठी शिवचरित्र जगता आले पाहिजे, असेही अप्पाला प्रसादराव याप्रसंगी नमूद केले. सूत्रसंचालन रेणुका बुधारम यांनी तर आभार प्रदर्शन शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने यांनी केले. कार्यक्रमाची सांगता शिवकल्याण राजा या शिवस्तुतीने करण्यात आली.

## महत्वाचे...



### तृतीयपंथीयांच्या समस्या सोडविण्याबाबत शासन सकारात्मक : मंत्री संजय शिरसाट

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ जून :**

तृतीयपंथीयांच्या विविध समस्या सोडविण्याबाबत राज्य शासन सकारात्मक असून त्यासाठी तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळाच्या सदस्यांना विविध बैठका आणि प्रवासासाठी मानधन देण्यात येईल, अशी माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली. महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाची पहिली बैठक मंत्री शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी मंत्रालयात झाली. यावेळी आमदार सर्वश्री बालाजी किणीकर, आनंद बोंढारकर, अमोल मिटकरी (ऑनलाईन), विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, मंडळाच्या उपाध्यक्ष डॉ.सान्वी जेठवानी आदी उपस्थित होते.

### राजकोट किल्ल्यावर आरमार संग्रहालयासह पर्यटन केंद्र उभारणार : अजित पवार

**तभा वृत्तसेवास । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ जून :-**

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या मालवण तालुक्यातील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या परिसरात त्यांच्या आरमाराची यशोगाथा सांगणारे भव्य संग्रहालय, प्रदर्शन आणि पर्यटन केंद्र उभारण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला. भारतीय नौदलाचे जनक' छत्रपती शिवाजी महाराजांचं धैर्य, शौर्य, पराक्रम, अलौकिक कार्याची ओळख नव्या पिढीला व्हावी. त्यांनी पहिले आरमार स्थापन करुन दाखवलेली दूरदृष्टी सर्वांना कळावी., यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचा ८३ फुट उंचीचा पुतळा नुकताच उभारण्यात आला आहे, याबाबत उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, या पुतळ्यामुळे समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या राजकोट किल्ल्याला वेगळं महत्व प्राप्त झालं आहे. हा किल्या पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या भविष्यात वाढू शकते. या पर्यटकांना छत्रपती शिवाजी महाराजांनी त्याकाळात स्थापन केलेल्या आरमाराचा इतिहास कळावा. माहिती मिळावी. छत्रपतींच्या आरमारापासून आजच्या आधुनिक नौदलाच्या प्रवासाचं दर्शन घडावं, यासाठी राजकोट किल्ला परिसरात भव्य आरमार-नौदल संग्रहालय उभे राहण्यासह परिसराचा पर्यटनाच्यादृष्टीनं विकास करण्याची गरज आहे. सार्वजनिक बांधकाम विभागानं यासंबंधीच्या प्रस्तावाचा अभ्यास करुन पुढील कार्यवाही करावी, सदर प्रकल्पासाठीची जागा खाजगी व्यक्तीकडून अधिग्रहीत करण्याची कार्यवाही चर्चेतून, सामोपचारानं पूर्ण करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. मत्स्यव्यवसाय व बंदरविकासमंत्री नितेश राणे यांनी या प्रकल्पामागची भूमिका विशद करुन सविस्तर माहिती दिली.

### 'पीएनजी ज्वेलर्स' कडून नवा हिरेजडित हार सादर

**सोलापूर, दि. ११ जून-**

महाराष्ट्रातील अग्रगण्य आणि विश्वासार्ह दागिन्यांच्या ब्रँडपैकी एक असलेल्या 'पीएनजी ज्वेलर्स' यांनी त्यांच्या नवीन डायमंड ज्वेलरी मोहिमेअंतर्गत एक अत्याधुनिक आणि सौंदर्यपूर्ण नैसर्गिक हिरेजडित हार सादर केला आहे. या हाराची किंमत फक्त रुपये २,२५,000/- असून त्यामध्ये आधुनिकतेची झलक आणि कलात्मक कारागिरीचा उत्तम मिलाप असून कुशल कारागिरांच्या कारागिरीतून हा हार साकार झाला आहेत.पिवळ्या आणि गुलाबी सोन्यात उपलब्ध असलेला हा हार फुलांच्या प्रेरणेतून तयार झालेला असून त्यात पारंपरिक सौंदर्य आणि आधुनिक डिझाइन यांचे सुंदर मिश्रण आढळते.ग्राहकांच्या मागणीनुसार 'पीएनजी ज्वेलर्स'ने परवडणाऱ्या किंमतीत हिरेजडित दागिन्यांची ही नवी श्रेणी पुन्हा सादर केली आहे, याद्वारे स्टाईल आणि दर्जामध्ये कोणतीही तडजोड न करता ग्राहकांना निवड करणे सोयीचे होईल. ही खास ऑफर २ जून ते ३० जून २०२५ दरम्यान 'पीएनजी ज्वेलर्स'च्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहे.

# पालकमंत्री गोरे आज सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**सोलापूर दि.११ जून-**

राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री, तथा पालकमंत्री जयकुमार गोरे हे गुरूवार दि. १२ जून २०२५ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे.

गुरूवार सकाळी ६.५० वा. सोलापूर रेल्वेस्थानक येथे आगमन व मोटारीने शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण. सकाळी ७.०५ वा. शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव . सकाळी १०.४५ वा. शासकीय विश्रामगृह येथून हॉटेल बालाजी सरोवर प्रीमिअर कडे प्रयाण. सकाळी १०.५५ हॉटेल बालाजी सरोवर प्रीमिअर येथे आगमन व ११.00 वा. विकसित भारताचा अमृतकाल संदर्भात पत्रकार परिषदेस उपस्थिती. त्यानंतर सकाळी ११.३0 वा भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष (ग्रामिण व शहर ) व जिल्ह्यातील सर्व भाजपा मंडल अध्यक्ष यांचे समवेत बैठकीस उपस्थिती.

दुपारी १२.४५ वा. सोलापूर येथून पंढरपूर कडे प्रयाण. दुपारी 0२.00 वा. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर देवस्थान समिती सभागृह ,पंढरपूर येथे आगमन व श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर देवस्थान समिती यांचे समवेत आषाढीवारीच्या अनुषंगाने बैठकीस उपस्थिती. दुपारी 0२.४५ वा. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर देवस्थान समिती सभागृह येथून शासकीय विश्रामगृह पंढरपूर कडे प्रयाण. 0३.00 वा.शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव व नंतर सोयीनुसार बोराटवाडी जिल्हा सातारा कडे प्रयाण करतील.

# तीन लाख जनावरांना लम्पीचे लसीकरण

## साडेचार लाख जनावरांचे लसीकरण शिल्लक

**तभा वृत्तसेवा ,**
**सोलापूर , दि. ११ जून ,**

पावसाळ्यात डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येत असतो. डासांमुळे लम्पीचा संसर्ग मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. जनावरांना याचा सर्वाधिक धोका असल्याने जिल्ह्यातील गाय वर्ग जनावरांना मान्सूनपूर्व लम्पीचा डोस दिला जात आहे. आतापर्यंत तीन लाख १५ हजार २२ जनावरांना लम्पीचे लसीकरण केले आहे.



### जिल्ह्यातील गायींचा तपशील

**एकूण गायी :** सात लाख ५० हजार
**लस :** पाच लाख
**लसीकरण पूर्ण :** तीन लाख १५ हजार
**लस साठा :** दोन लाख
**लसीकरण शिल्लक :** चार लाख ५० हजार

जिल्ह्यात सात लाख ५० हजार गाय वर्ग जनावरे आहेत. त्यातील तीन लाख १५ हजार जनावरांना लंपीचा डोस दिला आहे. त्यामुळे जिल्ह्यात अद्यापही चार लाख ५० हजार गाय वर्ग जनावरे लंपीच्या लसीकरणापासून वंचित आहेत. त्या जनावरांना तत्काळ लसीकरण करण्याचे नियोजन पशुसंवर्धन विभागाकडून सुरू आहे. जिल्ह्यात गाय वर्ग, म्हैस वर्ग जनावरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. लम्पी आजाराचा धोका हा गाय वर्ग म्हणजेच गाय, बैल, कालवड, खोंड या जनावरांना जास्त आहे. त्यामुळे प्राधान्याने गाय वर्ग जनावरांना लम्पीचा डोस देण्यात येत आहे. दरम्यान, लंपी हा आजार संसर्गजन्य आहे.

### तालुकानिहाय झालेले लसीकरण

- अक्कलकोट : २१ हजार ५00,
- बार्शी : २0 हजार
- करमाळा : २९ हजार ६00,
- माढा : ४0 हजार ९00
- माळशिरस : ५0 हजार २१२,
- मंगळवेढा : २0 हजार
- मोहोळ : ४१ हजार ७00,
- उत्तर सोलापूर : नऊ हजार
- पंढरपूर : ५२ हजार ७७१,
- सांगोला : १0 हजार,
- दक्षिण सोलापूर : १८ हजार ३00,

**एकूण तीन लाख १५ हजार**

लम्पी झालेल्या जनावरांना डास चावला आणि तोच डास दुसऱ्या जनावरांना चावल्यास त्या जनावरांना लंपीची लागण होण्याची शक्यता असते. त्यामुळे लंपी आजाराची लागण झालेल्या जनावरांना इतर जनावरांजवळ न बांधता दुसऱ्या ठिकाणी बांधण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे.



# संत कबीर यांनी सामाजिक समतेसाठी काम केले : कदम

## संत शिरोमणी कबीर यांची १४४० वी जयंती

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ जून-**

राजमाता जिजाऊ मंगल कार्यालय व भारतीय बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने समतावादी, मानवतावादी संत शिरोमणी कबीर यांची १४४0 वी जयंती राजमाता जिजाऊ मंगल कार्यालय येथे साजरी करण्यात आली.

यावेळी भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष मेजर कमलाकर कांबळे, सैनिक संघटना असोसिएशनचे राज्य उपाध्यक्ष शिवपुत्र घटकांबळे, रिझर्व्ह बँकेचे माजी मॅनेंजर दिलीप कदम, पत्रकार स्वामीराव गायकवाड, दिलीप शिवशरण, श्रीशैल शिवशरण, सिद्धाराम घटकांबळे, वसंत शिवशरण, शिवशंकर गुंजले उपस्थित होते. संत कबीर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी श्री. कदम यांनी संत कबीर यांच्या दोह्यातून समता, स्वातंत्र्य, बंधुता यावर प्रकाश टाकल्याचे सांगून तत्कालीन परिस्थितीमध्ये सामाजिक समतेसाठी लढा दिल्याचे सांगितले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : मौजे वैराग नगरपंचायत हद्दीतील **सिटीसर्व्हे नं.८९१ याचा नगरपंचायत मिळकत नं. १५३८ याचे एकूण क्षेत्रफळ ३० चौ.मी. यासी चतुःसिमा पूर्वेस- काशीद यांची जागा, पश्चिमेस - इलाई चौधरी यांची जागा, दक्षिणेस - गोवर्धन जागा, उत्तरेस - सरकारी रस्ता येणे प्रमाणे चतुःसिमापुर्वक जागा.**

उपरोक्त वर्णन केलेली जागा ही आमचे अशिल गफार उर्फ गफूर महेबुब तांबोळी यांना बार्शी **येथील मे. सि.ज.ज्युडी यांचे कोर्टातील रे.मु.नं.७०९/१९९७ अन्वये दिनांक ०९/०२/२००५** रोजीच्या तडजोड हुकूमनाम्याने मालकी हक्कात व कब्जेवहिवाटीस आलेली दुकानजागा आहे व सदरची दुकानजागा आजतागायत आमचे अशिलाचे कब्जात आहे. सदरचा हुकूमनामा हा आमचे अशिलांनी दिनांक 0२/0६/२0२५ रोजी यथोचितरित्या मुद्रांकित करुन नोंदविणेस दिलेला आहे. आजतागायत सदरच्या जागेवर कोणतेही कोर्ट केस अथवा दिवाणी दावा प्रलंबित नाही. तरी या नोटीसने कळविणेत येते की, वर नमुद जागेवर कोणाचा हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास व आमचे अशिलाची नोंद सि.स.नं.८९१ च्या हक्कपत्रकी लावणेस कोणाचीही काहीही हरकत असल्यास त्यांनी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख बार्शी यांच्याकडे रितसर हरकत ५ दिवसात घ्यावी अन्यथा आमचे अशिल पुढील नोंदीची कारवाई करतील. ही जाहीर नोटीस दिली असे. ता. ११/0६/२0२५

**सही/-**
**श्री. लक्ष्मीकांत सिध्देश्वर झाडे (ॲडव्होकेट)**
**२२०९/३८, सिध्देश्वर निवास, गणेश नगर, माढा रोड, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस व विशेषतः सोलापूर शहर येथील नागरिकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डि व सब डि सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी, शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील प्रताप नगर विभागातील ''वैष्णवी वुड्स फेज-२ए'' या नावाने ओळखले जाणारे नगरामधील गट नं. ७/१ पैकी प्लॉट नं. ६ याचे क्षेत्र १0३. ५0 चौ.मी. आणि प्लॉट नं. ७ याचे क्षेत्र १0३. ५0 चौ.मी इतके असून यातील प्लॉट नं. ६ यांसी **चतुःसिमा :-** पूर्वेस : ९.00 मी. रुंदीचा रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. १५, दक्षिणेस : प्लॉट नं.७, उत्तरेस : प्लॉट नं.१५ आहे, आणि प्लॉट नं. ७ यांसी चतुःसिमा : पूर्वेस : ९.00 मी. रुंदीचा रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. १४, दक्षिणेस : प्लॉट नं.८, उत्तरेस : प्लॉट नं. ६ येणे प्रमाणे चतुः सिमेतील संपूर्ण मिळकत तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीच्या सर्व हक्कासहची ही **१) श्री. संभाजी रघुनाथ तुपे रा. बंगलोर २) श्री. यशवर्धन नितीन तुपे ३) श्री. धनंजय निवृत्ती थिटे ४) श्री. जितेंद्र दिलीप शिंदे ५) श्री. अनिल रामलिंग रेड्डी चौघे रा. पुणे** यांच्या मालकीची आहे. तथापी या सर्वांनी सदर मिळकतीचे संपूर्ण देखरेख, व्यवहार करण्याचे अधिकार **कुलमुखत्यार दस्त क्रमांक १४७६३ दिनांक : १९/0६/२0२४ ने श्री. अभिषेक पूर्णचंद्र राव रा. सोलापूर यांना दिलेले आहे.** सदरच्या कुलमुखत्यार दस्तने कुलमुखत्यार धाकर म्हणून वरील सर्व व्यक्तीची मान्यता घेऊन सदर मिळकत ही आमचे अशिल **१. श्री. संजय वसंतराव झिंगाडे २. सौ. सरोजना संजय झिंगाडे ३. श्री आकाश संजय झिंगाडे, सर्व रा. सोलापूर** यांना कायम खुषखरेदी करुन देण्याचे ठरवून इसारा दस्त करून रक्कम स्विकारलेली आहे. सदरचे मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचे हमी व खात्री कुलमुखत्यार धारक यांनी आमचे अशिलांना दिलेली आहे.

तरी वर नमूद मिळकतीबाबत कोणाचाही काहीही हरकत, हक्क व हितसंबंध, दान, लिज, टाच, गहाण, बँक जसी, बोजा, खाजगी सावकारी, साठेखत, खरेदीखत, कब्जेपावती, पोटगी व इतर हक्क प्रस्थापित असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 0७ (सात) दिवसाच्या आत कागदोपत्रासह, विहित मुदतीत लेखी म्हणणे व कागदपत्रे सादर करावे व स्वतःची हरकत, तक्रार नोंदवावे. सदर नमूद मुदतीत कोणाचाही कसलीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राहय धरुन आमचे अशिल हे सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मग त्यानंतर कोणाचेही तक्रार किंवा हरकत चालणार नाही व ते आमचे अशिलांच्या हक्कावर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली दि. १२/0६/२0२५.**

**सही/-**
**ॲड. एफ.एस. कडेचुर**
**B.A.LLB.,LLM**
**प्लॉट नं. 0१, मुमताज नगर, कुमठा नाका, सोलापूर - ४१३00६.**
**मो. ९८९0३९८१५५**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि ।। व सब डि ।। सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी महानगरपालिका हद्दवाढ मधील जुना विडी घरकुल येथील पुणे गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ पुणे यांचे मार्फत जुळे सोलापूर भाग-२ या योजनेतील विडी कामगाराचे अल्प उत्पन्न गटातील जा.क्र/का.अ./मि.व्य./H/२७७/१९८८ दि.0८/0२/१९८८ रोजीचे आदेशाप्रमाणे जुळे सोलापूर भाग-२ या योजनेतील विडी कामगाराचे अल्प उत्पन्न गटातील एच-ग्रुप या ग्रुपमधील भूखंड/गाळा क्र. २१८५ असून सोडत क्र.२६९६ व अर्ज नं. २२९७ असून एकूण क्षेत्र ४९.५0 चौ.मी. असून यांसी चतुः सिमा पुढीलप्रमाणे पूर्वेस भूखंड गाळा नं.२१८६, पश्चिमेस : भूखंड / गाळा नं. २१८४ दक्षिणेस ९ मीटर रस्ता, उत्तरेस भूखंड गाळा नं. २१७0 अशी सदरहू मिळकत सौ. इंदुबाई हेमंत आडकी यांचे मालकी व कब्जेवाहिवाटीची होती. सौ. इंदुबाई हेमंत आडकी यांनी सदरहू घरकुल मिळकत आमचे अशिल नं. १ व २ यांची आई अशिल नं. ३ यांची पत्नी यांच्या नावे देण्याचे ठरवून त्याप्रमाणे दि.२२/0९/१९९४ रोजी रक्कम स्विकारुन रितसर आमचे अशिल नं. १ व २ यांची आई अशिल नं. ३ यांची पत्नी यांचे नावे खरेदीपत्र लिहून दिलेले आहे.

सदर खरेदी खतानुसार आमचे अशिलांच्या नावाची नोंद पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ सोलापूर येथिल दप्तरी होणेकरीता म्हणून आमचे अशिल हे रितसर अर्ज दाखल करणार आहेत. तरी सदर घरकुल मिळकतीबाबत कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, दान, लिज, टाच, गहाण, जप्ती, बोजा, इसारापावती साठेखत, खरेदीखत, कब्जापावती, पोटगी, करार, मदार, इत्यादी प्रकारचे हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखीस्वरुपात खालील पत्यावर तसेच पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ सोलापूर यांच्या कार्यालयाकडे हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही, कसलीही हरकत/तक्रार न आल्यास सदरहू घरकुल मिळकत हि निर्वेध, निजोखीम आहे असे समजून पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ सोलापूर हे त्यांचे दप्तरी आमचे अशिलाच्या नावाची नोंद करतील. तद्नंतर येणाऱ्या हरकती चालणार नाहीत. कोणाचीही कसलीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहिर नोटीस देत आहे, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली दि. ११/0६/२0२५.

**सही/-**
**श्री. अश्विन एस. कोंगारी (ॲडव्होकेट)**
**बी.कॉम., एलएल.बी.**
**मो.नं. ९८९0५0३२८१**
**पत्ता- प्लॉट नं. २३, नवनाथ नगर, आकाशवाणी केंद्र रोड, सोलापूर अशिलातर्फे ॲडव्होकेट**

### करमाळा नगरपरिषद, करमाळा
### जाहिर लिलाव प्रसिध्दीकरण

जा.क्र.मिळकत /६५५/२0२५ दि.९/६/२0२५

करमाळा नगरपरिषदेच्या मिळकत विभागाकडील वार्षिक दैनिक रस्ता फी, आठवडा बाजार फी व दैनंदिन भाजी मंडई वसुली करणेसाठी जाहिर लिलाव करण्यात येत आहेत. तरी इच्छुकांनी खालील तपशीलप्रमाणे बोली बयाणा रक्कम भरुन लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावा, बोली रक्कमे शिवाय लिलावामध्ये भाग घेता येणार नाही.

बोली बयाणा रक्कम भरण्याची मुदत दि. १८/0६/२0२५ रोजी दुपारी ४.00 वाजेपर्यंत राहिल. लिलावाच्या अटी व शर्ती मिळकत विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील, लिलाव मंजूर अथवा लिलाव संपूर्ण रद्द करण्याचा अधिकार नगरपरिषद कोणतेही कारण न देता राखून ठेवत आहे. सदर लिलाव प्रक्रिया ही वार- बुधवार दि. १९/0६/२0२५ रोजी सकाळी ११.00 वाजता नगरपरिषदेच्या श्री ज्ञानेश्वर वाचनालयामध्ये होईल.

| अ. क्र. | तपशील | सरकारी किंमत (वार्षिक) | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | दैनिक रस्ता फी वसुली | 5,44,500/- | 10,000/- |
| 2 | दैनिक भाजी मंडई वसुली | 3,93,250/- | 5,000/- |
| 3 | आठवडा बाजार वसुली | 9,74,050/- | 20,000/- |

**सही/-**
**(सचिन तपसे)**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**

### जाहीर प्रसिध्दीकरण

सिव्हील एम. ए. नं. १३/२0२५

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डी. यांचे कोर्टात**

**कु. शिल्पा श्रीशैल मुत्तगी**
रा. गुरववाडी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
ह.मु. रेल्वे पुलाजवळ, ७, आशीर्वाद नगर, मजरेवाडी, सोलापूर — **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** --- **सामनेवाले**

ज्या अर्थी वरील अर्जदारानी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. १३/२0२५ हा दि. बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र प्रमाणे दाखल केला असून यातील अर्जदाराचा भाऊ बसवराज श्रीशैल मुत्तगी याचे देखील दि. २८/0५/२0१७ रोजी निधन झाले आहे. अर्जदार हेच मयत बसवराज श्रीशैल मुत्तगी यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसा प्रमाणपत्र मिळावे म्हणून यातील अर्जदारांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३0 दिवसांत अथवा दिनांक ११/0७/२0२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल. येणेप्रमाणे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. ११/0६/२0२५

**आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने प्रसिद्ध केले.**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**अक्कलकोट**

### जाहीर समन्स/नोटीस

आर.टी.एस. अपील नं. १00/२0२२
संगणक क्रमांक १५७/२0२२
पुढील नेमलेली तारिख १६/0७/२0२५

**सोलापूर येथील उपविभागीय अधिकारी साहेब, यांचे कोर्टात**

**श्री. बसवलिंग शांताप्पा शिलवंत,**
वय ३६ वर्षे, धंदा- शेती, व्यापारा, रा. वाणी गल्ली, आझाद चौक, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अपेलंट**

**विरुध्द**

१) **श्री. शरणाप्पा मुरगेप्पा शिलवंत,**
वय- ५0 वर्षे, धंदा- शेती, रा. वाणी गल्ली, आझाद चौक, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **श्री. मानतेश गंगाधर शिलवंत,**
वय- ३४ वर्षे, धंदा- शेती, रा. वाणी गल्ली, आझाद चौक, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
३) **श्री. मडोळप्पा गंगाधर शिलवंत,**
वय- ४४ वर्षे, धंदा- शेती, व्यापार, रा. वाणी गल्ली, आझाद चौक, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर — **रिस्पॉंडट**

ज्याअर्थी, अपेलंट यांनी रिस्पॉइंट नं. १ ते ३ यांचे विरुध्द मा. तहसिलदार, बार्शी यांचे कोर्टातील क्र. जमा २३/रस्ता/५/एसआर/१९/२0२0 कामी दि. २८/0१/२0२२ रोजी दिलेला निकाल रद्द व्हावा व वाद विषयक रस्त्यावर रिस्पॉंडट यांनी केलेला अडथळा दूर करुन सदरचा रस्ता पुर्ववत वहिवाटीकरीता कायमस्वरुपी खुला करावा, त्याबाबत सोलापूर येथील उपविभागीय अधिकारी यांचे कोर्टात अपील दाखल केलेले आहे. सदर अपीलाचे कामी रिस्पाँडंट नं. १ व २ यांना रजिस्टर पोस्टाची नोटीस मिळालेली असून, रिस्पॉंडट नं. १ हे कोर्टात हजर झालेले आहेत. मात्र, रिस्पॉंडट नं. ३ यांना रजिस्टार पोस्टाने नोटीस पाठवूनही ते कोर्टात हजर झालेले नाहीत. तसेच त्यांचा सध्याचा ठावठिकाणा माहित नसल्याने नोटीसची बजावणी झालेली नाही. त्यामुळे रिस्पॉंडट नं. ३ यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

ज्याअर्थी, सदर जाहीर समन्स/नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३0 दिवसांचे आत किंवा नेमलेली तारिख १६/0७/२0२५ रोजी सदरकामी रिस्पॉंडट नं. ३ यांनी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल करावेत. मुदतीत तुमची हरकत वा म्हणणे आले नाही, तर तुम्हांस काही सांगणे नाही, असे समजून तुमचे गैरहजेरीत पुढील चौकशी होवून न्याय-निर्णय होईल. कळावे, हे जाहीर समन्स/नोटीस मे. कोर्टाचे सही-शिक्क्यानिशी दिली असे. दि.0४/0६/२0२५

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**मा. उपविभागीय अधिकारी साहेब,**
**उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र. १**
**सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# स्मिथ, वेबस्टरची अर्धशतके

## आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद अंतिम सामना प्रारंभ


स्टीव्ह स्मिथ


ब्यू वेबस्टर

◆ **लंडन, ११ जून**

क्रिकेटची पंढरी लॉर्ड्स मैदानावर बुधवारपासून आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान अंतिम कसोटी सामन्याला प्रारंभ झाला असून स्टीव्ह स्मिथ व ब्यू वेबस्टरच्या दमदार अर्धशतकांच्या बळावर ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध चहापानापर्यंत ५० षटकांत ५ बाद १९० धावांपर्यंत मजल मारली होती. कॅगिसो रबाडाने तळाच्या फळीतील फलंदाजांना बाद केल्यामुळे ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव ५६.४ षटकांत २१२ धावांत आटोपला. ब्यू वेबस्टरने ९२ चेंडूंत ११ चौकारांसह ७२ धावांची खेळी केली. रबाडाने ५१ धावांत ५ बळी, तर मार्को जॅनसेनने ४९ धावांत ३ बळी टिपलेत.

दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित कॅगिसो रबाडाने सामन्याच्या प्रारंभीच ऑस्ट्रेलियाला दोन जबरदस्त हादरे दिले. रबाडाने सलामीवीर उस्मान ख्वाजा (०) व कॅमेरून ग्रीनला (४) अल्पधावसंख्येवरच तंबूत परत पाठविले. मार्नस लॅबुशेन (१७) व ट्रॅव्हिस हेड (११) या दोन फलंदाजांना मार्को जॅनसेनने आपले लक्ष्य करून ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजीची हवाच काढून घेतली. उपहाराच्या वेळी ऑस्ट्रेलियाची २३.२ षटकांत ४ बाद ६७ धावा अशी अवस्था झाली होती, परंतु त्यानंतर स्टीव्ह स्मिथ व ब्यू वेबस्टरने आपले अनुभव पणाला लावून संघाचा डाव सावरण्याचा चांगला प्रयत्न केला.

या दोघांनी पाचव्या गड्यासाठी ७९ धावांची भागीदारी केली. स्टीव्ह स्मिथ खेळपट्टीवर स्थिरावला असताना एडन मार्करामने त्याला आपल्या फिरकीच्या जाळ्यात ओढले व जॅनसेनकडे झेल सोपवण्यास भाग पाडले. स्टीव्ह स्मिथने ११२ चेंडूंचा सामना करत १० चौकारांच्या मदतीने ६६ धावांची खेळी केली. ◂(वृत्तसंस्था)


विजयानंतर विजयाचा जल्लोष करताना भारतीय महिला संघातील खेळाडू

# युरोपच्या दौऱ्यात भारतीय कनिष्ठ महिला संघाचा सलग दुसरा विजय

◆ **ॲण्टवर्प. ११ जून**

भारतीय कनिष्ठ महिला हॉकी संघाने बेल्जियमवर २-१ असा विजय मिळवत युरोपियन दौऱ्यात सलग दुसरा विजय नोंदवला.

हॉकी सेंटर ऑफ एक्सलन्स येथे झालेल्या सामन्यात पूर्वार्धातील खेळ गोलशून्य बरोबरीत राहिल्यानंतर भारताकडून लालथंतलुआंगी (३५) आणि गीता यादवने (५०) गोल केले.

लालथंतलुआंगीने पेनॉल्टी स्ट्रोकवर यशस्वीरित्या रूपांतर केल्यानंतर भारताने पहिला गोल केला. शेवटच्या चरणात व्हॅन हेलेमोंटने (४८) मैदानी गोलद्वारे बरोबरी साधली. तथापि, दोन मिनिटांनंतर, गीताने मैदानी गोलने प्रत्युत्तर दिले आणि भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. त्यानंतर भारताने शेवटच्या १० मिनिटांत बेल्जियमच्या हल्ल्यांना तोंड देण्यासाठी चांगला बचाव केला.

पहिल्या सामन्यात भारताने बेल्जियमवर ३-२ असा विजय मिळवला होता आणि पाहुण्या संघ १२ जून रोजी तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात त्यांच्या युरोपियन समकक्षांशी खेळेल. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### ऑस्ट्रेलिया सलग सहाव्यांदा विश्वचषकासाठी पात्र



**मेलबर्न** : सौदी अरबमध्ये कॉनर मेटकाफने ऑस्ट्रेलियासाठी पहिला गोल केला आणि मिशेल ड्यूकने सौदी अरेबियामध्ये २-१ असा विजय मिळवला. या विजया ब रोबरच ऑस्ट्रेलियाने सलग सहाव्यांदा फुटबॉल विश्वचषकासाठी पात्रता मिळविली. २०२६ च्या स्पर्धेत थेट प्रवेश मिळवण्यासाठी पाच गोलचा पराभव टाळायचा होता, तेव्हा ऑस्ट्रेलियाने रॅली काढली व मेटकाफने डाव्या पायाने केलेल्या गोलने मध्यंतराच्या अगदी काही क्षणांपूर्वी बरोबरी साधली. ड्यूकने ४८ व्या मिनिटाला हेडरने त्यांना आघाडी मिळवून दिली. १९ मिनिटांनंतर अब्दुलरहमान अल ओबौदने सौदीसाठी सुरुवात केली. ऑस्ट्रेलियासाठीच्या आपल्या १०० व्या आंतरराष्ट्रीय सामन्यात गोलरक्षक मॅट रायनने उशिरा पेनॉल्टीसह पाच बचाव केले. ऑस्ट्रेलियाने २०१८ व २०२२ मध्ये प्लेऑफमध्ये स्थान मिळनविल्यामुळे त्यांना थेट प्रवेश मिळाला. आम्ही पहिला भाग पूर्ण केला आहे. आपोआप पात्रता मिळविली. आता पुढचा भाग विश्वचषकासाठी मोठा आणि चांगला असेल, असे ऑस्ट्रेलिया संघाचे प्रशिक्षक टोनी पोपोविच म्हणाले.

### भाम्बरी-गॅलोवे जोडी बॉस ओपनमधून बाहेर

**स्टुटगार्ट** : भारताचा प्रथम क्रमांकाचा दुहेरीचा टेनिसपटू युकी भाम्बरी व त्याचा अमेरिकन जोडीदार रॉबर्ट गॅलोवेनेला येथे आयोजित बॉस ओपन टेनिस स्पर्धेच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत पराभव पत्करावा लागला. दोन्ही सेट टायब्रेकरने निश्चित झालेल्या सामन्यात, इंडो-अमेरिकन जोडीला मेक्सिकोच्या सॅण्टियागो गोन्सालव्हिस व अमेरिकेच्या ऑस्टिन क्राजिसेक या जोडीकडून एक तास व ३४ मिनिटांत ६-७ (५) ६-७ (५) असा पराभव पत्करावा लागला. अनुभवी रोहन बोपण्णा व एन. श्रीराम बालाजी त्यांच्या संबंधित भागीदारांसह स्पर्धा करत असल्याने स्पर्धेत भारताचे आव्हान अजूनही जिवंत आहे. बालाजी आणि त्याचा मेक्सिकन जोडीदार मिगुएल रेयेस-वरेला हे दुसऱ्या मानांकित फ्रेंच जोडी सॅण्डिओ डौम्बिया व फॅबियन रेबोल यांच्याविरुद्ध लढत देत आहेत. ४५ वर्षीय बोपण्णाने बेल्जियमच्या सॅण्डर गिलसोबत भागीदारी केली आहे आणि त्यांची लढत जेकोब श्नायटर आणि मार्क वॉलनर या स्थानिक जोडीशी होईल.

### यू मुम्बा उपांत्य फेरी गाठण्यास उत्सुक

**अहमदाबाद** : यू मुम्बा टीटी गुरुवारी अल्टीमेट टेबल टेनिस (यूटीटी) मध्ये प्लेऑफमध्ये जाणाऱ्या दबंग दिल्ली टीटीसीशी सामना करताना उपांत्य फेरीत प्रवेश करण्यासाठी उत्सुक असेल. दिल्लीसाठीही बरेच काही असून ते इतिहासातील अपराजित संघ होण्याचे लक्ष्य ठेवत आहेत. यू मुम्बा ३२ गुणांसह गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आहे; त्यांच्या प्लेऑफच्या संधी केवळ विजयावरच नाही, तर जयपूर पॅट्रियट्स विरुद्ध पीबीजी पुणे जग्वार्स सामन्याच्या निकालावर देखील अवलंबून आहेत. पाच सामने पुरेसे असू शकतात, परंतु मुंबईच्या संघासाठी लढाईपेक्षा कमी काहीही काम करणार नाही. बर्नाडेट स्झोक्स, लिलियन बार्डेट आणि यशस्विनी घोरपडे हे सर्व मजबूत फॉर्ममध्ये असलेल्या स्टॅनलीच्या चेन्नई लायन्सवरच्या दमदार विजयाने ते उत्साहित झाले आहेत.


पात्रता फुटबॉल सामन्यात पॅराग्वेविरुद्ध गोल करण्याचा प्रयत्न करतना ब्राझीलचा मार्टिनेली (मध्यभागी)

# ब्राझील फिफा विश्वचषकासाठी पात्र

◆ **साओ पाऊलो, ११ जून**

साओ पाउलो येथील करिंथियन्स अरेना येथे ब्राझीलने पॅराग्वेचा १-० असा पराभव करून पुढील वर्षीच्या फिफा विश्वचषकासाठी पात्रता निश्चित केली.

ब्राझील आता १६ सामन्यांतून २५ गुणांसह क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर आहे. ब्राझीलने अव्वल सहामध्ये स्थान मिळविल्यामुळे फिफा विश्वचषकासाठी स्वयंचलित पात्रता निश्चित झाली आहे.

रिअल माद्रिदचा फॉरवर्ड व्हिनिसियस ज्युनियरने ४४ व्या मिनिटाला मॅथ्यूस कुन्हाच्या जवळून पासवर टॅप करून सामन्यातील एकमेव गोल केला.

हा विजय कार्लो अँसेलोटीचा ब्राझीलचे मुख्य प्रशिक्षक म्हणून पहिला विजय होता. हा विजयी गोल त्यांच्या घरच्या मैदानावर पदार्पणात नोंदवण्यात आला. ◂(वृत्तसंस्था)

# मनू भाकर सहाव्या स्थानी

**म्युनिक** : येथे झालेल्या आयएसएसएफ विश्वचषक ने बाजी स्पर्धेत महिलांच्या २५ मीटर पिस्तूलच्या अंतिम फेरीत मनू भाकरला पदक मिळवता आले नाही. या स्पर्धेत तिने सहावे स्थान मिळविले. दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकरने ५८८ गुणांसह उच्च गुणांसह पात्रता मिळवली, परंतु २५ मीटर स्पोर्ट्स पिस्तूलच्या अंतिम फेरीत ती सहाव्या स्थानावर राहिली. मनूला अंतिम फेरीत पुढे जाण्याची संधी हुकली कारण तिला कोरियाच्या कांस्यपदक विजेत्या यांग जीनकडून एका गुणाने पराभव पत्करावा लागला. चीनच्या २० वर्षीय सुन युजीने कोरियाच्या ओह येजिनला ३८-३६ असे हरवून सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक साजरी केली.

# ऐतिहासिक लॉर्ड्सवर घंटा वाजवण्याचा विशेषाधिकार : जय शाह

◆ **लंडन, ११ जून**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष जय शाह यांनी बुधवारी लंडनच्या प्रतिष्ठित लॉर्ड्स स्टेडियमवर घंटा वाजवून दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यादरम्यानच्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्याला सुरुवात केली.

डब्ल्यूटीसी अंतिम सामन्याच्या पहिल्या दिवशी खेळ सुरू होण्यापूर्वी ऐतिहासिक लॉर्ड्स मैदानावर घंटा वाजवण्याचा विशेषाधिकार आहे.


लॉर्ड्सवर डब्ल्यूटीसी अंतिम सामन्याच्या प्रारंभी घंटा वाजवताना आयसीसीचे अध्यक्ष जय शाह



# भावसार युथ फौंडेशनच्या स्व-संरक्षण शिबीराचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून-**

भावसार युथ फौंडेशनच्या वतीने शहरातील युवक-युवतीच्या ''स्व-संरक्षण'' शिबीराचा समारोप जेलरोड पोलिस ठाणे ए.पी.आय. ज्योत्स्ना भाबिंष्टे यांच्या हस्ते झाला. यावेळी भावसार सम ाजाचे माजी अध्यक्ष विजय पुकाळे, उपाध्यक्ष साई क्षिरसागर, शैक्षणिक मार्गदर्शक योगीन गुर्जर, पंचवटी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिलीप पतंगे, स्वातंत्र्य सैनिक सिद्रामप्पा फुलारी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष योगीनाथ भैय्या फुलारी, मार्गदर्शक डॉ. मनोजराजे गायकवाड आदी उपस्थित होते.

हे शिबीर हे पूर्व भागातील विणकर बाग, साखर पेठ येथे १८ मे पासून सुरू होते. हे शिबीर पंधरा दिवसीय अनिवासी स्वरूपाचे होते. या शिबीरात सहभागी झालेल्या शिबिरार्थी यांना लाठी-काठी, तलवार व दांडपट्टा हे पारंपारिक शिवकालीन युध्द कलेचे प्रशिक्षण आनंदभाऊ मुसळे यांच्या मार्गदर्शनाखाली कुशल प्रशिक्षक विवेक मिस्कीन यांनी दिले. या प्रशिक्षणात सुमारे ११४ युवक-युवती यांचा सहभाग होता.

प्रास्ताविक भावसार युथ फौंडेशनचे अध्यक्ष सचिन दुधनकर यांनी केले. सुत्रसंचालन प्रमोद चिंचुरे केले. फौंडेशनचे सचिव रितेश क्षिरसागर यांनी आभार मानले. शिबीर यशस्वी होण्यासाठी अंबरिश पुकाळे, संदिप बेळमकर, शरद बोंडगे, अमोल कटारे, गणेश झिंगाडे, संतोष पुकाळे, विकास माळवदकर, ओम खोकले, रोहन बासुतकर, नितीन बोंडगे, स्वप्नील हंचाटे, सत्यम दुधनकर, राम क्षिरसागर, प्रविण पतंगे, विजय महिंद्रकर आदिंनी परिश्रम घेतले.

# तिलक वर्मा तिसऱ्या स्थानावर

### आयसीसी टी-२० फलंदाजांची क्रमवारी

### गोलंदाजांमध्ये रशीद दुसऱ्या स्थानावर

◆ **दुबई, ११ जून**

भारताचा तिलक वर्मा आयसीसी पुरुष टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत एका स्थानावर चढून तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे, तर फिरकीपटू वरुण चक्रवर्ती व रवी बिश्नोई बुधवारी जाहीर झालेल्या ताज्या गोलंदाजी क्रमवारीत अनुक्रमे तिसऱ्या आणि सातव्या स्थानावर आहेत. तिलकचे आता ८०४ रेटिंग गुण आहेत, तो दुसऱ्या स्थानावर असलेल्या अभिषेक शर्माच्या मागे आहेत. ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड फलंदाजीच्या क्रमवारीत आघाडीवर आहे, तर सहाव्या स्थानावर घसरलेला सूर्यकुमार यादव हा अव्वल १० मध्ये एकमेव भारतीय आहे.

गोलंदाजी क्रमवारीत चक्रवर्ती (७०६) व बिश्नोई (६७४) व्यतिरिक्त, डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग देखील ६५३ गुणांसह अव्वल १० मध्ये आहे.

**हार्दिक अष्टपैलूंमध्ये आघाड़ीवर**

हार्दिक पांड्या २५२ रेटिंग गुणांसह अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत आघाडीवर आहे.

इतर खेळाडूंमध्ये, वेस्ट इंडीजविरुद्धच्या ३-० टी-२० मालिकेतील विजयात इंग्लंडचा आदिल रशीदने गोलंदाजी क्रमवारीत एका स्थानाने प्रगती केली आहे.



३७ वर्षीय या गोलंदाजाने चेस्टर-ले-स्ट्रीटमध्ये २२ धावा, ब्रिस्टलमध्ये ५९ धावा आणि साउथहॅम्प्टनमध्ये ३० धावा घेऊन वानिन्दु हसरंगा आणि चक्रवर्ती यांना मागे टाकले आहे. रशीदचे आता ७१० गुण आहेत, ते न्यूझीलंडच्या अव्वल क्रमांकाच्या जेकब डफी (७२३) पेक्षा केवळ १३ गुणांनी मागे आहेत. रशीदचा सहकारी ब्रायडन कार्से यानेही गेल्या दोन सामन्यात दोन बळी घेत १६ स्थानांनी प्रगती केली आहे आणि ४९३ गुणांसह ५२ व्या स्थानावर पोहोचला आहे.

इंग्लंडचा बेन डकेट शेवटच्या टी-२० सामन्यात ४६ चेंडूत ८४ धावा काढल्यानंतर ४८ स्थानांनी प्रगती करत १६ व्या स्थानावर पोहोचला आहे, तर हॅरी ब्रूक मालिकेत ३५ आणि ३४ धावा काढल्यानंतर सहा स्थानांनी प्रगती करत संयुक्त ३८ व्या स्थानावर पोहोचला आहे. वेस्ट इंडीजसाठी, कर्णधार शाई होपने ४० च्या दशकात दोन खेळी करून १४ स्थानांनी प्रगती करत १५ व्या स्थानावर झेप घेतली. ◂(वृत्तसंस्था)

# सुब्रोतो कप फुटबॉल स्पर्धेने शालेय स्पर्धेस सुरवात

**२५ जूनपासून वालंचदच्या मैदानावर सुरू, १९ जूनपर्यंत नोंदणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ११ जून-**

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर २५ जूनपासून सुरू होणाऱ्या सुब्रोतो मुखर्जी करंडक फुटबॉल स्पर्धेने यंदाच्या शैक्षणिक वर्षातील शालेय क्रीडा स्पर्धेस सुरवात होईल.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धे त सहभागी होणाऱ्या खेळाडूंसाठी १५ वर्षाखालील मुले हे १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले तर १७ वर्षाखालील मुले, मुलींसाठी १ जानेवारी २००९ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले खेळाडू पात्र आहेत. १५ वर्षे मुलांची स्पर्धा २५ जून रोजी आणि १७ वर्षे मुले व मुलींची स्पर्धा २६ जून रोजी होईल. स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता www.subrotocup.in या संकेतस्थळावर खेळाडू व संघाची नोंदणी १९ जूनपर्यंत करणे अनिवार्य आहे. प्रत्येक सहभागी संघानी रुपये २ हजार व स्पर्धेच्या प्रवेशिका १९ जूनपर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कुमठा नाका सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत जमा करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.



नोंदणी केलेल्या संघानी स्पर्धे दिवशी सकाळी ९ वाजता वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर उपस्थित रहावे.

आधिक माहितीसाठी संघानी जिल्हा फुटबॉल संघटना प्रतिनिधी किरण दुस्तकर (मोबाईल ८७८८१९२१२४ किंवा मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड (मोबाईल ७२१९१५७२७२) यांच्याशी संपर्क साधावा.




### राग‍िणी वुमेन्स क्रिकेट क्लबच्या अध्यक्षपदी सुभाष चव्हाण, अमृत हत्ताळे उपाध्यक्ष

**सोलापूर** : रागिणी वुमेन्स क्रिकेट क्लबच्या अध्यक्षपदी सुभाष चव्हाण उपाध्यक्षपदी अमृत हताळे तर सचिवपदी संस्थापक मल्लिनाथ याळगी यांची निवड झाली. डॉ. शिरिष कुमठेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पदाधिकाऱ्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणुन आदिती नारायणकर, स्वप्नील भोसले, संजय हलकट्टी, रामेश्वर याळगी व विवेक चव्हाण यांची निवड झाली. विवेक चव्हाण यांनी आभार मानले. अध्यक्ष सुभाष चव्हाण म्हणाले, गतवर्षीप्रमाणे यंदाही राष्ट्रीय पातळीवरील क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच मुलींना मोफत क्रिकेट प्रशिक्षण नेहरूनगर येथील सुशीलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर देण्यात येईल इच्छुकांनी मल्लिनाथ याळगी ९७३०८७२०८७ यांच्याशी संपर्क साधावा.

# महाराष्ट्र महिला प्रीमियर लीग स्पर्धेत सोलापूर स्मॅशर्सचा अंतिम फेरीत प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, ११ जून -**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित अदानी महिला महाराष्ट्र प्रीमियर लीग (डब्लूएमपीएल) २०२५ स्पर्धेत सातव्या दिवशी ईश्वरी सावकार (७८धावा), ईश्वरी अवसरे (५२धावा) यांनी केलेल्या दमदार खेळीच्या जोरावर सोलापूर स्मॅशर्स संघाने रायगड रॉयल्स संघाचा ३० धावांनी पराभव केला. सोलापूर स्मॅशर्स संघाने गुणतालिकेत ४विजय, १ पराभवसह दुसरे स्थान कायम राखत अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत रायगड रॉयल्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सोलापूर स्मॅशर्स संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात २बाद १६९ धावांचे आव्हान उभे केले. ईश्वरी सावकार व ईश्वरी अवसरे यांनी ७६चेंडूत ९६ धावांची सलामी देत संघाला भक्कम सुरुवात करून दिली. ईश्वरी सावकारने ५३ चेंडूत ७८ धावांची विक्रमी खेळी केली. याआधी ईश्वरी सावकाराने रत्नागिरी जेट्स विरुद्ध ७५ धावांची खेळी केली होती. तिला ईश्वरी अवसरेने ४४ चेंडूत ५२ धावांची आक्रमक खेळी करून साथ दिली. तिने ६ चौकार व २ उत्तुंग षटकार खेचले. ईश्वरी अवसरेला १३ व्या षटकात आदिती गायकवाडने पायचीत बाद केले. त्यानंतर ईश्वरी सावकारने शाल्मली क्षत्रिय (नाबाद ३२) च्या साथीत दुसऱ्या विकेटसाठी ४३ चेंडूत ७० धावांची भागीदारी करून संघाला १६९ धावांचे आव्हान उभारुन दिले. रायगड रॉयल्सकडून प्रज्ञा वीरकर १-२३, आदिती गायकवाड १-२७) यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. विशेष म्हणजे या स्पर्धेत रायगडच्या जान्हवी वीरकरने दुसरे षटक निर्धाव टाकले.




या आव्हानाचा पाठलाग करताना रायगड रॉयल्स संघाला २० षटकात ९ बाद १३९धावापर्यंत मजल मारता आली. पॉवरप्लेमध्ये किरण नवगिरे (१८), भाविका आहिरे (१०), श्रावणी देसाई (२) हे बाद झाल्याने रायगड रॉयल्स ३बाद ४३ धावा अशा स्थितीत होता. त्यानंतर आयेशा शेखने एकाबाजूने लढताना २५ चेंडूत २चौकार व ३षटकारासह ४१ धावांची खेळी केली. तिला प्रज्ञा वीरकरने १६ धावा काढून साथ दिली. या जोडीने २६चेंडूत ३८ धावांची भागीदारी केली. सोलपूरच्या मुक्ता मगरेने आयेशा शेखला झेल बाद करून रायगड रॉयल्स अडचणीत टाकले. यशोदा घोगरे(१४), इशा पठारे (१३) ने थोडासा प्रतिकार केला. सोलापूर स्मॅशर्सकडून शरयू कुलकर्णी (२-२१), मुक्ता मगरे (१-६), गायत्री सुरवसे (१-१९), शाल्मली क्षत्रिय (१-१९) यांनी सुरेख गोलंदाजी केली.



**संक्षिप्त धावफलक**

**सोलापूर स्मॅशर्स** : २० षटकात २ बाद १६९धावा (ईश्वरी सावकार ७८ (५३,१४४), ईश्वरी अवसरे ५२ (४४,६४,३६), शाल्मली क्षत्रिय नाबाद ३२ (२३,५४), प्रज्ञा वीरकर १-२३, आदिती गायकवाड १-२७) वि.वि. **रायगड रॉयल्स** : २० षटकात ९ बाद १३९ धावा (आयेशा शेख ४१ (२५,२४,३६), किरण नवगिरे १८, प्रज्ञा वीरकर १६, यशोदा घोगरे १४, इशा पठारे १३, भाविका आहिरे १०, शरयू कुलकर्णी २-२१, मुक्ता मगरे १-६, गायत्री सुरवसे १-१९, शाल्मली क्षत्रिय १-१९); सामनावीर - ईश्वरी सावकार.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### अनधिकृत आपले सरकार सेवा केंद्रा विरोधात लाक्षणिक उपोषण

**बार्शी, दि. ११ जून-**

बार्शी तहसील कार्यालय क्षेत्रातील अनधिकृत आपले सरकार सेवा केंद्रांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी दिपाली सचिन क्षिरसागर यांनी बुधवारी तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण केले. कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. दिपाली क्षिरसागर यांचे बार्शीत केदारनाथ आपले सरकार महा-ई-सेवा केंद्र, डी.वाय.एस.पी. कार्यालयाशेजारी आहे. त्यांनी दि. ९ जून रोजी तहसीलदारांकडे काही व्यक्ती शासनाने मंजूर केलेल्या ठिकाणांऐवजी बेकायदेशीरपणे आपले सरकार सेवा केंद्रे चालवत असल्याची तक्रार दिली होती. शासनाने नागरिकांच्या सोयीसाठी आपले सरकार सेवा केंद्रे सुरु केली असून, पात्र उमेदवारांना त्यासाठी परवानगी दिली आहे. मात्र, काही केंद्रे मंजूर ठिकाणांऐवजी अनधिकृत ठिकाणी चालवली जात आहेत. याबाबत तातडीने तपासणी करुन कारवाईची मागणी त्यांनी केली आहे. तक्रारीकडे दुर्लक्ष झाल्यास त्या पती सचिन क्षिरसागर यांच्यासह उपोषण करतील असा इशारा त्यांनी दिला होता. तक्रारीनंतर तहसीलदारांनी दि. ११ जून रोजी मंडळ अधिकाऱ्यांना तपासणीचे आदेश दिले. या उपोषणामुळे परिसरात चर्चेला उधाण आले होते. स्थानिक नागरिकांनी पाठिंबा दर्शवला असून, अनधिकृत सेवा केंद्रांमुळे होणाऱ्या गैरसोयीबाबत नाराजी व्यक्त केली आहे.



### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

**पंढरपूर, दि.११ जून -**

राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी बुधवारी श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी परिवहन मंत्री सरनाईक यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

### हिवताप प्रतिरोधबाबत जनजागृती; प्रतिबंधात्मक उपाययोजनेचे अरोग्य विभागाचे आवाहन

**मंगळवेढा, दि.११ जून-**

जून महिन्यामध्ये डासांची वाढ होण्यासाठी पोषक वातावरण असल्याने डासांपासून होणारे मलेरिया, डेंगू, चिकन गुनिया, मेंदूज्वर असे प्राणघातक ठरू शकणारे आजार वाढू शकतात. रोगांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रत्येकाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भाऊसाहेब जानकर यांनी केले आहे. आरोग्य विभागामार्फत १ जून ते ३० जून हिवताप प्रतिरोध जनजागृती महिना साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने हिवताप विषयी नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण होऊन शहरात व परिसरात कीटकजन्य रोगाचा प्रादुर्भाव होणार नाही यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात




राबविण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जिल्हा हिवताप अधिकारी शुभांगी आधटराव व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भाऊसाहेब जानकर यांनी केले आहे. आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळणे, घरगुती पाणी साठे, हौद, टाकी आदि स्वच्छ कोरडी करून भरणे. डास उत्पत्ती ठिकाणी गप्पी मासे सोडणे. टाकाऊ वस्तु, फुटक्या बादल्या, डबे, करवंट्या, टायर, प्लास्टिक पिशव्या इत्यादी वस्तू उघड्यावर न टाकता नष्ट करणे. घरातील कुलर, फ्रीज स्वच्छ करणे, मच्छरदाणीचा वापर करणे तसेच ताप आल्यास हिवतापासाठी रक्ताची तपासणी शासकीय दवाखान्यात मोफत करणे आदि उपाययोजना कराव्यात. याशिवाय प्रत्येकाने वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेवर भर देण्याची गरज आहे. सध्या पावसाळा सुरू झाल्याने जागोजागी पाण्याचे डबके तयार होत आहेत. घरातही अनेक डबे, टायर, प्लास्टीक पिशव्या यामध्ये घाण पाणी साठून राहत आहे. त्यामुळे घरातील परिसराची व बाहेरील परिसराची स्वच्छता ठेवल्यास हिवतापादि आजारापासून दूर राहता येईल त्यामुळे यावर प्रतिबंधात्मक उपाय करण्याचे आवाहन आरोग्य विभाग पंचायत समिती मंगळवेढा मार्फत करण्यात आले आहे.

## निधन वृत्त...

### राजेंद्र देशपांडे

**सोलापूर, दि. ११ जून-**



सोलापूर रेल्वे विभागातील सेवानिवृत्त अधिकारी राजेंद्र सखाराम देशपांडे (हंजगीकर) (वय ७५) अल्पशा आजाराने रविवार दि. ८ जून रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, बहीण, भाच्चे, मुलगा, मुलगी, सून आणि नात असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मोरे हिंदू (मोदी) स्मशानभूमीत अंत्यसंस्कार झाले. माजी प्राचार्य डॉ. मोहन देशपांडे यांचे ते जेष्ठ बंधू होत.

# यंदा आषाढीसाठी थेट गावातून करा ग्रुप बस बुकींग

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

## ५,२०० विशेष बसेस सोडणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ जून -**

आषाढीसाठी यंदा राज्यातील कोणत्याही गावातून ४० अथवा त्यापेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्राकाळात ५ हजार २०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

आषाढी यात्रा नियोजनासाठी चंद्रभागा बस स्थानक,पंढरपूर येथे एस टी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर व एसटीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते. यावेळी परिवहन मंत्री प्रतापसरनाईक म्हणाले, आषाढी एकादशीला राज्यभरातून लाखो भाविक-प्रवाशी पंढरपुरात येतात. अनेक प्रवाशी स्वत:च्या खाजगी वाहनाने, रेल्वेने, एसटीने अथवा विविध पालखींबरोबर चालत दिंडीने येतात या प्रवाशांना एसटीने यंदापासून थेट गाव ते पंढरपूर अशी बस सेवा उपलब्ध करून दिली आहे. या प्रवासात देखील ७५ वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांसाठी ५० टक्के तिकीट दरात सुट देणारी महिला सन्मान योजना यासारख्या शासनाने दिलेल्या सर्व सवलती लागू राहणार आहेत. तसेच आषाढी यात्रा काळात लांबच्या पल्याहून एसटी बसेस येत असतात. त्या बस चालकांना व वाहकांना राहण्याची चांगली व्यवस्था करावी त्याचबरोबर त्यांना आंघोळीसाठी गरम पाणी उपलब्ध करून द्यावे. बस स्थानकातून बस प्रवाशांना घेऊन जाण्याअगोदर बसची देखभाल दुरुस्ती करावी. एसटी बसच्या तात्काळ दुरुस्तीसाठी ज्यादा तांत्रिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी अशा सूचनाही परिवहन मंत्री सरनाईक यांनी केल्या. भाविक-प्रवाशांनी, एसटीच्या सुरक्षित प्रवासी सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी यावेळी केले.तसेच यात्रा काळात पंढरपूर येथे येणाऱ्या सर्व एसटी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या चहा - नाश्ता व जेवणाची मोफत सोय करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. गतवर्षी एसटीने आषाढी यात्रेनिमित्त ५००० विशेष बसेस सोडल्या होत्या. सुमारे २१ लाख, भाविक प्रवाशांची सुखरूप ने-आन एसटीने केली होती अशी माहिती राज्य परिवहन महामंडळाचे अधिकाऱ्यांनी यावेळी दिली.



### जिल्हानिहाय सोडण्यात येणाऱ्या बसेस

- **चंद्रभागा बसस्थानक** - मुंबई, ठाणे, रायगड, सातारा, पुणे विभाग व पंढरपूर आगार
- **भिमा यात्रा देगाव** - छत्रपती संभाजी नगर, नागपूर व अमरावती प्रदेश
- **विठ्ठल कारखाना** - नाशिक, जळगाव, धुळे, अहमदनगर
- **पांडुरंग बसस्थानक** - सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

### यात्रा कालावधीत चार तात्पूरती बस स्थानके उभारणार

पंढरपूर यात्रेसाठी राज्यभरातील लाखो भाविकांसाठी विविध विभागांतून गाड्या सोडण्यात येणार आहेत. वारकरी, भाविक तसेच पर्यटकांची होणारी गर्दी पाहता एकाच स्थानकावर गर्दी होऊ नये यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठीयात्रा कालावधीत पंढरपूर येथे चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) व विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. दरम्यान, यात्रा काळात बसस्थानकावर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आदी सोयी-सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

### विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लगाम

यात्रा काळामध्ये गर्दीचा फायदा घेऊन तिकीट न काढणे, वाहकाकडून तिकीट मागून न घेणे अशाप्रकारे फुकट प्रवास करू इच्छिणाऱ्या प्रवाशांना लगाम घालण्यासाठी एसटीने पंढरपूरला जाणाऱ्या विविध मार्गावर १२ ठिकाणी तपासणी नाके उभारण्याचे नियोजन केले आहे अशा फुकटया प्रवाशांना अटकाव करण्यासाठी एसटीचे २०० सुरक्षा कर्मचारी व अधिकारी यात्रा काळात २४ तास नजर ठेवूनअसणार आहेत.

### वाहतूकीच्या नियोजनासाठी एसटीची मदत

एकादशीच्या दिवशी लाखो भाविक प्रवासी आपल्या गावाकडे मार्गस्थ होतात अशा वेळी रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊन प्रवासाचा खोळंबा होतो यंदा स्थानिक पोलीस प्रशासनाच्या मदतीने ३६ पेक्षा जास्त वाहतूक नियंत्रक व सुरक्षा रक्षक वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी काम करणार आहेत. त्यामुळे रस्त्यावरील वाहतूक सुरळीत होण्यासाठी पोलीस प्रशासनाला एसटीची मदत होणार आहे.

## शंकरनगरच्या टेलरचा १२ दिवसांनी विहिरीत आढळला मृतदेह

**तभा वृत्तसेवा,**
**अकलुज, दि.११ जून-**

दि. २९ मे रोजी कामासाठी घराबाहेर पडलेले शंकरनगर येथील उमेश गेना काळे ऊर्फ उमेश टेलर यांचा मृतदेह बारा दिवसांनी म्हणजे दि.९ जून रोजी त्यांच्या घरापासुन काही अंतरावर असलेल्या विहरीत आढळून आला.



याबाबत पोलीसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी, यशवंतनगर सुनयनानगर येथील विनोद भागवत काळे यांनी अकलुज पोलीसांत दिलेल्या फिर्यादीवरुन चुलते उमेश गेना काळे (वय- ५४ ) हे त्यांच्यापासून काही अंतरावर कुटुंबासह राहणेस असुन त्यांचे टेलरींगचे स्वत:चे यशवंतनगर येथे दुकान आहे. उमेश गेना काळे हे दि २९ मे रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास त्यांची पत्नी द्रोपदी उमेश काळे यांना खरेदी विक्रीचे कार्यालय अकलुज येथे काम असल्याचे सांगून घरातून निघुन गेले होते. ते परत न आल्याने चुलती द्रोपदी उमेश काळे यांनी दोन जून रोजी अकलुज पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली.

९ जून रोजी सकाळी ११ वा.चे सुमारास विनोद भागवत काळे हे मेडीकल दुकानामध्ये असताना त्यांचा मित्र बापु बनकर याने फोन करून चुलते उमेश गेना काळे हे यशवंतनगर येथील आजिनाथ सावंत यांचे शेतातील विहीरीचे पाण्यामध्ये मयत अवस्थेत तरंगत असल्याबाबत सांगितले. त्यावरून अजिनाथ सावंत याचे विहीरीजवळ जावुन पाहिले असता उमेश गेना काळे हे मयत अवस्थेत विहीरीच्या पाण्यामध्ये तरंगत असल्याचे दिसले. त्यावरून अकलुज पोलीसात बी.एन. एस.कलम १९४ प्रमाणे दाखल करण्यात आले असुन पोलीस पुढील तपास करीत आहेत. शंकरनगरसह अकलुज परीसरात उमेश गेना काळे हे उमेश टेलर नावाने परीचीत होते. त्यांच्या आकस्मिक मृत्युने शंकरनगर परीसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्यावर अकलुज येथील वैकुंठ स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## चिंचोली भोसे येथे वाळू तस्करांच्या जाळल्या होड्या

### तालुका पोलीस व महसूलची संयुक्त कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ जून-**

पंढरपूर तालुका पोलिस आणि महसूल विभागाच्या संयुक्त पथकाने धडाकेबाज कारवाई करीत चिंचोलीभोसे नदी काठावर वाळू तस्करांच्या होड्या जाळून वाळू तस्करांवर मोठी जरब बसवित वाळू तस्करांची कोंडी केली आहे.

येथील उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले तहसीलदार सचिन लंगोटे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी (दि.१० जून) भीमा नदी पात्रात मौजे चिंचोलीभोसे या ठिकाणी पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन आणि येथील महसूल प्रशासनाच्या संयुक्त कारवाईत भीमा नदी पात्रातील बोटी कापून अक्षरश: जाळून त्या नष्ट करण्यात आल्या.



मागील काही वर्षांपासून सोलापूर जिल्ह्यात वाळू माफियांनी सर्वत्र धुमाकूळ माजवून भीमा नदीचे पात्र पोखरले आहे. पंढरपूर येथे नदीत मोठमोठे खड्डे पडल्याने एकाच महिन्यात चार भाविकांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. वाळू चोरीने गबरगंड झालेले माफिया कुणालाच जुमानत नाहीत अनेकदा शासकिय अधिकाऱ्यांच्या अंगावरच वाहने घालण्याचे प्रकार देखील घडले आहेत.

दरम्यान या मोठ्या कारवाईने मुजोर झालेल्या वाळू माफियांवर पोलीस व महसूल प्रशासनाने चांगलीच जरब बसविली आहे. शहर व तालुक्यातून या कारवाईची चर्चा सुरू असून अशा प्रकारच्या कारवाया पोलिस आणि महसूल प्रशासनाकडून वारंवार होणे गरजेचे असून अशा वारंवारच्या कारवाईमुळे वाळु चोरीला कुठेतरी लगाम बसेल, असा आशावाद सर्वसामान्य नागरिकांतून व्यक्त होताना ऐकावयास मिळत आहे.

# शांत, संयमी अन दूरदृष्टी असलेले नेतृत्व : विजयदादा

**माळरानाच्या दगड धोंड्यांना आकार कसा द्यावा,**
**हे अकलूजकर दादांकडून शिकून घे,**
**महाराष्ट्राच्या उज्वल भविष्यासाठी,**
**अकलूजकर दादांच्या विचाराने फक्त एकदा झोकुन दे**

माळशिरसच्या माळरानावर नंदनवन फलवणारे महाराष्ट्राचे थोर नेते सहकार महर्षी कै. शंकरराव नारायणराव मोहिते- पाटील यांचे सुपुत्र माननीय श्री विजयसिंह मोहिते-पाटील हे महाराष्ट्राच्या राजकारणातील मुरब्बी व ज्येष्ठ नेते आहेत. त्यांचा १२ जून २०२५ रोजी ८२ वा वाढदिवस. राजकारण व समाजकारण करीत असताना सभ्यतेची, सौजन्याची, व्यक्तिगत टीका, अनावश्यक असभ्य शेरेबाजी या गोष्टींबद्दल एक विशिष्ट ठराविक पातळी असते. ही ठराविक पातळी आ. विजयदादांनी अद्याप ओलांडली नाही. ते राजकारणात अजात शत्रू राहिले. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना ते आपलेसे वाटतात. वयाच्या १८ व्या वर्षी राजकारणाच्या क्षेत्रात मा. दादांनी प्रवेश केला. १९६९ मध्ये अकलूज ग्रामपंचायतचे त्यांनी सरपंचपद भूषविले. बॅ. कै. बाबासाहेब भोसले यांच्या विस्तारित मंत्रिमंडळात कृषी, पर्यटन व युवक कार्य विभागाचे उपमंत्री म्हणून मा. विजयदादांना मंत्रिमंडळात पहिली संधी मिळाली. हा कार्यकाल १२ ऑक्टोबर १९८२ ते २ फेब्रुवारी १९८३ असा आहे. १९८३ मध्ये पद्मभूषण कै. वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळात पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास विभागाचे राज्यमंत्री म्हणून काम पाहिले. १९८५ मध्ये झालेल्या राज्य विधानसभेच्या निवडणुकीत माळशिरस मतदारसंघातून निवडणूक जिंकून कै. वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळात जलसिंचन, क्रिडा, सहकार व पर्यटन खात्याचे राज्यमंत्री झाले. जुलै १९८५ ते मार्च १९८६ या काळात कै. शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळात कृषी, क्रिडा, पुनर्वसन आणि क्रीडा, युवक कल्याण खात्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून मा. विजयदादांना संधी मिळाली. २५ जून १९८८ ते ६ मार्च १९९३ या काळात सार्वजनिक बांधकाम, राज्य उत्पादन शुल्क, सांस्कृतिक कार्य, पर्यटन, संसदीय कार्य, सहकार, ऊर्जा, परिवहन इत्यादी विविध खात्याचे कॅबिनेट मंत्री पद भूषवले. विविध आठ खात्यांचे एकाच वेळी कॅबिनेट मंत्रीपद भूषवणारे मा.विजयदादा एकमेव नेते असावेत. मा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळात मा. विजयदादा यांनी उत्तम जबाबदारी पार पाडली. २७ डिसेंबर २००३ रोजी उपमुख्यमंत्री म्हणून मा. विजयदादांनी कार्यभार स्वीकारला. १९९५ ते १९९९ या काळात महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष उपनेते म्हणून विजयदादांनी काम पाहिले. १९ ऑक्टोबर १९९९ पासून सार्वजनिक बांधकाम खात्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून दादांनी काम पाहिले. १३ ऑक्टोबर २००४ रोजी झालेल्या अकराव्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून एक लाख ४ हजार ७१२ मताधिक्याने मा. विजयदादा विजयी झाले. ९ नोव्हेंबर २००४ रोजी ग्राम विकास व पर्यटन खात्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून दादांचा शपथविधी पार पडला. मा. विजयदादांनी राज्य व राष्ट्रीय पातळीवरील अनेक मानाची पदे, भूषविले. १६ डिसेंबर २०१० रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघाच्या अध्यक्षपदी दुसऱ्यांदा मा. विजयदादांची निवड झाली. हा काळ साखर कारखानदारी उद्योगासमोर अतिशय खडतर व कठीण होता. परंतु मा. दादांनी शांत व संयमाने समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला व त्यात ते यशस्वी झाले. कृष्णा भीमा स्तरीकरण प्रकल्प. सन २००४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे साहेब व उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते- पाटील यांनी कृष्णा भीमा स्तरीकरन योजना तयार केली. कृष्णा कोयना पंचगंगा व वारणा या नद्यातील वाया जाणारे ११५ टीएमसी पावसाचे पाणी सांगली सातारा मार्गे उजनी धरणात आणायचे अशी ती योजना होती. सुरुवातीला ५००० कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. ही योजना पूर्ण झाल्यास १४ लाख एकर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे. या योजनेचा लाभ सांगली जिल्ह्यातील तासगाव, मिरज, कवठेमहांकाळ, जत, खानापूर, आटपाडी. सातारा जिल्हा फलटण, माण, खटाव, कोरेगाव. पुणे जिल्हा इंदापूर, बारामती, दौंड. सोलापूर सांगोला, पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा, मोहोळ, माढा, करमाळा, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी. धाराशीव भूम, परांडा कळंब, तुळजापूर. बीड आष्टी, अंबाजोगाई. सहा जिल्ह्यातील ३१ तालुक्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. मा. विजय दादांनी अत्यंत दूरदृष्टीने ही योजना आखली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून बलिदान देणाऱ्या, योगदान देणाऱ्या सर्वांचे स्मरण करून हा महाराष्ट्र आपलाच आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकरी आपला बांधव आहे हा शुद्ध भाव मनात ठेवून मा. विजयदादांच्या या लढ्याला सर्वांनी पाठिंबा द्यावा. मा. विजयदादांना उत्तम आरोग्य मिळो, जनकल्याणाचा वसा पूर्णत्वास जावो हीच कुलस्वामिनी आई तुळजाभवानी, शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव चरणी प्रार्थना.



आ. विजयदादांचे पालखी सोहळा मार्ग मोठा करण्याचे अनेक दिवसांचे स्वप्न होते. सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांनी पालखी सोहळा मार्गाचे काम करून घेतले. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराजांचे अभंग असलेले फलक आजही आपणास पालखी सोहळा मार्गावर वाचावयास मिळतात. उत्कृष्ट स्वयं सहाय्यता बचत गटांना केल्या जाणाऱ्या राजमाता जिजाऊ पुरस्काराचे प्रणेते मा. विजयदादाच आहेत.

उजनी धरण भीमा नदीवरील मोठे धरण आहे. या धरणाच्या वरील बाजूस पुणे जिल्ह्यात एकूण १८ धरणे आहेत. या सर्व धरणातून सोडलेला विसर्ग उजनी धरणात येतो व सदरच्या पाण्यासोबत दरवर्षी गाळ मिश्रित वाळू येते. कृष्णा भीमा स्थिरीकरण योजना पूर्णत्वास जाण्यासाठी निधी कसा उभारावा या संदर्भात दि. १९ एप्रिल २०१३ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांना व संबंधित विभागांना मा. विजयदादांनी पत्र दिले होते. निधीबाबत ही दादांची किती दूरदृष्टी होती. हा प्रकल्प पूर्ण व्हावा यासाठी त्यांची तळमळ दिसून येते.

**- किसन कदम,**
**९८१९५५१६९२**



पद्माकर कुलकर्णी डॉ. शिवाजी शिंदे डॉ.सुहास पुजारी सिद्धाराम पाटील

# जिल्हा मराठी भाषा समितीचे चौघे अशासकीय सदस्य

## पद्माकर कुलकर्णी, डॉ.शिवाजी शिंदे, डॉ.सुहास पुजारी, सिद्धाराम पाटलांचा समावेश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.११ जून-**

मराठी भाषा व साहित्य प्रसारक आणि प्रचारक तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, सोलापूर जिल्ह्याचे प्रमुख पद्माकर कुलकर्णी, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहायक कुलसचिव तथा मराठी भाषा दक्षता अधिकारी डॉ.शिवाजी शिंदे, संगमेश्वर म हाविद्यालयातील उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. सुहास पुजारी आणि प्रकाशक व पत्रकार सिद्धाराम पाटील या अशासकीय सदस्यांची सोलापूर जिल्हा मराठी भाषा समितीच्या सदस्यपदी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नियुक्ती केली आहे.

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४, सुधारित अधिनियम क्र.१४, दि. १६ जुलै २०२१ नियम ५ ड (४) नुसार सोलापूर जिल्ह्याकरिता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा समिती पुनर्गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील मराठी भाषा पद निर्देशित अधिकारी अंजली मरोड या सदस्य सचिव आहेत.

या समितीमध्ये शासकीय क्षेत्रातील चार अधिकारी व अशासकीय क्षेत्रातील चार व्यक्तींची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शासकीय क्षेत्रातील महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओंबसे, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम शिक्षणाधिकारी कादर शेख, यांचा सदस्य म्हणून सम ावेश आहे. सहाय्यक प्राध्यापक दत्तात्रय पंडित घोलप यांची इतरत्र बदली झाल्याने त्या रिक्त जागेवर मराठी भाषेचे काम करणारे महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे सोलापूर जिल्ह्याचे प्रमुख पद्माकर कुलकर्णी यांचे नियुक्ती करण्यात आली आहे.

## महत्वाचे...

### महिलेसह तिघांना मारहाण

**सोलापूर, दि.११ जून-**

घरासमोर बसलेल्या महिलेसह तिघांना मारहाण केल्याप्रकरणी एकाविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही मारहाण आठ जून रोजी रात्री ९ वाजता झाली. याबाबत प्रथमेश दत्तुसा बारड (वय ३४, रा. अरपात नगर) याने दिलेल्या फिर्यादीवरून शुभम व इतर तीन अनोळखी विरूध्द एम आयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी याची आई गिता तसेच घराशेजारी राहणारे देवेंद्र व त्यांची पत्नी असे बोलत घरासमोर थांबले होते. त्यावेळी शुभम व त्याच्या साथीदारासह तेथे आला, त्याने गिता यांच्यासह शेजारी देवेंद्र व त्यांच्या पत्नीला मारहाण केली. या गुन्ह्याचा तपास हवालदार डोके करत आहेत.

### कट लागल्याच्या कारणातून दोघांना जमावाकडून मारहाण

**सोलापूर, दि.११ जून-**

गुरुनानक चौक येथील मयुर कॅन्टीनसमोर कट लागल्याच्या कारणातून दोघांना जमावाकडून मारहाण करण्यात आली. ही म ारहाण मंगळवारी रात्री ७.४५ च्या सुमारास झाली. सिध्दार्थ यलप्पा उडाणशिव (वय २५) व प्रसाद मुरलीधर नरोटे (वय ३०, दोघे रा. हुडको, कुमठा नाका) असे मारहाण झालेल्या दोघांची नावे आहेत. मंगळवारी रात्री ७.४५ च्या सुमारास सिध्दार्थ् आणि प्रसाद हे दोघे गुरुनानक चौकातील मयुर कॅन्टीन समोर असताना, कट लागल्याच्या कारणातून त्यांचा वाद झाला. यातून आठ जणाच्या जमावाने लाथाबुक्यांनी दोघांना मारहाण केली. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### आईचे भांडण सोडविण्यास गेलेल्या मुलाला मारहाण

**सोलापूर, दि.११ जून-**

शेजारीणीबरोबर आईचे सुरु असलेले भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या मुलाला मारहाण करून जखमी केले. ही मारहाण मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास झाली. श्रीनिवास नागनाथ कोलपाक (वय २५, रा. नविन विडी घरकुल) असे मारहाण झालेल्या मुलाचे नाव आहे. मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास नविन विडी घरकुल येथे श्रीनिवास याच्या आईचे शेजारील लोकांबरोबर भांडण लागले होते. ती भांडणे सोडविण्यासाठी श्रीनिवास गेला असता, त्याला श्रीनिवास गोडू याने दगडाने मारहाण केल्याने डोक्याला जखम झाली. दुपारी ४.३० वाजता श्रीनिवास स्वत ; शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### मंद्रुपमध्ये विजेच्या धक्क्याने एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि.११ जून-**



शेतातील बोअर मोटारचे स्टार्टर चालु करताना विजेचा धक्का लागून अविनाश बाबूराव साठे वय ४९ राहणार मंद्रुप यांचा मृत्यू झाला. ही घटना मंद्रुप येथे बुधवारी दुपारी २.३० वाजता हनुमान नगर येथील शेतात घडली. या घटनेची मद्रुप पोलीसात नोंद झाली आहे. अविनाश साठे यांनी शेतातील बोअर सुरू करण्यासाठी स्टार्टरचे बटन सुरू करताना विजेचा धक्का लागला. उपचारासाठी त्यांना दवाखान्यात घेऊन गेल्यानंतर उपचारापुर्वीच त्यांचे मृत्यू झाला होता. याबाबत सुभाष अनिल साठे वय ३५ वर्षे राहणार हनुमान नगर मंद्रूप यांनी मंद्रुप पोलीसांना खबर दिली. हवालदार सचिन मसलखांब तपास करीत आहेत.

# छत्रपती शिवराय अन् संत जागराने सोलापूरकर मंत्रमुग्ध

## शिवस्मारकच्यावतीने आयोजित सोहळा रंगला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.११ जून-**

येथील हुतात्मा स्मृती मंदिरात छत्रपती शिवरायांचा शौर्यदायी पराक्रम... संतांचे जनजागरण करणारे खडे बोल... संबळाचा दणदणाट...या आगळ्या वातावरणात भक्ती-शक्ती कार्यक्रम रंगला. शिवस्मारकाच्या वतीने हिंदू साम्राज्य दिनानिमित्त भक्ती-शक्ती संगम कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे उद्घाटन शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, सचिव गंगाधर गवसणे, माधवी कुलकर्णी, गायक व अभिनेते अवधुत गांधी यांच्या हस्ते झाले.




सोलापूर : हुतात्मा स्मृती मंदिरात भक्ती-शक्ती संगम कार्यक्रमात गायन करताना अवधूत गांधी व सहकलाकार.

यावेळी अवधूत गांधी यांनी बहारदार गायनातून शिवकालीन महाराष्ट्र, वारकरी संप्रदाय व लोककलांचा संगम घडवला. गांधी यांनी सुरुवातीला 'सुमुख सुंदर गजवदना, तव चरणी करितो वंदना' या गणेश गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली. छत्रपती शिवराय डोक्यावर घेण्याचा नव्हे तर डोक्यात ठेवून वागण्याचा विषय आहे, असे सांगत त्यांनी छत्रपतींच्या बाल्यकाळाचा इतिहास मांडला. त्यांनी शाहीर नानवडेकरांचा पोवाडा व नंतर निखिल पाठक यांचा पोवाडा सादर करत वातावरण भारावून टाकले. खणखणीत आवाजातील सादरीकरणाला रसिकांनी टाळ्यांचा प्रतिसाद दिला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांवर आठ चित्रपट काढणाऱ्या दिगपाल लांजेकरांनी लिहिलेला छत्रपतींचा अभंग सादर केला. श्रीमंत युगाचे शिवराय मूर्ती, न्यायाचा आधार, कर्माचा निर्धार, तुम्ही कैवारू सकल जगाचे या ओळीतील आगळी अभंगरचना सादर झाली.

पन्हाळगडाच्या वेढ्याच्या प्रसंगावर संत तुकाराम महाराजांचा अभंग तुज वीण, कोणा आहे मज हा अभंग सादर केला. त्यानंतर सावळे सुंदर रुप सुंदर या अभंगाने वातावरणात भक्तीची सुंगध फुलला. त्यानंतर बीडचा संभळवादक सूरज तरटे या तरुण वादकाने संबळावरचा तोडा सादर करताना त्याला टाळ्याच्या साथीने रसिकांनी दाद दिली. अवधूत गांधी यांनी 'तू विटेवरी सखये बाई, हो करी कृपा' हा विठाई जगदंबेचा गोंधळ सादर केला. सुंदर रचना व सुरेल गायनातून कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला.



# राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या युवक शहराध्यक्षपदी सरफराज शेख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जून-**

राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नूतन सोलापूर शहर अध्यक्षपदी सरफराज शेख यांची निवड करण्यात आली आहे. निवडीचे पत्र प्रांताध्यक्ष जयंत पाटील यांच्याहस्ते युवक प्रदेशाध्यक्ष महबूब शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आले.

पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्रजी पवार, प्रांताध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, धैर्यशील मोहिते पाटील, रोहित पवार, शहर अध्यक्ष सुधीर खरटमल यांच्या मान्यतेने युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांनी ही निवड केली. निवडीचे पत्र देताना प्रदेश सचिव ट्रीनकल परमार,सचिन नारकर, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, गब्बर सय्यद, नूर नदाफ आदी उपस्थित होते.

मागील दोन वर्षाचा कार्याध्यक्ष चा कार्यकाळ पाहता त्यांना शहराध्यक्ष पदावर नियुक्त करण्यात आले. मागील अनेक वर्षांपासून शरद पवार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा निष्ठावन्त कार्यकर्ता म्हणुन त्यांची ओळख आहे. सोलापुरातील पक्षाचा एक युवक चेहरा म्हणुन त्यांचा नाव नेहमी चर्चेत असते. पक्षाने दिलेली प्रत्येक जबाबदारी ते सक्षम पणे सांभाळत आहेत शांत संयमी व अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

# नोटीशीला उत्तर देण्यास त्या आजी-माजी १२ अधिकाऱ्यांना १५ दिवसांची मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.११ जून-**

विजापूर रोडवरील बहुचर्चित १७ मजली पनाश टॉवर प्रकरणी चौकशी अहवाला नंतर बजावलेल्या नोटीसीचा खुलासा करण्यासाठी त्या आजी-माजी १२ अधिकाऱ्यांना पंधरा दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दिली.

विजापूर रोडवरील बहुचर्चित १७ मजली पनाश टॉवर प्रकरणाची चौकशी पूर्ण होऊन त्याचा अहवाल महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना सादर करण्यात आला. दरम्यान, या प्रकरणी अखेर २७ मे २०२५ रोजी महापालिकेच्या संबंधित १२ आजी- माजी अधिकारी - कर्मचाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी या नोटीसा बजावल्या.

पनाश टॉवर प्रकरणाला पुढील कार्यवाहीसाठी ब्रेक लागल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी या प्रकरणाची फाईल पुन्हा उघडली. या संदर्भातील सविस्तर माहिती घेतल्यानंतर त्यांनी या प्रकरणाची चौकशी



पनाश टॉवर प्रकरण

लावली होती आणि चौकशी अधिकारी म्हणून महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांची नियुक्ती केली होती. त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी केली. चौकशी दरम्यान, या प्रकरणातील तक्रारदार भाजपाचे माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे यांचे म्हणणे नोंदवून घेतले. याप्रकरणी चौकशीअंती अखेर उपायुक्त आशिष लोकरे आणि उपसंचालक नगररचना मनीष भिष्णूरकर यांनी हा अहवाल महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना काही दिवसापूर्वीच सादर केला. चौकशीत हे प्रकरण हाताळणारे १२ आजी - माजी अधिकारी- कर्मचारी असून यामध्ये सहा अधिकारी निवृत्त आणि काहींनी स्वेच्छा निवृती घेतली आहे. तर ४ अधिकारी- कर्मचारी हे सध्या महापालिकेत कार्यरत आहेत.

संबंधित या अधिकाऱ्यांना नोटीस बजावण्याचे आदेश आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सामान्य प्रशासन विभागाचे नियंत्रण अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांना दिले होते. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी सर्व प्रक्रिया पार पाडून या नोटिसा बजावल्या. खुलासा करण्यासाठी दहा दिवसाची मुदत दिली होती. दरम्यान, नोटीसा मिळाल्यानंतर संबंधितापैकी काही अधिकाऱ्यांनी कागदपत्र मिळवण्यासाठी अवधी मागितला. या सर्व आजी-माजी अधिकाऱ्यांना खुलासा करण्यासाठी पंधरा दिवसाची मुदतवाढ देण्यात आली आहे. याप्रकरणी सोलापूर महापालिकेचे विद्यमान अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, तत्कालीन अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे. तत्कालीन नगर अभियंता (निवृत्त) सुभाष सावस्कर, लक्ष्मण चलवादी (निवृत्त), सध्याचे सहायक अभियंता रामचंद्र पेंटर, नागनाथ बाबर, मोहन कांबळे (निवृत्त), एस. व्ही. जाधव, श्रीकांत खानापुरे, दीपक भादुले, अब्दुल चंदरकी, झाकीर हुसेन नायकवाडी आदी आजी-माजी अधिकारी-कर्मचाऱ्यांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.


# महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता कोण?

- आयुक्तांचे आदेश नसल्याने संभ्रम कायम
- कार्यालयावर लागली व्यंकटेश चौबे यांच्या नावाची पाटी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.११ जून-**

महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता तपन डंके यांच्याकडे केवळ २१ दिवसात महापालिकेतील विविध चार विभागांचे नियंत्रण अधिकारी पदाची धुरा सोपवली. मात्र सार्वजनिक आरोग्य अभियंता पदी कोण राहणार? याबाबत स्पष्ट आदेश आयुक्तांनी दिले नव्हते. यामुळे या पदावर नेमके कोण काम करणार याबाबत बुधवारी संभ्रम कायम होता. स्पष्ट नियुक्ती आदेश नसतानाही पालिकेतील कार्यालयावर व्यंकटेश चौबे यांच्या नावाची पाटी लागली असल्याचे दिसून आले.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यनी काल नवे विभाग वाटप आदेश काढले होते. त्यामध्ये २१ दिवसांपूर्वी महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता पदी नियुक्त झालेले तपन डंके यांच्याकडे परिवहन, अतिक्रमण विभाग, मंडई कोंडवाडा, लायसन परवाना विभाग आणि पशुवैद्यकीय विभाग व महात्मा गांधी प्राणी संग्रहालय विभाग या चार विभागाच्या नियंत्रण अधिकारी पदाची धुरा सोपवली. मात्र सार्वजनिक आरोग्य अभियंता पद कोणाकडे सोपविले याचे स्पष्ट आदेश महापालिका आयुक्तांनी




आज सायंकाळपर्यंत काढले नव्हते. दरम्यान, महापालिका प्रशासकीय इमारतीमधील सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयावर बुधवारी सायंकाळी व्यंकटेश चौबे यांच्या नावाची पाटी लावण्यात आल्याचे दिसून आले. चौबे यांच्याकडे स्मार्ट सिटीचे मुख्य तांत्रिक अधिकारी पदाची जबाबदारी आहे. विशेष म्हणजे आयुक्तांनी नियुक्ती आदेश काढले नसतानाही पाटी लावल्याची घाई आणि गडबड झाल्याचे निदर्शनास आले. या पदाचा पदभार नेमका कुणाकडे? याचा संभ्रम मात्र बुधवारी दिवसभर कायम होता. यामुळे या कार्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रमाची स्थिती दिसून आली. यामुळे महापालिका प्रशासनातील सावळा गोंधळच जणू दिसून येत आहे.

# जामीनावर सुटल्यानंतर पाचव्या दिवशी सराफाचे दुकान फोडले

- सराईत गुन्हेगारासह विधी संघर्ष बालक पोलिसांच्या ताब्यात
- शहर गुन्हे शाखेने २४ तासाच्या आत लावला छडा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.११ जून-**

घरफोडीच्या गुन्ह्यात जामीनावर सुटल्यानंतर पाचव्या दिवशी सराफाचे दुकान फोडून पावनेदोन लाखाचा ऐवज चोरणा-या सराईत गुन्हेगारासह विधीसंघर्ष् बालकाला शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांनी चोरलेल्या दागिन्यांसह माल हस्तगत करण्यात आले आहे.



सिध्दनाथ उर्फ ढेप्या गंगाधर बंडगर (वय २१, रा. मड्डी वस्ती, भवानी पेठ) असे आरोपीचे नाव आहे. यातील आरोपी सिध्दनाथ याने काही दिवसांपूर्वी घरफोडी केली होती. या गन्ह्यात पोलिसांनी त्याला अटक करून न्यायालयात उभे केले होते. त्यानंतर त्याची रवानगी कारागृहात झाली होती. पाचव्या दिवशी तो जामीनावर बाहेर आला. त्याच्यासोबत विधी संघर्ष बालकावरही गुन्हा दाखल झाला होता. जामीनावर बाहेर आलेल्या दिवशीच त्यांनी भवानी पेठेतील सराफाचे दुकान हेरून ते फोडले. आतील दीड किलो चांदी व चांदीचे दागिने असा सुमारे पावने दोन लाखांचा ऐवज चोरून नेला होता. शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमे-यात कैद झालेल्या चित्रिफितीपाहून आरोपीला आणि विधी संघर्ष बालकाला ताब्यात घेतले. त्यानंतर सिध्दनाथकडे केलेल्या चौकशीत त्याने विधी संघर्ष बालकाच्या मदतीने गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलिसांनी या गुन्ह्यात चोरी केलेला संपूर्ण माल हस्तगत केला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त एम. राजकुमार, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि विजय पाटील, पोसई मुकेश गायकवाड, सहाय्यक फौजदार नंदराम गायकवाड, वाजिद पटेल, योगेश बर्डे, राहुल तोगे, आबाजी सावळे, संजय साळुंखे, अजिंक्य माने, धिरज सातपुते, विठ्ठल यलम ार, शिलावती काळे, सतीश काटे यांनी केली

# ड्रेनेज चेंबरमध्ये पडलेल्या घोड्याला मिळाले जीवदान

- माजी सभागृह नेते करली यांचे प्रसंगावधान तर नियंत्रण अधिकारी डंके यांची तत्परता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून-**

नीलम नगर भाग चार रफिक नगर मशिदीजवळ ड्रेनेजच्या उघड्या चेंबर मध्ये अचानक पडलेल्या घोड्याला अखेर बाहेर काढून जीवदान मिळाले. माजी सभागृह नेते श्रीनिवास करली यांचे प्रसंगावधान आणि नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्या तत्परतेमुळे त्या घोड्यास बाहेर काढण्यात यंत्रणेला यश आले.

बुधवारी दुपारी नीलम नगर भाग चार रफिक नगर मशिदी जवळ ड्रेनेज



लाईनचे मुख्य मॅन्युअल चेंबर वर झाकण नसल्यामुळे त्यामध्ये घोडा पडल्याची बाब येथील नागरिकांच्या निदर्शनास आली. या छोट्याशा चेंबरमध्ये मोठा घोडा अडकून पडला. ते पाहून येथील नागरिकांनी त्यांच्या परीने त्याला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला

### तपन डंके यांचे असेही प्राणी प्रेम

सोलापूर महापालिकेतील परिवहन, मंडई कोंडवाडा अतिक्रमण आणि पशुवैद्यकीय विभाग व महात्मा गांधी प्राणीसंग्रहालय या चार विभागाचे नियंत्रण अधिकारी म्हणून तपन डंके यांची काल नियुक्ती करण्यात आली. पहिल्याच दिवशी त्यांनी ड्रेनेज मध्ये पडलेल्या घोड्यास बाहेर काढण्यासाठी तत्परता दाखवली. त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या त्या विभागांना सूचना देऊन कार्यवाही करायला लावली. आणि यामुळे त्या घोड्यास जीवदान मिळाले. डंके यांचे प्राणी प्रेम दिसून आले.



मात्र त्यांना यश आले नाही. ही बाब माजी सभागृह नेते श्रीनिवास करली यांना सम जताच त्यांनी व्हाट्सअप ग्रुप बरोबरच म हापालिकेचे नूतन नियंत्रण अधिकारी तपन डंके यांना कळविली. माहिती मिळताच तपन डंके यांनी तत्काळ घटनास्थळी अग्निशामक दलाचे पथक आणि मंडई विभागांच्या कर्मचाऱ्यांना पाठवून दिले. अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी दोरी बांधून मोठ्या कौशल्याने त्या घोड्यास ड्रेनेज चेंबरच्या बाहेर काढले. त्यासाठी येथील नागरिकांनीही मदत केली. आणि अखेर सायंकाळी चेंबर मध्ये पडलेला तो घोडा बाहेर काढण्यात आला. त्याला श्वास घेण्यास त्रास होत असल्याचे दिसून आले. तत्काळ ऍनिमल संस्थेचे डॉक्टरांनी या घोड्यास सलाईन व इंजेक्शन दिले. त्यानंतर त्या घोड्याचे प्रकृती सुधारली. म हापालिकेच्या मंडई विभागाच्या गुरे वाहक वाहनांमधून अखेर तो घोडा बार्शी रोडवरील गोशाळेकडे पाठवण्यात आला असल्याचे सांगण्यात आले. महापालिका यंत्रणा पोहोचल्याने आणि तत्काळ कार्यवाहीमुळे त्या घोड्याचे जीव वाचले याचे समाधान वाटते, अशी प्रतिक्रिया नियंत्रण अधिकारी तपन डंके यांनी दिली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांना कार्यशाळेचे निमंत्रण

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ जून -** राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर संकुलात कार्यशाळा घेण्यात येणार आहे. पुणे येथील महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांना या कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणून येण्याबाबत निमंत्रण देण्यात आले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेतील बदल आणि सुधारणांसाठी एक महत्त्वपूर्ण धोरण आहे. या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना अधिक लवचिक, समग्र आणि २१ व्या शतकातील गरजांना अनुरूप शिक्षण देणे हा आहे. या विषयावर राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात कार्यशाळा घेण्यात येणार आहे. प्रारंभी संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी डॉ. देवळाणकर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून कार्यशाळेचे निमंत्रण दिले. यावेळी संकुलाच्या अध्यक्षा के. ए. जायभाये आदी उपस्थित होते.





### संक्षिप्त वृत्त...

## जिल्हाधिकारी ठाकूर यांनी केला नेत्रदानाचा संकल्प

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ जून -** जागतिक दृष्टीदान दिन आणि आपला वाढदिवस यांचे औचित्य साधून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी नेत्रदानाचा संकल्प करून एक प्रेरणादायी पाऊल उचलले.



जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लातूरच्या दयानंद सभागृहात आयोजित नेत्रदान संकल्प अभियान कार्यक्रमात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी स्वतःच्या स्वाक्षरीने संकल्प पत्र भरून नेत्रदानाचा दृढनिश्चय जाहीर केला.

यावेळी त्यांनी उपस्थित महसूल अधिकारी, कर्मचारी यांनी या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. पाठक यांनी नेत्रदानाचे महत्त्व, त्याची गरज व कार्यपध्दती याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी क्षेत्रीय अधिकारी जयंत क्षीरसागर, नेत्र चिकित्सा अधिकारी आर. पी. वाघमारे, संकेत लंपाटे, विनायक सोनटक्के व जिल्हा अंधत्व नियंत्रण समितीचे सदस्य उपस्थित होते.

## शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ जून -** शिष्यवृत्तीसाठी २०२३-२४ साठी रि-अप्लाय आणि २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी नवीन शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी महाडीबीटी पोर्टल सुरू झाले असून अर्ज भरण्यासाठी १५ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील शासनमान्य, अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क फ्रिशीप, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी निर्वाह भत्ता योजनेचा लाभ घेता येईल. सर्व प्राचार्य, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अर्ज अचूक भरून १५ जून २०२५ पूर्वी ऑनलाइन सादर करावेत.

## साहित्य भारतीच्या कार्यकारिणीत साहित्यिक कारंडे यांचा समावेश

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ जून -** अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्यभारती लातूरची वर्ष २०२५-२६ साठी जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली.जिल्हा अध्यक्षपदी शैलजा कारंडे यांची नुकतीच निवड करण्यात आली.
उपाध्यक्ष म्हणून चाकूर येथील डॉ.राजेश तगडपल्लेवार व चापोली येथील डॉ.विजयकुमार ढोले,कार्याध्यक्ष म्हणून अहमदपूर येथील प्रा.डॉ.रामचंद्र पस्तापुरे,संघटन मंत्री म्हणून लातूर येथील उमेश सेलूकर,सहसंघटन मंत्री म्हणून हाडोळती येथील प्रा.डॉ.बालाजी भंडारे तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून लातूर येथील डॉ.रामशेट्टी शेटकार यांची निवड करण्यात आली.जिल्हा कार्यकारणी सदस्यपदी डॉ.प्रदीप पाटील,डॉ.प्रणिता चाकूरकर , प्रा.अश्विनी निवर्गी, प्रा.डॉ.जितेंद्र शेळके यांची निवड करण्यात आली.

## कन्यादान योजनेसाठी सामूहिक विवाह सोहळ्यांचे प्रस्ताव मागवले

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ जून -** छत्रपती संभाजीनगर येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामार्फत सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी कन्यादान योजनेअंतर्गत सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांकडून प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. या योजनेचा उद्देश विवाहातील अनुचित प्रथा रोखणे आणि सहभागी दाम्पत्यांना आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे.

प्रस्ताव विहित नमुन्यातील अर्जासह (कार्यालयात उपलब्ध) सादर करावेत. संस्थांनी विवाहाचे ठिकाण, तारीख आणि वर-वधूंच्या सत्यप्रत अर्जासह प्रस्ताव पाठवावेत असे कळविण्यात आले आहे.

# लातूर शहरात सर्वत्र वटसावित्री पौर्णिमा उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ जून -** लातूर जिल्ह्यात सर्वत्र उत्साहाच्या वातावरणात महिलांनी वट पौर्णिमा साजरी केली. शहरातील सर्वात मोठ्या हेरिटेज ट्री साधारण सव्वाशे वर्षे वयाच्या वटवृक्षाच्या सानिध्यात महिला डॉक्टर्स, महिला आय.एम.ए. च्या सदस्या, लातूर वृक्ष चळवळ, समाजकल्याण विभाग, सह्याद्री देवराईच्यावतीने सामाजिक न्याय भवन परिसरात वटसावित्री पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.





यावेळी महिला डॉक्टर्सनी लातूरमधील या हेरीटेज ट्री वडाचे ऋण व्यक्त केले. यावेळी लातूर वृक्ष चळवळीला १०० वडांची रोपे भेट देण्यात आली. ही रोपे लातूर वृक्ष चळवळीच्या श्वेता लोंढे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

यावेळी आय.एम.ए.च्यावतीने अध्यक्षा डॉ. ज्योती सूळ यांनी या उपक्रमाची भूमिका मांडली. तर सह्याद्री देवराई, लातूर वृक्ष चळवळीचे मुख्य समन्वयक सुपर्ण जगताप यांनी झाड आहे तर आपलीही वाढ आहे ही वृक्ष प्रार्थना, प्रतिज्ञा सर्वांकडून म्हणवून घेतली. समाजकल्याण विभागाचे उपायुक्त अविनाश देवशटवार यांचा तिन्ही संस्थांच्यावतीने डॉ. सूळ यांनी सत्कार केला.

यावेळी सुपर्ण जगताप म्हणाले, वड हे आपल्या ऋषीमुनींनी सांगितल्याप्रमाणे शांती देणारे, नवचैतन्य निर्माण करणारे, मुंगीपासून हत्तीपर्यंत प्राण्यांना अन्न, प्राणवायू देणारे झाड आहे. या झाडाच्या सानिध्यात नकारात्मकता, डिप्रेशन दूर होतात. अनेक औषध निर्मितीसाठी या वडांचा उपयोग केला जातो. आजच्या दिवशी आपण केवळ वडच नाही तर वडाच्या फायकस प्रजातीतील दीर्घायुषी असणाऱ्या उष्णकटिबंधातील झाडांचे संवर्धन केले तर खऱ्या अर्थाने वटसावित्री पौर्णिमा साजरी होईल, असे ते म्हणाले.

## विलासराव देशमुख वन उद्यानात केली वृक्ष लागवड



तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ जून -** जिल्हा प्रशासनामार्फत वृक्षारोपण मोहिमेंतर्गत जास्तीत जास्त झाडे लावण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

वटपौर्णिमेचे औचित्य साधून प्रत्येक कुटुंबाने किमान १० झाडे लावावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी केले होते. वन विभागामार्फत साखरा येथील विलासराव देशमुख वन उद्यानात जिल्हाधिकारी ठाकूर यांच्या उपस्थितीत ५० वडाची रोपे लावून या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी 'रोहयो'च्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, सहायक वनसंरक्षक वैशाली तांबे, सुनंदा जगताप, वनपरिक्षेत्र अधिकारी धनंजय पोटे, वनपरिमंडळ अधिकारी नीलेश बिराजदार, टी. एस. चिल्ले, पी. टी. देवकरण, वनरक्षक महेश पवार, बालाजी पाटील, गोविंद घुले, धम्मसागर कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### वटपौर्णिमा उत्साहात

जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत यंदाची वटपौर्णिमा वडाची झाडे लावून साजरी करण्यात आली. या उपक्रमाची सुरुवात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते साखरा येथील विलासराव देशमुख वन उद्यानात वडाचे झाड लावून झाली. यावेळी ५० महिलांनीही वडाची झाडे लावून या झाडांची पूजा केली.

## लातूर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने नुतन शिक्षणाधिकारी मठपती यांचा सत्कार

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ जून -** लातूर येथील माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी म्हणून दत्तात्रय मठपती यांनी नुकताच पदभार घेतला. मठपती यांच्या नियुक्तीबद्दल लातूर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी मठपती यांचा यथोचित सत्कार केला. तसेच संस्थेच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी त्यांना निमंत्रणही देण्यात आले.

लातूरच्या एज्युकेशन हबचा संपूर्ण महाराष्ट्रात दबदबा आहे. शिक्षणाचा लातूर पॅटर्न देशभरात परिचित असून राज्यभरातील विविध भागातील विद्यार्थी शिक्षणासाठी लातूर शहरात येतात.त्यामुळे येथील शिक्षण विभागाचे महत्वही तितकेच आहे. येथील माध्यमिक शिक्षण



विभागाचे शिक्षणाधिकारी म्हणून दत्तात्रय मठपती यांनी नुकताच पदभार घेतला.

त्याबद्दल लातूर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी आपल्या सहका-यांसह शासकीय कार्यालयात जावून त्यांची भेट घेतली यावेळी संस्थेच्या वतीने शिक्षणाधिकारी मठपती यांचा सत्कार करून त्यांच्या भावी कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी विक्रम गोजमगुंडे यांनी लातूर एज्युकेशन सोसायटीच्या कार्याबाबत व शैक्षणिक उपक्रमांबाबत माहिती देवून विविध विषयांवर चर्चा केली. लातूर एज्युकेशन सोसायटीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा लवकरच सत्कार करण्यात येणार असून या सोहळ्यासाठी दयानंद मठपती यांनी उपस्थित रहावे अशी विनंती गोजमगुंडे यांनी केली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष प्रल्हाद दुडीले, प्राचार्य संजय मलवाडे, मुख्य लिपीक अजय आरदवाड यांच्यासह इतर सहकारी उपस्थित होते.

## वाकलेल्या तारा व खांब केले दुरुस्त : वीजपुरवठा सुरळीत

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ जून -** लातूर शहर आणि परिसरात रात्री आलेल्या वादळी वारे, पाऊस आणि विजेच्या कडकडाटामुळे जनजीवन विस्कळीत झाले. याच दिवशी रात्री १२ वाजल्यानंतर आलेल्या वादळी वाऱ्यामुळे प्रभाग क्रमांक १५ मधील कानडे हॉस्पिटल परिसरात अंधोरीकर यांच्या घरावर जवळपास २५ ते ३० फूट लांबीची मोठ्या झाडाची फांदी पडली.

यामुळे वीजपुरवठा खंडित झाला आणि ही फांदी चौकातील रस्त्यावर पडल्याने वाहतूकही ठप्प झाली होती. माजी मंत्री अमित देशमुख यांच्या कार्यालयातील पाठपूरावामुळे वाकलेल्या तारा व खांब दुरुस्त करून महावितरणने काही तासातच वीजपुरवठा सुरळीत केला.

वादळी पावसामुळे निर्माण झालेल्या या आपत्कालीन परिस्थितीची माहिती मिळताच, शहरचे आ. अमित देशमुख यांच्या कार्यालयाने जराही वेळ न घालवता तात्काळ महावितरण विभाग आणि संबंधित अभियंत्यांशी संपर्क साधला. या परीस्थीतीची माहीती दिली, महावितरणने तातडीने रात्रीपासूनच सुरक्षिततेच्या दृष्टीने काही आवश्यक ठिकाणी वीजपुरवठा बंद ठेवला होता.

सकाळी सहा वाजता आमदार देशमुख यांच्या कार्यालयाने पुन्हा एकदा महावितरण आणि मनपा प्रशासनाशी संपर्क साधून यावर तातडीने कार्यवाही करण्याची विनंती केली होती.

## वादळी वाऱ्याने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून आर्थिक मदत द्या

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ जून -** लातूर व रेणापूर तालुक्यातील शहर आणि ग्रामीण भागाला ९ जून रोजी मध्यरात्री वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने जोरदार तडाखा दिला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतातील पिकांचे अतोनात नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर माजी आमदार धीरज देशमुख यांच्या सूचनेनुसार लातूर व रेणापूर तालुका काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांची भेट घेऊन निवेदन दिले.



तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची आणि विद्युत पुरवठा सुरळीत करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. वादळी वाऱ्यामुळे शेतातील आंबा, जांभूळ, पेरू, चिकू यासारखी फळझाडे उन्मळून पडली आहेत. फळपिके, फळभाज्या आणि फुलशेतीचे पूर्णतः नुकसान झाले आहे. विशेषतः केळीच्या बागा पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले आहे.

तसेच अनेक घरांवरील पत्रे उडून गेली आहेत, विद्युत पोल वाकले आहेत. तारा तुटल्याने बऱ्याच ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. रस्त्यांवरील झाडे मोडून पडल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झाला असून, यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. नुकसानीचे पंचनामे करून आर्थिक मदत देण्यासह शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, अशी मागणी यावेळी शिष्टमंडळाने केली आहे.

## सफाई कामगारांचे काम बंद आंदोलन यशस्वी



### घंटागाड्या लावल्या पार्कवर

मंगळवारी सकाळी साडेदहा वाजल्यापासून महापालिकेच्या सर्व सफाई कर्मचाऱ्यांनी सर्व वाहने, घंटागाड्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर लावून काम बंद आंदोलन सुरू केले होते. एकही सफाई कर्मचारी कामावर गेला नव्हता. त्यामुळे शहरातील सफाईचे, शहर स्वच्छतेचे काम बंद होते. सफाई कामगारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून आंदोलनाला सुरुवात केली होती. महापालिकेसमोर कामगारांनी घोषणाबाजी केली. त्यानंतर आयुक्तांनी कामगारांच्या शिष्टमंडळास चर्चेसाठी बोलावले आणि चर्चा झाल्यानंतर सफाई कामगारांच्या मागण्या येत्या १५ दिवसांत पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन आयुक्त देविदास जाधव यांनी दिले.

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ जून -** महापालिका अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी सफाई कामगारांना कायद्यानुसार किमान वेतन, पी. एफ., सुरक्षेची साधने, सुट्टया व रजा मिळाव्यात यासाठी आठ महिन्यांपासून प्रलंबित मागण्यांसाठी अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्यावतीने मंगळवारी काम बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. याची महापालिका आयुक्त देविदास जाधव यांनी दखल तत्काळ घेतली. शिष्टमंडळासोबत चर्चा करून १५ दिवसांच्या आत त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक राजकुमार होळीकर, भटक्या विमुक्तांचे नेते प्रा. सुधीर अनवले, लेबर युनियनचे नेते डॉ. सुधीर देशमुख, शेतकरी कामगार पक्षाचे नेते ॲड. उदय गवारे, अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे शहराध्यक्ष विशाल काळे, ज्योती उपाडे, लहू जगताप, परमेश्वर कांबळे, महेंद्र कांबळे, सुधीर कांबळे, आयुब शेख, ईश्वर काळे, सुनील सगट, सचिन काळे, अंजना सगट, अभिजित बनसोडे, कुमार कांबळे, अमोल शिंदे, रोहित कांबळे, अन्तेश्वर सगट, अंगद बनसोडे, सूर्यकुमार गायकवाड, ईश्वर कासारे, विनोद मोरे, पवन लांडगे, सचिन देसाई, रमाकांत शिंदे, अमोल अडसूळ यांच्यासह अन्य कामगार पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

## आयुक्तपदी मानसी मीना यांची नियुक्ती

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ जून -**



येथील महापालिकेच्या आयुक्तपदी गडचिरोलीच्या देसाईगंज येथील सहायक जिल्हाधिकारी मानसी मीना यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी काही दिवसांपूर्वी पिस्तूलमधून स्वत:च्या डोक्यात गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केला. उपचारानंतर त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. दरम्यान, शासनाने आयुक्त पदाचा पदभार उपायुक्त देविदास जाधव यांच्याकडे सोपविला होता. मंगळवारी शासनाच्यावतीने मानसी मीना यांची आयुक्तपदी नेमणूक करण्यात आली आहे.

## लग्न कार्यासाठी घरात ठेवलेल्या पैशावर डल्ला : चोरटे अटकेत

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ जून -** मुलीच्या लग्न कार्यासाठी घरात ठेवलेल्या पैशावर डल्ला मारणाऱ्या दोघा चोरट्यांना १२ तासांच्या आत अटक करून गांधी चौक पोलिसांनी चोरीस गेलेली २ लाख ८० हजार रुपयांची रोकड व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण ३ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शहरातील लाड गल्ली येथील एका घराचा कडी-कोयंडा तोडून, लोखंडी पेटीचे कुलूप तोडून मुलीच्या लग्न कार्यासाठी ठेवलेले २ लाख ८० हजार रुपये चोरी केल्याची घटना रविवारी घडली होती. याप्रकरणी प्रणिता गंगालाल डांगूर यांच्या तक्रारीवरून गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे,



अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे आणि शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांच्या नेतृत्वातील पथक या गुन्ह्याचा तपास करीत होते. दरम्यान, पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे सतीश हुकूमचंद लाड (वय ५०) आणि संतोष विजयकुमार चापोलीकर (वय ४५, दोघेही रा. लाड गल्ली, लातूर) यांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून चोरीस गेलेली २ लाख ८० हजार रुपयांची रोकड व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण ३ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक अक्रम मोमीन, पोलीस अंमलदार राजेंद्र टेकाळे, प्रकाश भोसले, राम गवारे, शिवाजी पाटील, संतोष गिरी यांनी ही सेवा बजावली.

# जिल्ह्यात पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ सादर करा: सावे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.११ जून -**

जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात वादळी वाऱ्यासह मोठ्या प्रमाणात पाऊस होत आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकासह पशु, कच्चा घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याबाबत पालकमंत्री अतुल सावे यांनी सर्व परिस्थितीची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्याकडून घेतली व जिल्ह्यात झालेल्या या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करून शासनास अहवाल सादर करावा, अशी सूचना केली.



अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनस्तरावर निर्णय घेऊन नुकसानग्रस्तांना त्वरीत मदत केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस झालेल्या मंडळामध्ये कंधार तालुक्यात कंधार मंडळात ८५.७५ मिमी, कुरूळा ८६.००, फुलवळ ६८.७५, उस्माननगर ८१.७५, लोहा तालुक्यात लोहा, सोनखेड व कलंबर मंडळात प्रत्येकी ८१.७५ तर किनवट तालुक्यात जलधरा ७२.७५, शिवनी मंडळात ६९.२५ मि.मी. एवढ्या पाऊसाची नोंद झाली आहे.

# प्राणिताताई देवरे यांचा वटपौर्णिमा निमित्त अकरा वर्षा पासून 'एक वृक्ष,एक जीवन' उपक्रम

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि ११ जून -**

सामाजिक उपक्रम राबविताना त्यात सातत्य ठेवणारे फारच मोजके असतात. लोहा कंधार पर्यायाने जिल्ह्यात आपल्या कार्याची स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या भाजपा महिला आघाडी प्रदेश उपाध्यक्षा प्राणिताताई देवरे चिखलीकर यांनी एक वृक्ष -एक जीवन या अंतर्गत वटपौर्णिमा निमित्ताने गेल्या अकरा वर्षा पासून लोहा कंधार मध्ये महिलांना वटवृक्ष वाटप कारताहेत.अखंडितपणे चालणार हा पर्यावरण संवर्धन करणारा उपक्रम राबवित आहेत.त्यामुळे वडाच्या झाडांची लागवड मोठ्या प्रमाणात झालेली पहावयास मिळते.



भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा प्राणिताताई देवरे चिखलीकर या लोहा कंधारसह जिल्ह्याच्या वेगवेगळ्या भागात विविध सामाजिक उवक्रम राबवित असतात.शिवाय वेगवेगळ्या कार्यक्रमासाठी त्या उपस्थित असतात एक दिवशी सात आठ लग्न सोहळे , वाढदिवस ,असे विविध कार्यक्रमासाठी त्या जातात.वर्षातून दोन उपक्रम आवर्जून राबवितात वटपौर्णिमा आणि मकर संक्राती निमित्ताने वाण वाटप हे दोन कार्यक्रम गेल्या अनेक वर्षांपासून प्राणिताताई या दोन्ही तालुक्यात व जिल्ह्यावर आवर्जून घेत असतात. लोहा व कंधार शहरात वटपौर्णिमा (१०जून) निमित्ताने महिलांना वडाचे रोपटे तानी वाटप केले .सलग अकरा वर्षा पासून त्या आवर्जून हा उपक्रम घेत असतात,लोहा शहरातील देऊळ गल्ली येथे वटपौर्णिमा निमित्ताने महिलांना वटवृक्ष देण्यात आला प्राणिताताई देवरे चिखलीकर म्हणाल्या की, आरोग्य उपयोगी व पर्यावरणाचे संवर्धन करणारा हा उपक्रम आहे पण स्त्रियांसाठी आजच्या दिवसाचे महत्व अधिक आहे या धार्मिकतेची सांगड घालत आम्हा महिलासाठी अंत्यत महत्वाचा असलेला हा वटपौर्णिमा सण साजरा होतो पण सोबत वडाचे झाड लावण्याचा हेतू साध्य होतो आहे याचा मनस्वी आनंद वाटतो सर्वमहिला एकत्रित येऊन दरवर्षी आपण हा सण साजरा करतो आहोत असे सांगून त्यांनी लाडकी बहीण तयोजनेचे महत्व अधोरेखित केले. देशाचे पंतप्रधान .नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या महिला धोरणाची माहिती दिली व महायुतीचे सरकार महिलांच्या हितासाठी वेगवेगळे निर्णय घेत आहेत याचीमाहिती प्राणिताताई यांनी दिली कार्यक्रमास महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव शोभा ताई बगाडे,माजी .नगरसेविका.कल्पनाताई चव्हाण मुकदम ,पंचायत समिती माजी सदस्या .सुरेखा वाले,डॉ. सविता घंटे,अलका कनकदंडे ज्योती रहाटकर सुवर्णा क्षीरसागर यांच्यासह शहरातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होत्या.

## संक्षिप्त वृत्त

### महाराष्ट्र शासनाचा शाहू, फुले, आंबेडकर पारितोषिक अल ईम्रान प्रतिष्ठानला प्रदान

**बिलोली** -महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने अल ईम्रान प्रतिष्ठान बिलोली या संस्थेस महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते दि.१० जुन २०२५ मंगळवारी दुपारी १२:३० वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण सभागृह,जगन्नाथराव भोसले मार्ग,नरीमन पाईंट,मुंबई येथे संस्थेचे अध्यक्ष डा.मोहसीन खान,सचिव ईंजि.ईम्रान खान यांना शाहू,फुले,आंबेडकर पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने दरवर्षी राज्यातील उत्कृष्ट कार्य करणा-या संस्थाना शाहू,फुले,आंबेडकर पारितोषिक दिले जाते.सन २०२३-२०२४ या वर्षीचा शाहू,फुले,आंबेडकर पारितोषिक अल ईम्रान प्रतिष्ठान,बिलोली या संस्थेला (स्क्मानपत्र,स्मृतीचिन्ह,शाल,श्रीफळ) संस्थेचे अध्यक्ष डा.मोहसीन खान,सचिव ईंजि.ईम्रान खान यांना दि.१० जुन ला मुंबई येथे पुरस्कार वितरण सोहळ्यात देऊन गौरविण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळ्यास व्यासपिठावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.एकनाथरावजी शिंदे, सामाजिक न्यायमंत्री ना.संजय शिरसाट, जलसंधारण मंत्री ना.संजय राठोड, रोहयो व फलोत्पादन मंत्री ना.भरतशेठ गोगावले आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सदरिल कार्यक्रमाचे प्रास्ताविक सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदिप कांबळे यांनी केले. तर सुत्रसंचलन हर्षल पाटील, पुनम चांदुरकर व आभार समाजकल्याण चे प्रभारी आयुक्त प्रविण पुरी यांनी मानले.अल ईम्रान प्रतिष्ठानला मिळालेल्या पुरस्काराबद्दल खा.अशोकरावजी चव्हाण,खा.अजित गोपछडे,आ. हेमंत पाटील,आ.बालाजी कल्याणकर,आ.विक्रम काळे,आ.सतीश चव्हाण,आ.आनंदराव बोंढारकर,आ.जितेश अंतापूरकर,सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे, एस.एस.पाटील, के.बी.राठोड,रामदास पेंडकर यांच्यासह संपादक,पत्रकार, मित्रपरिवार यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

### विलास गजभारे यांच्या वाढदिवसानिमित्त महिला कर्मचाऱ्यांना साड्यांचे वाटप



**नवीन नांदेड -** सिडको येथील सामाजिक कार्यकर्ते तथा भीम कायदा सामाजिक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष विलास गजभारे यांच्या वाढदिवसानिमित्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे वृक्षारोपण व सिडको झोन येतील साफसफाई महिला कर्मचाऱ्यांना साड्यांचे वाटप करण्यात आले. सडको येथील सामाजिक कार्यकर्ते विलास गजभारे यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १० जून रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको येथे विविध फुलांच्या झाडांचे वृक्षारोपण करून सिडको येथील महानगरपालिका कार्यालय अंतर्गत साफसफाई काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना साड्यांचे वाटप करण्यात आले. व तसेच माघ पौर्णिमा व वाढदिवसानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे खीर व भोजनदानाचे आयोजन करण्यात आले होते. तत्पूर्वी महाकारुणिक तथागत गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. विलास गजभारे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या सुविध्य पत्नी नम्रता गजभारे यांच्या हस्ते साफसफाई महिला कर्मचारी भारतबाई जोंधळे, सारिकाबाई मल्हारे, शांताबाई हटकर, स्वर्णाबाई भालेराव, उज्वलाबाई मोरे, स्वाती कांबळे यांना साड्यांचे वाटप कण्यात आले. यावेळी सिडकोतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पी एस गवळे, बा.रा. वाघमारे, एकनाथ वाघमारे, शाहिर गौतम पवार,पांडुरंग वाडे, माधव डोम्पले, चंद्रकांत डोम्पले, आर.जे. वाघमारे, रावसाहेब सावते, माजी सैनिक भालेराव, बन्सी गजभारे, मनोहर कोकरे यांनी उपस्थित राहून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व साडी वाटप हा उपक्रम स्तुत्यअसल्याचे मत व्यक्त केले. तर याप्रसंगी पंडित गजभारे, रावसाहेब भुरे, बालाजी गायकवाड, संजय गायकवाड,व्यंकट इंगळे, भगवानदास पैठणे, बालाजी महाबळे, वैभव लांडगे, चंद्रकांत सावंत, कल्याण आढाव, बंटी कोकरे, राष्ट्रवादीच्या जिल्हा संघटक सचिव उषाताई मोरे, कौशल्याबाई सावते, नम्रता गजभारे, गायकवाड ताई, कविता वाडी, मस्के मावशी, संगमित्रा भुरे यांची उपस्थिती होती तसेच सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सम्राट आढाव, प्रदीप हानवते, राजू लांडगे, डि.के.कांबळे, प्रसेनजीतवाघमारे, संदीप महाबळे, आकाश सोनकांबळे, सुनिल वडगावकर,अनिल मोरे, राजू निकाते, गोविंद कांबळे, मुन्ना वाडे आदींनी परिश्रम घेतले.

### नांदेड ते बिदर राज्य मार्गाला साठवण तलावाचे स्वरूप

**हाणेगाव**-नांदेड जिल्ह्यातील सर्वात शेवटचा तालुका म्हणजे देगलुर आणि शेवटचा गाव हाणेगाव असुन हे कर्णाटक आंध्रा महाराष्ट्र राज्याच्या सिमेवरती वसलेले गावे असल्यामुळें या रस्त्यावर नेहमी वरदळ असते आणि विशेष करुन नांदेड येथे गुरु गोविंदसिंग यांचा गुरुद्वारा आहे तर बिदर येथे गुरु नानकजी यांचा गुरुद्वारा असल्यामुळें शिख भाविकांचे पवित्र स्थळ येथे असल्यामुळें या रस्त्यावरुन सर्वात जास्त प्रवाशांची ये-जा असते.ग्रामिण भागातील लोकांना मोठी बाजारपेठ देगलुर असल्यामुळें नेहमी या रस्त्यावर रहदारी असते प्रवाशांना रस्त्यात खड्डा की खड्यात रस्ता हेच कळेनासा झाला आहे. वाहनधारकांना वाहन चालवताना अक्षरशः तारेवरची कसरत करत वाहन चालवावं लागतो आहे वरुन विशेष करुन याच रस्त्याला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा ही देण्यात आला आहे सध्या देगलुर हाणेगाव रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडुन पाणी भरुन याची अवस्था साठवण तलावासारखी झाली आहे म्हणुन हा रस्ता आहे की,साठवण तलाव असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे.तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजुला काटेरी झुडपे झाल्यामुळे अपघात होण्याचे प्रमाण देखील वाढले असुन याकडे संबंधीत विभागाने गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे तर पावसाळ्यापूर्वी रस्त्यावरील खड्डे बुजवुन होणारे अपघात टाळण्यासाठी तात्काळ रस्ता सोयीचा करण्यात यावा अशी मागणी प्रवाशी वर्गातुन होत आहे.

# हिंदी चित्रपटाचा 'नायक' पत्रकारिता शिक्षणातही 'सुपरस्टार'

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.११ जून -**

येथील श्री गुरुगोविंद सिंघजी पत्रकारिता महाविद्यालयाच्या बी. ए. एम. सी. जे. पत्रकारिता पदवी अभ्यासक्रमाचा अंतिम वर्षाचा विद्यार्थी शुशांत प्रशांत ठमके हा ७०.८८ टक्के गुण घेऊन उच्चश्रेणीत महाविद्यालयातून सर्वप्रथम ठरला आहे. विविध कलागुणांनी निपुण असलेला शुशांत ठमके यांनी क्रीडा, कला क्षेत्राबरोबरच पत्रकारिता शिक्षणाच्या अभ्यासक्रमातही आपण अग्रेसर असल्याचे या निकालावरून दाखवून दिले आहे. शुशांत ठमके हा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत झालेल्या तायक्कांदो स्पर्धे तही यशाच्या शिखरावर पोहोचला. जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर त्याने या क्रीडा प्रकारामध्ये पुरस्कार प्राप्त केले.



श्री गुरुनानकदेव विद्यापीठ अमृतसर येथे झालेल्या अखिल भारतीय यूनिवर्सिटी स्पर्धेत शुशांत ठमके याला तायक्कांदो या क्रीडा प्रकारात सिल्वर मेडल मिळाले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या इतिहासात पहिल्यांदा हे पहिल्यांदाच घडले आहे. एवढ्यावरच न थांबता शुशांत ठमके यांनी अलीकडेच बॉलीवूडमध्ये प्रवेश करून 'पिंटू की पप्पी' या हिंदी चित्रपटामध्ये प्रमुख नायकाची भूमिका साकारली आहे. चित्रपट क्षेत्रात काम करताना सुद्धा त्याने पत्रकारिता अर्थात मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम शिक्षणालाही प्राधान्य दिले. पत्रकारिता पदवी अभ्यासक्रमात त्याने उच्चतम श्रेणी प्राप्त केली.

या पदवीपुर्वी सुशांतने महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत शासकीय कृषी महाविद्यालय पुणे येथून बी एससी (हॉनर्स) ही पदवी विशेष प्रावीण्यात संपादन केलेली आहे.

किनवट येथील शैक्षणिक क्षेत्रातले अग्रणी तसेच सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे इंजिनिअर प्रशांत ठमके यांचा सुशांत हा सुपुत्र आहे. श्री गुरुगोविंद सिंघजी पत्रकारिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास कदम, प्रा. सुरेश पाटील, प्रा. डॉ. शुद्धोधन एडके, प्रा. अमोल धुळे, प्रा. संजय नरवाडे, प्रा. विपिन कदम प्रा. शारदा कुलकर्णी शिक्षकेतर कर्मचारी अनिल विनायते, भारत सोनटक्के आदींनी या यशाबद्दल शुशांत ठमके याचे कौतुक केले आहे.

# कल्याणी झडते यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.११ जून -**



उमरी यशवंत हायस्कुल ज्यू कॉलेज येथिल शिक्षक सतिश झडते यांच्यी पत्नी सौ . कल्याणी उर्फ आशा सतिश झडते यांचे दि ९ जून २०२५ रोजी सायकांळी ८:०० वाजता अल्पशा वयात निधन झाले आहे त्यांचे मृत्यू समयी ३३ वर्ष होते . त्यांचा अंत्यसंस्कार दि १० जुन रोजी दुपारी दोन वाजता उमरी वैकुंकट स्मशान भुमित करण्यात आला आहे. त्यांच्या पश्च्यात त्यांचे पती , एक मुलगा , सासू - सासरे, देर असा मोठा परिवार आहे. शिक्षक सतिश झडते यांच्या त्या पत्नी तर पत्रकार अशोक झडते यांच्या भाभी आणि पत्रकार प्रशांत जोंधळे यांच्या भाच्याची पत्नी होत.

# 'क्या हुआ तेरा वादा' अशा घोषणा देत सरकारच्या विरोधात शिवसेनेचा तहसील कार्यालयावर मोर्चा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.११ जून -**

शिवसेना उ.बा.ठा.गटाचे तालुका प्रमुख पिंटू पाटील वासरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ११ जुन रोजी ठाकरे चौकातुन शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर, बैलगाडी,घेऊन सरकारच्या विरोधात क्या हुआ तेरा वादा, शेतकऱ्यांचे कर्जमाफी, व लाडक्या बहिणीचे २१०० रुपये देण्यात यावे अशा घोषना देत तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला.



निवडणूक काळात महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी , शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत १५ हजार देऊ, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत २१०० रुपये महिना देऊ, राज्यातील ४५ हजार गावात पानदन रस्ते करू, शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतावर जीएसटी मुक्त करू, पिक विमा एक रूपयात देऊ, वृद्ध पेन्शन धारकांना २१०० रुपये महिना मानधन देऊ, शेतकऱ्यांना २४ तास वीज उपलब्ध करून देऊ, शेतीमालास हमीभाव देऊ, बी बियाण्यांच्या किमतीवर नियंत्रण ठेवू , हर घर जल हर घर छत योजना यशस्वीपणे राबवु, मराठवाडा वॉटर ग्रीड केंद्राकडून यशस्वीपणे मान्यता करून घेऊ असे अनेक आश्वासने महायुतीच्या नेत्यांकडून निवडणुकी काळात देण्यात आले होते परंतु आता महायुतीच्या नेत्यांना दिलेल्या आश्वासनांचे विसर पडले असल्याने शिवसेना उबाठा पदाधिकाऱ्यांच्या वतीने सरकार क्या हुआ तेरा वादा अशा घोषणा देत सरकारने दिलेल्या आश्वासनाची आठवण करून दिली तसेच मृगनक्षात्राच्या पहिल्याच पावसाच्या तडाख्याने केळी व इतर पिकांचे प्रंचड नुकसान झाले आहे यामध्ये सरसकट पंचनामा करून नुकसान भरपाई देण्यात यावे अशा मागणीचे निवेदन तहसील कार्यालयात नायब तहसीलदार मारोती जगताप यांना शिवसेना जिल्हाप्रमुख बबन बारसे यांच्या प्रमुख उपस्थितीत निवेदन सादर करण्यात आले

यावेळी विधानसभा प्रमुख विश्वंभर पाटील पवार, उपतालुकाप्रमुख माणिक लोमटे, उपतालुकाप्रमुख बाबुराव कळणे, उप तालुका प्रमुख आनंदराव जाधव, शहरप्रमुख, अविनाश झमकडे, अंकुश मामीडवार, सचिन चंद्रे, साहेबराव चव्हाण, रणजित देशमुख वाडीकर, पांडू पाटील मोरे, बाळू चंद्रे, राजन वडे, कामाजी पाटील, किशन खतगावे, सोनू अरेपल्लू संभाजी गाडे यांच्यासह मोठ्या संख्येत शिवसैनिकांची उपस्थिती होती.

मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबासाहेब कांबळे पोलीस उपनिरीक्षक शिवाजी शिंदे यांच्या सह पोलीस कर्मचारी किशोर पाटील ,चंद्रशेखर मुंडे, अरविंद शिंगारपुतळे,विजय आलेवार , झुंझारे , आर सी बी प्लाटून ( पथक) यांनी चोक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# आजीचा खून करणाऱ्या नातवाला चार दिवसाची पोलीस कोठडी

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.११ जून -**

हिमायतनगर तालुक्यातील टेंभुर्णी येथील घटना घर बांधण्यासाठी बँकेचे घेतलेले कर्ज तसेच उधाऱ्या फेडण्यासाठी नातवाने आजीला ठार केल्याची घटना पोलीस तपासात समोर आली असून हिमायतनगर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी संयुक्त तपास करत गुन्ह्याची उकल केली. नातवाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून न्यायालयाने चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

हिमायतनगर तालुक्यातील टेंभूर्णी या गावात ७५ वर्षे वयोवृद्ध असलेल्या गयाबाई रामजी तवर उर्फ देवसरकर हिचा खून करुन अज्ञाताने दागिने व रोख रक्कम असा एकूण पावणेतीन लाख रुपयाचा ऐव पळविल्याची घटना दि. ३ जून ते ५ जून या कालावधीत घडली होती. सदर प्रकरणात हिमायतनगर ठाण्यात अज्ञात विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान पोलिसांनी घटनेच्या काळामध्ये टेंभूर्णी गावात कोण कोण येऊन गेले, गावातील कोणी नातेवाईक किंवा जवळचे काय काय विचारणा करत होते,कोणाच्या आचरणात बदल झाला का, मयताच्या विवाहित मुलींचे काही जमिनीचे किंवा आर्थिक वाद होते का, यासह अन्य बारीकसारीक गोष्टीचाही तपास करण्यात आला. मयत महिलेला तीन मुली असून त्या दिवशी सरसम व टाकळी येथे राहतात. त्या ठिकाणीही पोलिसांच्या पथकाने विचारणा केली. याच दरम्यान मयत महिलेची मोठी मुलगी शांताबाई पांडुरंग वानखेडे (दिघी) यांचा मुलगा बाळू वानखेडे हा संशयास्पद जाणवत असल्याने त्याची चौकशी केली. घरबांधकामासाठी बाळूने घेतलेल्या बँकेच्या कर्जासाठी बँकेचे अधिकारी घरी घेऊन गेल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

या पार्श्वभूमीवर बाळू वानखेडे याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता बँकेचे कर्ज व लोकांच्या उधाऱ्या फेडण्यासाठी आजीचा खून करुन दागिने व रोख रक्कम घेतल्याची कबुली बाळू वानखेडे यांनी दिली. या गुन्ह्यातील ५८ हजार रुपयाचे दागिने हस्तगत करण्यात आले असून आरोपीला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.



माहुर- भारतीय जनता पक्षाचे आधारवड तथा लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांची पुण्यतिथी मंगळवार ०३ जून रोजी माहूर तालुका भाजपसह इतर राजकीय पक्ष तसेच ओबीसी समाजातील नागरिक व तमाम माहूरकरांच्यावतीने दत्त चौक (टी-पॉईंट) येथे लोकनायकास विनम्र अभिवादन करण्यात आले.

# काँग्रेसच्या वतीने उद्या शहरात मशाल रॅली

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.११ जून -**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झालेल्या गैरप्रकारा विरोधात काँग्रेस पक्षाने आंदोलनात्मक कार्यक्रम हाती घेतला आहे. याचाच एक भाग म्हणून उद्या शुक्रवार दि.१३ रोजी शहर व जिल्हा काँग्रेसच्या वतीने खा. रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात सायंकाळी पाच वाजता मशाल रॅली काढण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार आदीसह इतर मान्यवरांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून दिली आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झालेल्या गैरप्रकारा बाबत सविस्तर विश्लेषण लेखाच्या माध्यमातून, लोकसभा विरोध पक्ष नेते राहुल गांधी यांनी प्रसारमाध्यमातून केले आहे. दरम्यान प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी विधानसभा निवडणुकीतील गैरप्रकारा विरोधात आंदोलनात्मक कार्यक्रम हाती घेतला आहे. याच अनुषंगाने नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने उद्या शुक्रवार दि.१३ रोजी खा.



रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात सायंकाळी पाच शहरात मशाल रॅली काढण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी यांना निवेदन दिल्यानंतर राष्ट्रपिता महात्मा गांधी पुतळ्यापासून मशाल रॅलीला सुरुवात होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादनानंतर रॅलीचा समारोप होणार आहे. अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, प्रदेश सरचिटणीस राजेश पावडे, एकनाथ मोरे, जिल्हा प्रवक्ता बापूसाहेब पाटील, शहर प्रवक्ता मन्तजिब, आदीजन उपस्थित होते.

# फिरोजपूर - हजूर साहिब नांदेड नवीन साप्ताहिक एक्सप्रेस : खा. डॉ. गोपछडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.११ जून -**

फिरोजपूर - हजूर साहिब नांदेड एक्सप्रेस ही नवीन साप्ताहिक एक्सप्रेस रेल्वे दि.१३ जून पासून सुरू करण्यात येत आहे.दर शुक्रवारी फिरोजपुर हून प्रस्थान करील. हीच रेल्वे दर रविवारी परतीचा प्रवास करील. दि. १५ जून रोजी हजूर साहिब येथून दुपारी ११:५० वाजता प्रस्थान करुन फिरोजपूर(पंजाब) कडे पहिला प्रवास प्रारंभ करील. या नवीन रेल्वेद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठवाड्याला विकासाची नवी भेट दिली आहे . अशा शब्दात खा. डॉ. अजित गोपछडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री स. रवनीत सिंघ बिट्टू यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली रेल्वे मंत्रालयाच्या वतीने फिरोजपुर हुजूर साहेब नांदेड नवीन साप्ताहिक रेल्वे दि. १३ जून २०२५ पासून सुरु करण्यात येत आहे. याबाबत खा. डॉ . अजित गोपछडे यांनी आपली प्रतिक्रिया माध्यमाकडे व्यक्त केली .ते म्हणाले की , या नव्या ट्रेनमुळे महाराष्ट्र आणि पंजाब यांच्यातील कनेक्टिव्हिटी वाढेल व विकासाला नवे प्रोत्साहन मिळणार आहे. दोन्ही राज्यातील प्रमुख धार्मिक स्थळांना जोडणाऱ्या या नव्या साप्ताहिक ट्रेनला मंजुरी मिळाल्यामुळे धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार असून महाराष्ट्रातील सर्व प्रवाशांना दिल्ली व पंजाबकडे जाण्यासाठी एक नवी ट्रेन उपलब्ध झाली आहे. तसेच, सैन्य दलातील जवानांना देशाच्या सीमेपर्यंत थेट पोहोचण्यासाठी या ट्रेनचा उपयोग होईल. या ट्रेन च्या मार्गावरील संबंधित क्षेत्राला आर्थिक लाभही मिळणार आहे.



उल्लेखनीय बाब म्हणजे, प्रवाशांच्या वाढत्या गर्दीचा विचार करता खा. डॉ. अजित गोपछडे यांनी दि. १० फेब्रुवारी २०२५ रोजी पंजाब आणि पटनासाहिबसाठी साप्ताहिक ट्रेनची मागणी रेल्वे मंत्रालयाकडे केली होती. याची दखल घेऊन केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि रेल्वे राज्य मंत्री स. रवनीत सिंघ बिट्टू यांनी विशेष लक्ष देऊन ही मागणी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

फिरोजपूर हजूर साहिब साप्ताहिक एक्सप्रेस ही नवीन रेल्वे दर शुक्रवारी फिरोजपूर जंक्शनहून श्री हजूर साहिबसाठी रवाना होईल. ही ट्रेन सुमारे २००० किलोमीटरचा प्रवास सुमारे ३८ तासांत पूर्ण करेल. ही ट्रेन फिरोजपुर कैन्ट येथून दुपारी १३:२५ वाजता प्रस्थान करुन पुढे फरिदकोट, भटिंडा जं, जाखल जं, जींद जं, रोहतक जं, दिल्ली सफदरजंग, फरिदाबाद, पलवल, मथुरा जं, आग्रा कैन्ट, ग्वाल्हेर जं, वीरांगना लक्ष्मीबाई झांसी, बीना जं, विदिशा, भोपाळ, इटारसी जं, खंडवा जं, मनमाड जं, छत्रपती संभाजीनगर, जालना, सेलु, परभणी, पूर्णा अशा प्रमुख स्थानकांवर थांबेल. पहाटे ३:३० वाजता हजूर साहिब नांदेड येथे आगमन होईल.

ही नवीन रेल्वे सेवा पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र या राज्यांतील अनेक महत्त्वाच्या धार्मिक केंद्रांना जोडून संपर्क मजबूत करेल. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि रेल्वे राज्यमंत्री स. रवनीत सिंघ बिट्टू यांचे राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी विशेष आभार मानले आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त...



### उजनी ग्रामपंचायतीचा पाच हजार अमृतवृक्ष लागवडीचा संकल्प

**औसा, दि.११ जून -**

आगामी काळातील भविष्याचा वेध घेऊन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी औसा तालुक्यातील उजनी येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने गावातच पाच हजार अमृतवृक्ष लागवडीचा संकल्प केला असून वटपोर्णिमेचे औचित्य साधून महिलांच्या हस्ते अंगणवाडी व परिसरात वृक्ष लागवडीस सुरुवात करण्यात आली आहे. उजनी गावात अमृतवृक्ष लागवड योजनेतून वड, चिंच, शिसम, करंज, पिंपळ, काशीद, लिंच, शिसू, सागवान अशा ५००० रोपांची वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. या संकल्पीय वृक्ष लागवडीचे उद्घाटन सरपंच युवराज गायकवाड, उपसरपंच योगीराज पाटील, खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष शेखर चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य मजहरखान पठाण, ग्रामपंचायत अधिकारी एस.एस. सय्यद, उषा गायकवाड, अनिता सुर्यवंशी बिभीषण देवकर, जुनेद शेख, बाळकृष्ण कदम यांच्या हस्ते करण्यात आले.



### धन्वंतरीत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकचा स्थापना दिन साजरा

**उदगीर, दि.११ जून -**

येथील धन्वंतरी आयुर्वेद महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिकचा स्थापना दिन १० जून हा प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजारोहण करून साजरा करण्यात आला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात डॉ. सायराम श्रीगिरे, डॉ. बालाजी कट्टेवार, डॉ. रविकांत पाटील, डॉ. अमोल पटणे, डॉ. प्रशांत बिरादार, डॉ. मयुरी ठाकूर हे व्यासपीठावर होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. प्राजक्ता जगताप, डॉ. स्नेहल पाटील, डॉ. दीपिका भद्रे, डॉ. प्रवीण बलुतकर, डॉ. अमोल पाटील, डॉ. श्रुती तिवारी यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी डॉ. प्रीती पतंगे, डॉ. शिवानी पाटील, डॉ. केतकी तरडे, डॉ. शिवप्रताप बिरादार, डॉ. स्वप्निल पाटील, डॉ. माधुरी बिरादार, डॉ. जयश्री भरकडे, डॉ. मनीषा कांबळे यांच्यासह महाविद्यालयातील डॉक्टर्स, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

### राजअहमद पठाण यांची जिल्हा शिवसेनेच्या सहसंघटकपदी नियुक्ती

**नळदुर्ग, दि.११ जून -**



शिवसेनेचे निष्ठावंत कार्यकर्ते राजअहमद पठाण यांची धाराशिव जिल्हा सहसंघटक (शिवसेना उबाठा) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी ही नियुक्ती अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, त्यांना धाराशिव व तुळजापूर तालुक्यांसाठी ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ही नियुक्ती पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व युवासेना प्रमुख आ. आदित्य ठाकरे यांच्या आदेशानुसार, धाराशिवचे खा. ओमराजे निंबाळकर आणि आ. कैलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीचे सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रांतून स्वागत व अभिनंदन केले जात आहे.

# शेतीचा बांध फुटला अन् माळेगावच्या शाळेत पाणीच पाणी!

## शैक्षणिक साहित्य पाण्यात; पोषण आहाराचे नुकसान | विद्यार्थ्यांनीच केली शाळा वाचवण्याची धडपड



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.११ जून -**

तालुक्यातील माळेगाव (जे) परिसरात सोमवारी पहाटे जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शेतशिवारात पाणीच पाणी झाले. शेतातील बांध फुटला आणि नियमितपणे वाहणारा पाण्याचा प्रवाह अचानकपणे बदलून जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात पाणी शिरले. शाळेच्या वर्गखोल्यांमध्येही पाणी शिरल्याने शैक्षणिक साहित्य पाण्यावर तरंगत होते. शिवाय, शालेय पोषण आहार, नवीन पुस्तकेही भिजली आहेत. सकाळी ११ वाजता ग्रामस्थांच्या उपस्थितीत केंद्र प्रमुखांनी पंचनामा केला.

माळेगाव प्राथमिक शाळेत पहिली ते आठवीचे १०५ विद्यार्थी शिक्षण घेतात. शाळेत तीन शिक्षक कार्यरत आहेत. उन्हाळी सुट्या असल्यामुळे शाळा बंद आहे. रविवारी मध्यरात्री व सोमवारी पहाटेच्या दरम्यान या भागात ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने आजूबाजूच्या शेतातील बांध फुटले आणि पाणी शाळेत शिरले.

सर्वच वर्गखोल्यांसह मैदानात जवळपास तीन ते चार फूट पाणी थांबल्याचे सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. यावेळी ग्रामस्थ, विद्यार्थ्यांनी शाळेकडे धाव घेतली. संरक्षक भिंतीला छिद्र पाडले असता काही वेळातच मैदानातील पाणी बाहेर निघाले.

यात वर्गखोल्यांत असलेले शालेय साहित्य, कागदपत्रे, शालेय पोषण आहाराचे तांदूळ भिजले असून यामुळे आर्थिक नुकसान झाले आहे.

### नवीन पुस्तकांची पोतेही भिजली...

शाळा सुरू झाल्यावर पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना नवीन पुस्तके देण्यासाठी आणून ठेवण्यात आली होती. मात्र पावसाचे पाणी वर्गात शिरल्याने नवीन पुस्तकेही पूर्णतः भिजली आहेत. सोमवारी सकाळी केंद्र प्रमुख डी.एम. शेख, मुख्याध्यापक विष्णुकांत कोलेवाड, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष अनिता जाधव, उपाध्यक्ष बाळू जाधव, सदस्य ज्योती पुट्ठे, दिनकर कंठमणी, उपसरपंच राजेंद्र आरीकर, रमेश जाधव, नागनाथ जाधव, गणेश पाटील, राजेश जाधव, भगवान जाधव यांच्या उपस्थितीत नुकसानीचा पंचनामा करण्यात आला.

### शाळा वाचवा म्हणत विद्यार्थ्यांची ओरड...

सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास शाळेत पाणी शिरल्याचे लक्षात आल्यावर परिसरातील विद्यार्थ्यांनी आमच्या शाळेत पाणी शिरले, शाळा वाचवा, अशी ओरड करीत ग्रामस्थांना गोळा केले. काही वेळात पाण्याला मार्ग काढण्यात आला. त्यानंतर वर्गखोल्यांमध्ये गाळमिश्रित पाणी होते, तेही स्वच्छ करण्यात आले. तिसरीचा विद्यार्थी देवांश जाधव, चौथीचा संभाजी कंठमणी, पाचवीचा शिवाजी पोतदार, कार्तिक गायकवाड, इयत्ता आठवीचे दीपक जाधव, संदीप बनसोडे, रोहित जाधव या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेसाठी मदत केली.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त चाकूरात ध्वजारोहण



**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.११ जून -**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त चाकूर येथे तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने ध्वजारोहन करण्यात आले.

चाकूर शहरातील बसस्थानका समोर असलेल्या आर.आर. प्रिंटर्स येथे राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे यांच्या हस्ते सकाळी १०.१० वा.प क्षाच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी चाकूर नगरपंचायतचे नगराध्यक्ष करिमसाहेब गुळवे, मिलिंद महालिंगे, बालाजी सूर्यवंशी, गंगाधर अक्कानवरु, यशवंत जाधव, राहुल सुरवसे, करीम डोंगरे, अनिल वाडकर, मधुकर कांबळे, विश्वनाथ एडके, शिवशंकर हाळे, जेष्ठ नेते अर्जुन मद्रेवार, नागोराव पाटील, गणपत नितळे, गणपत कवठे ॲड. संतोष गंभीरे, आबासाहेब बिडवे, शिवप्रसाद शेटे, हणमंत लवटे, प्रा.डॉ. भानुदास पवार, युनूस सय्यद, भुजंग शिंदे, बळीराम पाटील, खुदबोद्दीन घोरवाडे, शैलेश कदम, आय.डी. शेख, सूर्यकांत केंद्रे, बालाजी भोरे, देविदास होळदांडगे यांच्यासह चाकूर शहर व तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## वट पौर्णिमा वटवृक्ष रोपण करून साजरी करा : रेखा तरडे

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.११ जून -**

येथील संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात वटपौर्णिमेच्या निमित्ताने श्री गणेश शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव व प्राचार्या रेखाताई तरडे-हाके यांच्या हस्ते दहा वडाची रोपे लावण्यात आली. या कार्यक्रमात पर्यावरण संवर्धनाचा खूप महत्वाचे हे सांगताना महिलांनी वट पौर्णिमा वटवृक्षांचे रोपण करून साजरी करण्याचा सल्ला दिला.

याप्रसंगी नगरपरिषदेचे प्रकल्प अधिकारी साहेबराव शेवाळे, शहर समन्वयक राहुल चव्हाण, मुख्याध्यापिका आशा रोडगे, मुख्याध्यापिका मीना तोवर, रोकडोबा कुंडगीर, नंदकुमार मध्येवाड, सतीश साबणे, बब्रुवान कलाले, उमेश फुलारी, पद्माकर नळगिरे, विवेकानंद सुरनर आणि शीला तेलंगे यांच्यासह अनेक मान्यवर आणि महिला उपस्थित होत्या. सर्वांनी एकत्र येऊन वृक्षारोपणाच्या उपक्रमात




सहभाग घेतला आणि पर्यावरण रक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

महाराष्ट्र शासनाने राज्यात दहा कोटी वृक्ष लागवडीचा महत्त्वाकांक्षी संकल्प केला आहे. या संकल्पाला पाठबळ देत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. दत्तात्रय मठपती यांनी वटपौर्णिमेच्या निमित्ताने प्रत्येक शाळेत दहा वडाची रोपे लावण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत संत ज्ञानेश्वर विद्यालयाने हा उपक्रम यशस्वीपणे राबवला. यावेळी उपस्थित मान्यवरांचा रोप देऊन सत्कार करण्यात आला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजात पर्यावरण जागृती निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास प्राचार्या रेखाताई तरडे-हाके यांनी व्यक्त केला.

## जि.प.तील शिक्षिकेच्या नाट्यरुपी पुस्तकाची नववी-दहावीसाठी निवड

### राष्ट्रीय स्तरावर मोठा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.११ जून -**

लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील भादा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेत कार्यरत असलेल्या प्रेरणादायी शिक्षिका अनिता खडके यांनी शिक्षण क्षेत्रात आपल्या नावाचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या उमलती कळी फुलू द्या या नाट्यरूप पुस्तकाची निवड राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे (SCERT) यांच्या वतीने नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी संदर्भ साहित्य म्हणून करण्यात आली आहे. हे पुस्तक समग्र शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांच्या भावनिक, मानसिक व सामाजिक विकासात मोलाची भर घालणार आहे.



या नाट्यपुस्तकामध्ये किशोरवयीन मुलींना शिक्षण घेण्याच्या प्रवासात भेडसावणाऱ्या असुरक्षिततेच्या समस्येचे वास्तववादी चित्रण निर्भीडपणे करण्यात आले आहे. संवाद, पात्रांची मांडणी आणि नाट्यघटक वाचकांच्या मनाला चटका लावणारे असले तरी शेवटी या कथा सक्षमतेचा संदेश देतात. मराठीसह हिंदी, उर्दू आणि इंग्रजी भाषांमध्ये प्रकाशित होणारे हे पहिलेच शैक्षणिक नाट्यपुस्तक असून देशपातळीवर हा एक आगळा-वेगळा उपक्रम ठरला आहे. या पुस्तकाचे वितरण 'स्क्रेट' संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये होणार आहे.

अनिता खडके यांची शैक्षणिक वाटचाल ही नवोपक्रमशीलतेची साक्ष आहे. त्यांनी आजवर पाच वेळा राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला असून 'एक बी उद्यासाठी, भविष्यासाठी, जगण्यासाठी' या उपक्रमाची नोंद स्क्रेटच्या वेबसाईटवर झाली आहे. या कार्याची दखल घेत पद्मभूषण पद्मश्री डॉ. अण्णा हजारे व पद्मश्री राहीबाई पोपेरे यांच्या हस्ते त्यांना ३ जून २०२५ रोजी 'राष्ट्रीय बीजरत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

तसेच, अनिता खडके यांनी ९५ व्या भारतीय साहित्य संमेलनात पाच शैक्षणिक पुस्तकांचे प्रकाशन करून आपला वैचारिक ठसा उमटवला आहे. त्यांच्या नावावर पाच राष्ट्रीय शोध निबंध, पाच राष्ट्रीय लेख आणि विविध मासिकांत सात लेख प्रसिद्ध झाले आहेत. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी नाटक, लेखन, चित्रकला, एकपात्री अभिनय, नृत्य आदी माध्यमांतून विद्यार्थ्यांना विविध संधी




दिल्या आहेत.

त्यांच्या या प्रेरणादायी कार्याची दखल मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, तसेच गावकऱ्यांकडूनही घेतली जात असून, भादा गावासाठी व जिल्हा परिषदेच्या शाळेसाठी हे अभिमानाचे क्षण आहेत.

## शिरूर अनंतपाळ परिसरात वटपौर्णिमा उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.११ जून -**

शिरूर अनंतपाळ शहरासह तालुक्यातील गावांमध्ये मंगळवारी वटपौर्णिमा सण पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. परिसरातील वडाच्या झाडांखाली सुवासिनींची मोठी गर्दी दिसून आली. महिलांनी साजशृंगार करून वडाच्या झाडाभोवती सात फेऱ्या घेत मनोभावे पूजा केली व आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.



पुराणकथेनुसार सावित्रीने आपल्या निष्ठेच्या बळावर यमराजाकडून पती सत्यवानाचे प्राण वटवृक्षाखाली परत मिळवले होते. त्या घटनेच्या स्मरणार्थ प्रत्येक वर्षी जेष्ठ पौर्णिमेला वटपौर्णिमा साजरी केली जाते. ही परंपरा आजही पिढ्यानपिढ्या सुरू आहे.

या दिवशी महिलांनी जन्मोजन्मी हाच पती लाभावा, वाईट प्रवृत्तींवर चांगुलपणाचा विजय व्हावा, अशी प्रार्थना केली. पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करून, भक्तिभावाने हा सण साजरा करण्यात आला. सकाळपासूनच वातावरणात धार्मिक उत्साह आणि मांगल्याचं वातावरण पाहायला मिळालं.

## वटपौर्णिमेनिमित्त शेळगाव येथे ६५० महिलांचा साडी-चोळी देऊन सन्मान

### वृक्षारोपण संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.११ जून -**

चाकूर तालुक्यातील शेळगाव येथे ग्राम पंचायत कार्यालय शेळगावच्या वतीने वटपौर्णिमेच्या निमीत्ताने गावातील ६५० महिलांना उपविभागीय दंडाधिकारी मंजूषा लटपटे यांच्या हस्ते साडी-चोळी व वृक्ष भेट देउन सन्मान करून, वृक्षारोपण करण्यात आले.



शेळगाव येथील हा कार्यक्रम सरपंच नागीण दयानंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला असून, विस्तार अधिकारी (पं) अनंत पुट्टेवाड, पंचायत समिती चाकूर, तलाठी दत्ता तेली, ग्रामसेवक बी.एन.शिंदे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी अमोल कुमठेकर, नितीन जाधव, प्रसाद डूमणे, अमोल केदासे, ज्ञानेश्वर गवळी आदिंची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महीलांनी आरोग्य संभाळावे, मुलांच्या व मुलींच्या शिक्षणाकडे महिलांनी अधिक लक्ष्य द्यावे व लिंग भेदभाव न करता उच्च शिक्षीत बनवावे, तसेच प्रत्येक महीलेने एका वृक्षाचे रोपन करून संगोपन करावे ही काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी मंजूषा लटपटे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्तावना राजकुमार जगताप यांनी केले तर सर्व उपस्थितांचे आभार मनोजकुमार पाटील यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेळगाव ग्रामपंचायतीचे रोजगार सहाय्यक बापुराव माने, दयानंद पाटील, वसंत पाटील, दयानंद घुगे, मनोज घूमे, अंगणवाडी कार्यकर्ती ललीता पाटील, गंगासागर पांचाळ, संगीता कांबळे, सुरेखा भालके, अनिता पाखंडे, स्वाती राजुरे, सविता बेंदर्गे, शिवनंदा बोनंते, मुकुंद कस्तूरे, सोमनाथ हिंगणे, शरद पाटील, संगम हावा, गंगाधर घुमे, विवेकानंद घुगे, संतोष जगताप,व गावातील सर्व महीला नागरीक उपस्थित होते.

### सक्षम बनवण्यासाठी प्रयत्न करेन : सरपंच नागीण पाटील

राजकारण तात्पुर्ते कालमर्यादीत ठेवून महिलांना गावाच्या विकासासाठी व महीलांना सक्षम करण्यासाठी मी सतत कार्यरत राहीन. राजकारण तात्पुरते कालमर्यादीत ठेऊन गावच्या विकासाचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेऊन गावच्या हिताच्या कार्यासाठी मी सतत प्रयत्नशील असेन असे सरपंच नागीण पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## ओंकार साखर कारखाना युनिट नंबर २ निलंगाचा तोडणी; वाहतूक करार पूर्ण

### ठेकेदाराच्या खात्यावर डव्हान्सचा पहिला हप्ता जमा : चेअरमन बोत्रे

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.११ जून -**


तालुक्यातील अंबुलगा (बु) येथील डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साखर कारखाना लिमिटेड लिज ओंकार साखर कारखाना युनिट नं २ या कारखान्याने वाहतुकीचे करार पूर्ण केले असून स्थानिक व बाहेरील तोडणी वाहतूकदार यांच्या खात्यावर हंगाम २०२५-२६ च्या हंगामासाठी डव्हान्सचा पहिला हप्ता जमा केला आहे.



अंबुलगा बु. (ता. निलंगा) येथील शिवाजीराव पाटील निलंगेकर साखर कारखान्याने दोन गळीत हंगाम अतिशय यशस्वीपणे पूर्ण केले असून तिसऱ्या गळीत हंगामाची तयारी सुरू केली आहे सन २०२५-२६ हंगामाची तयारी कारखाना प्रशासनाकडून सुरू आहे. सध्या वाहतूक ठेकेदाराचे करार करणे सुरू असून कारखाना कार्यक्षेत्रातील व कारखाना बाहेरील ऊस वाहतूक वाहनाचे, बैलगाड्यांचे कराराची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. ज्या वाहतूक ठेकेदारांनी या कारखान्यासोबत करार केले आहेत अशा ठेकेदाराचे बँक खातेवर पहिला ऍडव्हान्स हप्ता जमा करण्यात आला आहे.

येत्या हंगामासाठी लागणारी तोडणी वाहतूक यंत्रणा ही सक्षम करारबध्द प्रक्रिया पूर्ण झाली असून

अंबुलगा साखर कारखान्याने मागील हंगामात २०२४-२५ मधील उस बिले, तोडणी-वाहतुकीची सर्व बिले वेळेत आदा केली आहेत. तसेच पुढील हंगाम २०२५-२६ ची स्थानिक व बाहेरील तोडणी वाहतुक यंत्रनणेची ॲडव्हान्स पहिला हप्ता वेळेवर दिल्यामुळे तोडणी, मजूर, वाहतूकदार व शेतकरी यांनी समाधान व्यक्त केले आहे. यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर, मुख्य शेतकी अधिकारी, ऊस पुरवठा, चिफ अकौंन्टट, चिफ इंजिनियर, चिफ केमिस्ट, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



यामुळे यंदाच्या हंगामात उच्चांकी गाळप होईल. अशी माहिती कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी दिली.

## बिडकर तलाव परिसरातील नाल्याची सफाई करा; अन्यथा आत्मदहन : बबन गावडे यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ जून -**

बिडकर तलावात नव्याने बांधलेल्या भवानी तिर्थकुंडाच्या मंदीराला जाताना रस्त्याच्या उजव्या बाजुस जे भक्त पार्किंगम धुन मंदीराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजुस एक भला मोठा नाला आहे. या नाल्यामध्ये जवाहर गल्ली, भांजी गल्ली, मंगळवार पेठ, भवानी रोड या भागातुन मोठया प्रमाणात येणारे पाणी त्या नाल्याव्दारे आराधवाडीकडे पास होते. परंतु सध्या हया नाल्यामध्ये कचरा पाचोळा पडलेली असून, गेलेली दोन ते तीन वर्ष हया नाल्यामधील पाला पाचोळा घाण कचरा काढण्यात आलेला नाही. यामुळे संबंधित नाला पुर्ण भरलेला असून, हा नाला चोकप झाल्यामुळे या परिसरातील येणारे पावसाचे व गटारातील पाणी जात नसल्यामुळे या परिसरातील नाल्या गटारीतील पाणी यांचा निचरा होत नाही. त्यामुळे सध्या तुळजापूर शहरामध्ये गटारी तुंबल्याचे दिसुन येत आहे.



याची गांभिर्यपुर्वक दखल घेवुन पाणी जाण्यासाठी नाला मोकळा करावा जेणेकरुन येणाऱ्या पावसाळयामध्ये या परिसरात पुरस्थिती निर्माण होऊ नये याची गांभिर्यपुर्वक दक्षता घ्यावी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस मीडिया प्रमुख बबन गावडे यांनी नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले असून या समस्याचे गांभिर्यपुर्वक लक्ष नाही घेतल्यास नगर पालिका परिसरात आत्मदहन करण्याचा इशारा सदरील निवेदनात दिला आहे.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## केंद्र सरकारच्या विरोधात काँग्रेसचा शनिवारी मशाल मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ जून -**

महाराष्ट्रातील नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुका संदर्भात काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी व काँग्रेस पक्षाने वेळोवेळी आक्षेप घेतलेले आहेत.

निवडणूक आयोगाच्या माध्यमातून झालेल्या गैरप्रकारा संदर्भात पक्षाच्या वतीने उपस्थित केलेल्या शंकांचे अद्यापही निराकरण केलेले नाही.

यासंदर्भात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून व माजी मंत्री अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रभर व धाराशिव जिल्ह्यामध्ये विधानसभा निवडणुकीत झालेल्या गैरप्रकार विरुद्ध काँग्रेस पक्षाने आंदोलनात्मक कार्यक्रम हाती घेऊन निवडणूक आयोग व केंद्र सरकारच्या विरोधात मशाल मोर्चा काढण्याचा निर्धार केला आहे.

शनिवार दि.१४ जून रोजी सायंकाळी ६ वाजता श्री तुळजाभवानी मंदिर महाद्वारापासून भवानी ज्योत घेऊन, आर्य चौक, कमान वेस, धाराशिव रोड, जुने बस स्टॅन्ड, गोलाई, छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चाचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे होणार आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### इटकळ व परिसरात वटपौर्णिमा उत्साहात साजरी

**इटकळ, दि.११ जून -**

तुळजापूर तालुक्यातील इटकळ व परिसरात वटपौर्णिमा सण मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला.पतीला दीर्घायुष्य लाभावे व जन्मोजन्मी हाच पती मिळावा म्हणून सुवासिनीने वडाची (वटवृक्ष) मनोभावी पूजा केली. ग्रामीण भागात सणवार यांना फार महत्व असते ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमा ही वटपौर्णिमा म्हणून साजरी करण्याची परंपरा आहे. सावित्रीने आपल्या पती सत्यवान यांचा प्राण परत आणण्यासाठी वटवृक्षाखाली बसून कठोर तपचर्या केली. त्यामुळे यम राजाला तिचा पती परत द्यावाच लागला अशी सत्यवान व सावित्रीची कथा आहे. दि.१० जुन रोजी इटकळ व परिसरात महिलांनी वडाच्या झाडाची पूजा केली. मराठमोळी साडी परिधान करून शृंगार करीत हातामध्ये पूजेसाठी लागणारे साहित्य घेऊन जाताना दिसत होत्या. यावेळी महिला एकमेकाला हळदी-कुंकू लावून वाण ही देत होत्या.

### ठाकूर यांच्याकडून सांत्वनपर भेट

**लोहारा, दि.११ जून -**

भारतीय जनता पार्टीचे नेते राहुल पाटील सास्तूरकर आणि माजी जि.प. सदस्य तथा सरपंच शितल पाटील



यांचे चिरंजीव नहुष राहूल पाटील यांच अपघातात निधन झाले आहे. दि.१० जून रोजी भाजपा नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी त्यांच्या लोहारा तालुक्यातील सास्तुर येथील निवासस्थानी जाऊन पाटील कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी राहुल पाटील, दौलत पाटील, हर्षवर्धन पाटील, माधव पवार, राजेंद्र पाटील, गणेश खरसडे, सिद्धेश्वर माने, इकबाल मुल्ला, नेताजी शिंदे, बालाजी चव्हाण, मोहन जेवळीकर, शाहुराज पाटील, किसन पवार, महादेव कोरे, श्रीमंत मनाळे, प्रविण मनाळे आदि उपस्थित होते.



### पीएचसी मध्ये नेत्र तपासणी शिबिर संपन्न

**अणदूर, दि.११ जून -**

डॉ. भालचंद्र स्मृती दिन पंधरवडा निमित्त प्रा.आ. केंद्र अणदूर येथे एकूण ३७ रुग्णांची नेत्र तपासणी डॉ.काटकर ए.एल. नेत्र चिकित्सा अधिकारी यांनी केली. पैकी १७ रुग्णांना नेत्र शस्त्रक्रियेसाठी जिल्हा रुग्णालय धाराशिव येथे पाठविण्यात आले. ४५ वर्षांवरील ९ लोकांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. तसेच युवराज होळे यांच्या सह ६ लोकांनी मरणोत्तर नेत्र दान करण्याचा संकल्प केला व त्यांनी फॉर्म भरून दिला. जास्तीत जास्त लोकांनी मरणोत्तर नेत्र दान करावे, असे आवाहन डॉ. विशाखा वडवळे वैद्यकीय अधिकारी प्रा.आ. केंद्र अणदूर यांनी केले. या शिबिरास डॉ. विशाखा वडवळे यांच्या मार्ग दर्शनाखाली व प्रा.आ. केंद्र अणदूर येथील सर्व आरोग्य कर्मचारी यांनी सहकार्य केले.



### शिंदे, आदलिंगे यांचा निवडीबद्दल सत्कार

**परंडा, दि.११ जून -**

सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे यांनी सावता परिषदेचे निष्ठावंत कार्यकर्ते बापूसाहेब शिंदे यांची मराठवाडा कार्याध्यक्ष व धनंजय आदलिंगे यांची धाराशिव युवक जिल्हाध्यक्षपदी निवड केल्याबद्दल दि.१० जुन मंगळवार रोजी परंडा येथे सावता परिषदेचे वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शिवाजी येवारे मुख्य संघटक सावता परिषद महाराष्ट्र राज्य, धोंडीराम मोहोळकर, अर्जुन सायकर, गटकुळस, राजु आलबत्ते उपस्थित होते.



### संत तुकाराम महाराजांच्या वंशजांनी घेतले तुळजाभवानीचे दर्शन

**तुळजापूर, दि.११ जून -**

संत तुकाराम महाराज यांचे १० वे वंशज हभप. सच्चीदानंद महाराज मोरे-देहूकर आणि ११ वे वंशज हभप. ऋषिकेश महाराज मोरे-देहूकर यांनी आज सहकुटूंब श्रीतुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. मंदिर संस्थानकडून त्यांचा देवीची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध देशपांडे व अभिजित तेरखेडकर उपस्थित होते.

# महाराष्ट्राबरोबरच जिल्ह्याच्या वाट्यालाही अभूतपूर्व निधी संकल्पसे सिद्धीतक झेप

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जून -**

यूपीएच्या १० वर्षाच्या सत्ताकाळात महाराष्ट्राच्या वाट्याला साधारणपणे १ लाख कोटी रुपये निधी मिळाला होता. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागील अकरा वर्षाच्या कार्यकाळात राज्याच्या वाट्याला आलेला निधी युपीए सरकारच्या दहापट म्हणजेच १० वर्षात १० लाख कोटी रुपये एवढा आहे. नरेंद्र मोदी यांच्यामुळे राज्याला ऐतिहासिक फायदा झाला आहे आणि महाराष्ट्राबरोबरच धाराशिव जिल्ह्याच्या वाट्यालाही अभूतपूर्व निधी मिळाला असल्याची माहिती मित्रचे अध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

भाजपाच्या प्रतिष्ठान भवन कार्यालयात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या ११ वर्षाच्या यशस्वी पुर्ततेबद्दल पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार पाटील बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात देशभरात झालेल्या अनेक अभूतपूर्व योजना, उपक्रम आणि विकासकामांचा आलेख त्यांनी उपस्थितांसमोर सादर केला. माता-भगिनींच्या आयुष्याला अधिक सक्षम करण्यासाठी नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दलही त्यांनी जिल्ह्यातील माता-भगिनींच्या वतीने नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

त्याचबरोबर केंद्र सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि धाराशिव जिल्ह्याच्या वाट्याला आलेल्या अनेक महत्त्वपूर्ण आणि भरीव बाबींची त्यांनी माहिती दिली. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम धाराशिव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात राबविण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सलग तीन वर्ष जिल्हा राज्यात अव्वल ठरला. जिल्ह्यातील दीड हजारपेक्षाही अधिक युवकांनी या उपक्रमाच्या माध्यमातून स्वतःचा नवा उद्योग सुरू केला आहे. त्यांच्या या उद्योगाच्या माध्यमातून स्वतःसह त्यांनी इतरांसाठीही रोजगाराच्या संधी निर्माण केल्या असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी सांगितले.

धाराशिव जिल्ह्यातील कौडगाव एमआयडीसीमध्ये तांत्रिक वस्त्रोद्योग निर्मिती प्रकल्प सुरू करण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधांना वेग आला आहे. देश पातळीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय टेक्निकल टेक्सटाईल मिशन हे धोरण जाहीर केले आहे. त्याचा फायदा आपल्या जिल्ह्यातील कौडगाव एमआयडीसीलाही होणार आहे. त्यामुळे देशातील आणि परदेशातील इच्छुक गुंतवणूकदारांना मोठ्या प्रमाणात परतावा आणि वेगवेगळ्या सोयी सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यातून जिल्ह्यात दहा हजाराहून अधिक रोजगार निर्मिती उपलब्ध होणार असल्याचा विश्वासही आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

पर्यटन, रेल्वे त्याचबरोबर रस्ते विकास, उड्डाणपूल, पर्यायी रस्ते, महामार्गावर विद्युत व्यवस्था, विविध प्रकारचे अनुदान अशा अनेक बाबींच्या माध्यमातून जिल्ह्याला केंद्र सरकारच्या माध्यमातून अभूतपूर्व असा निधी प्राप्त झाला आहे. एकट्या धाराशिव जिल्ह्यात ६,५०० कोटी रूपयांची २४ राष्ट्रीय महामार्गाची कामे मंजूर केली आहेत. त्यातील ११ कामे पूर्ण झाली असून उर्वरित १३ कामे सध्या प्रगतीपथावर आहेत.

धाराशिवकरांची गरज व मागणी लक्षात घेवून तुळजापूर-नळदुर्ग, तुळजापूर-औसा, धाराशिव शहरातील बाय पास, तुळजापूर बाय पास, सिंदफळ व येडशी येथे उड्डाणपूल, या कामांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पंतप्रधान नरेंद्र



मोदी यांच्या नेतृत्वाखाली मंजूरी दिली.

सूरत-चेन्नई महामार्ग, सोलापूर-धुळे, सोलापूर-उमरगा असे महामार्गाचे जाळे धाराशिव जिल्ह्यात आज निर्माण झाले आहे. युपीए सरकारच्या काळात धाराशिव जिल्ह्यात केवळ १९५ किलोमीटर लांबीचा राष्ट्रीय महामार्ग होता. आज त्याच राष्ट्रीय महामार्गाची जिल्ह्यातील लांबी ४१८ किलोमीटर एवढी झाली आहे. मागील केवळ ११ वर्षांच्या काळात धाराशिव जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी २२३ किलोमीटर इतकी वाढली आहे.

प्रधानमंत्री विमा योजनेच्या माध्यमातून खरीप २०२० पासून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जवळपास २००० कोटी रुपये मिळाले असून संकल्प केला आणि तो सिद्धीस नेला म्हणून तर संकल्प से सिद्धीतक हा मूलमंत्र घेऊन देशातील आणि राज्यातील आपले सरकार सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी अखंड कार्यरत असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

## प्रेमसंबंधासाठी धमकी; तरुणीची आत्महत्या

### दोन जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जून -**

तुळजापूर येथील पोलिस वसाहतीत एक हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. १५ वर्षीय सारिका बिजली शिकारे या अल्पवयीन मुलीने आत्महत्या केल्याच्या प्रकरणात तिच्यावर प्रेम करण्यासाठी जबरदस्ती व धमकी दिल्याचा आरोप करत दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सारिका शिकारे ही मूळची राजेश नगर ढोकी (ता. धाराशिव) येथील असून, हल्ली तिचे वास्तव्य पोलीस कॉर्टर, एस.टी. कॉलनी, तुळजापूर येथे होते. ३१ मे रोजी सकाळी ४ वाजता राहत्या घरी तिने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी तिच्या आईने १० जून रोजी तुळजापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

फिर्यादीत म्हटले आहे की, ओंकार कांबळे व नगिना शशिकांत पांडागळे (दोघेही रा. कांक्रबा, ता. तुळजापूर) यांनी सारिकाला वेळोवेळी बोलावून ओंकार कांबळे याच्याशी प्रेम संबंध ठेव व लग्न कर, अन्यथा सोशल मिडियावर बदनामी करीन तसेच माझ्याकडील पिस्तुलाने तुला मारून टाकीन, अशी धमकी दिली. या मानसिक व भावनिक छळामुळे त्रस्त होऊन सारिकाने आयुष्य संपवले, असे तिच्या आईचे म्हणणे आहे.

या गंभीर प्रकरणाची दखल घेत तुळजापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणामुळे तुळजापूर शहरात खळबळ माजली असून, अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या मानसिक छळाच्या घटनांकडे प्रशासन गंभीरतेने पाहत आहे. पोलीस पुढील तपास करत असून संबंधित आरोपींवर कठोर कारवाई होण्याची मागणी होत आहे.

## ८ पुजाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ जून -**

श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करून थुंकणाऱ्या आठ पुजाऱ्यांवर मंदिर संस्थानने कडक कारवाईची भूमिका घेतली आहे. संबंधित पुजाऱ्यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली असून, तीन महिन्यांसाठी मंदिरप्रवेश बंदीची कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

संबंधित पुजाऱ्यांनी मंदिर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ खाऊन थुंकल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे आढळून आले आहे.

## उबाठा गटाच्या उपजिल्हाप्रमुखपदी डॉ. कानडे

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.११ जून -**

अणदूर नगरीचे सुपुत्र श्री श्री गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष तथा अणदूर ग्रामपंचायत सदस्य डॉ. जितेंद्र कानडे यांची शिवसेना (उबाठा) गटाच्या धाराशिव जिल्हा उपजिल्हाप्रमुख पदी (तुळजापूर विभाग कार्यक्षेत्र) निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीचे अणदूर परिसरातून स्वागत होत आहे.



डॉ. जितेंद्र कानडे हे गेली अनेक वर्षे शिवसेना उबाठा गटाचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत. त्यांचे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय कार्य अणदूर परिसरात मोठ्या प्रमाणात असून त्याचा निश्चित फायदा येणाऱ्या काळात पक्षाला मिळणार आहे. ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर असताना झालेली ही निवड पक्षाला फायदेशीर ठरणार आहे. ४ टर्म अणदूर ग्राम पंचायत सदस्य असलेले डॉ कानडे हे बेरजेचे राजकारण करतात. त्यांच्या निवडीचे सर्व सामान्य शिवसैनिकांनी स्वागत केले आहे.

ही निवड शिवसेना (उबाठा)प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार करण्यात आली आहे.

## विद्युत पोल शिफ्टिंग काम आधी; टेंडर नंतर

**दै. तरुण भारतच्या बातमीनंतर नळदुर्ग नगरपालिकेचे टेंडर अखेर रद्द...**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ जून -**

नळदुर्ग नगरपालिकेने आधीच पूर्ण झालेल्या कामासाठी नंतर टेंडर काढल्याचा प्रकार उघड झाल्याने अखेर संबंधित निविदा रद्द करण्यात आली आहे. दै. तरुण भारतने दि.९ जून रोजी प्रसिद्ध केलेल्या टेंडरपूर्वीच काम पूर्ण, नळदुर्ग न.प.च्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह या वृत्तानंतर प्रशासनावर दबाव निर्माण झाला होता. त्यानंतर ६ जून रोजी काढलेले विद्युत पोल शिफ्टिंग आणि नवीन पोल बसविण्याचे टेंडर नगरपालिकेने रद्द केले असल्याचे अधिकृतपणे जाहीर करण्यात आले आहे.



टेंडरपूर्वीच काम पूर्ण; नळदुर्ग न.पा.च्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.८ जून -
नळदुर्ग नगरपालिकेच्या कारभारात आणखी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ६ जून रोजी हुतात्मा निलय्या स्वामी उद्यानातील पोल शिफ्टिंग व नवीन विद्युत पोल बसविण्याच्या कामासाठी टेंडर प्रक्रिया सुरू करण्यात आली असताना, संबंधित काम आठवडाभर आधीच पूर्ण झाल्याचे समोर आले आहे. यामुळे हे काम बेकायदेशीर व नियमबाह्यपणे केल्याचा आरोप होत असून, संबंधित अधिकाऱ्यांच्या चौकशी व कारवाईची मागणी होत आहे.
नगरपालिका प्रशासनावर सध्या प्रशासकाचा कारभार असून, गेल्या साडेतीन वर्षात नागरिकांनी विकासाच्या आशा बाळगल्या होत्या. मात्र याऐवजी शहरात गरज नसलेल्या ठिकाणी कोट्यवधी रुपये खर्चून कामे केली जात असून, खऱ्या गरजांच्या ठिकाणी दुर्लक्ष होत असल्याचे
विशेष म्हणजे, वीज वितरण कंपनीची परवानगी आवश्यक असलेल्या अशा जोखमीच्या कामाती नियम झुगारले गेले. जर परवानगी घेण्यात आली असेल, तर टेंडर प्रक्रिया का सुरू केली गेली? आणि परवानगी नसेल, तर हे काम कोणी व कोणाच्या आदेशाने केले? या सर्व गोष्टींची चौकशी होणे अत्यावश्यक आहे.
काम आधी, टेंडर नंतर अशी विचित्र पद्धत स्वीकारणारी नगरपालिका राज्यात दुर्मिळ असावी, अशी टीका होत आहे. त्यामुळे धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांनी याप्रकरणी तात्काळ चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी नागरिकांची जोरदार मागणी

हुतात्मा निलय्या स्वामी उद्यान परिसरातील विद्युत पोलचे शिफ्टिंग आणि नवीन पोल बसविण्याचे काम आधीच पूर्ण झाल्याची माहिती असूनदेखील, त्याच कामासाठी टेंडर निघाले होते. या प्रकारामुळे प्रशासनाचा नियमनशून्य व आंधळा कारभार समोर आला आहे. नगरपालिकेने टेंडर रद्द केले असले, तरी हे काम कोणाच्या सांगण्यावरून आधी केले गेले, त्याला संबंधित विभागांनी परवानगी दिली होती का, हे अनेक प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत.

या प्रकारात विद्युत विभाग प्रमुख आणि वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात आहे. वीज वितरण कंपनीच्या कार्यालयासमोरच हे काम झाले असूनही त्यांनी परवानगी दिली का, किंवा त्यांच्या माहितीतच हे काम झाले का, याचा खुलासा आवश्यक आहे. शिवाय, कामासाठी आवश्यक शुल्क व मंजुरी घेतली होती का, याची चौकशी करणे गरजेचे आहे.

या प्रकारात दोषींवर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांमध्ये आणि काही सामाजिक संघटनांमध्ये तीव्र होत आहे. नगरपालिकेने केवळ टेंडर रद्द करून जबाबदारी झटकू नये, तर दोषींवर कठोर कारवाई करून अशा प्रकारांना लगाम घालावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## दिव्यांग व जेष्ठ नागरिकांसाठी करणार शिबिरांचे आयोजन : खा. राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जून -**

धाराशिव लोकसभा मतदार संघातील दिव्यांग व ६० वर्षे वयोमर्यादा पूर्ण केलेल्या जेष्ठ नागरिकांसाठी मोफत अत्याधुनिक साहित्य वाटपासाठी तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमासाठी भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या दिव्यांगजन स्वशक्तीकरण विभागाकडून अधिकृत मंजुरी प्राप्त झाली असून, याचे आयोजन खासदार ओम राजे निंबाळकर यांच्या पुढाकाराने करण्यात येत आहे.



या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पूर्व नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीकरीता आ. कैलास पाटील उपस्थित होते.

## मर्डी येथे डंपर-मोटारसायकल अपघातात युवकाचे दुर्दैवी निधन

### पत्नी-मुलीस गंभीर दुखापत...

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.११ जून -**

तुळजापूर तालुक्यातील कुंभारी गावातील रहिवासी हुसेन आल्लावद्दिन मुलानी (वय ३४ वर्षे) यांचा मर्डी-होनसळ रस्त्यावर डंपर आणि मोटारसायकलच्या भीषण अपघातात जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना सोमवार, ९ जून रोजी सायंकाळी ५ ते ६ च्या दरम्यान घडली.

हुसेन मुलानी हे त्यांच्या पत्नी व मुलीसह मर्डी येथील नातेवाइकांच्या कार्यक्रमातून परत येत असताना, मर्डीपासून अंदाजे एक-दोन किलोमीटर अंतरावर समोरून भरधाव वेगात आलेल्या डंपरने त्यांना जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की हुसेन यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्या पत्नी व मुलीस गंभीर मार लागला असून त्यांच्यावर सोलापूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



मंगळवार, १० जून रोजी कुंभारी येथील कब्रस्तानात शोकाकुल वातावरणात हुसेन यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, तीन मुली व भाऊ असा मोठा परिवार आहे.

**पालकमंत्री प्रताप सरनाईक आज नळदुर्ग दौऱ्यावर...**

## ऐतिहासिक किल्ल्याची पाहणी, विकास कामांना गती देण्याची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ जून -**

राज्याचे परिवहन मंत्री आणि धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक हे १२ जून रोजी नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्याला भेट देणार आहेत. या दौऱ्यानिमित्त नळदुर्ग शहर व परिसरातील नागरिकांमध्ये अपेक्षांचे वातावरण तयार झाले असून, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी होत आहे.

पालकमंत्री सरनाईक यांच्या हस्ते पूर्वी थाटामाटात उद्घाटन करण्यात आलेल्या नळदुर्ग उपजिल्हा रुग्णालयाच्या अर्धवट स्थितीकडे त्यांचे लक्ष वेधले जाणार आहे. अत्याधुनिक यंत्रणा आणि सुविधा असूनही रुग्णालयातील अनेक जागा रिक्त असल्यामुळे हे रुग्णालय केवळ प्राथमिक उपचारापुरते मर्यादित राहिले आहे. विशेषतः भुलतज्ज्ञाच्या अनुपस्थितीमुळे कोणतीही शस्त्रक्रिया न होणं ही गंभीर समस्या बनली आहे. अपघातग्रस्त रुग्णांना सोलापूरला हलवावे लागते, ज्यामुळे वेळेअभावी जीवितहानी होण्याची शक्यता वाढते.



स्थानिक नागरिक, समाजसेवक आणि आरोग्य क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी पालकमंत्र्यांनी या रिक्त जागा तातडीने भराव्यात व रुग्णालय पूर्ण क्षमतेने कार्यरत करावे, अशी ठाम मागणी केली आहे.

तसेच, पालकमंत्र्यांनी पूर्वी मंजूर केलेल्या ध्वज स्तंभाच्या कामाला देखील अद्याप सुरुवात झालेली नाही. ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्याच्या संवर्धनासाठी हा स्तंभ महत्त्वाचा असून, त्याचे काम त्वरित सुरू करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

नळदुर्ग शहरातील बेरोजगारीही एक गंभीर प्रश्न आहे. परिसरात कोणतेही उद्योगधंदे नसल्याने तरुणाई उदासीन झाली असून अनेक तरुण व्यसनांच्या आहारी जात आहेत. उद्योगधंद्यांना चालना देऊन रोजगार निर्मितीसाठी पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

याशिवाय, शहरातील अतिक्रमणाच्या प्रश्नावर देखील पालकमंत्र्यांनी लक्ष घालून जिल्हाधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणी होत आहे.


## जाहीर प्रगटन

धाराशिव जिल्ह्यातील विशेषत : तुळजापूर तालुका व आसपासच्या परिसरातील तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, जाहीर नोटिस देणार पंडित सुदाम चव्हाण रा. चव्हाणवाडी, ता. तुळजापूर, धाराशिव हे चव्हाणवाडी येथील रहिवासी असून त्यांची पत्नी कौशल्या या मयत आहेत. त्यांना प्रदीप हा मुलगा असून तो व त्याची पत्नी माधुरी हे नोटीस देणार पंडित यांचेपासून वेगळे राहतात. आमचे अशील पंडित यांची मौजे काटगांव, ता. तुळजापूर शिवारातील जमीन गट क्र. १८०/अ/१ क्षेत्र ०२ हे ०० आरव गट क्र. १८१/ड/५ क्षेत्र ०२ हे ५७ आर या शेतजमीनी मालकी व कब्जेवहिवाटीच्या आहेत . सदर जमीन नोटिस देणार यांची स्वसंपादित मिळकत असून सदर शेत जमिनीचा मी एकमेव मालक कब्जे वहिवाटदार आहे. मौजे चव्हाणवाडी ग्रांमपंचायत हद्दीतील ग्रामपंचायत घर क्र. ३०२ व ६० या तसेच तुळजापूर न.प. हद्दीतील घरजागा ज्याचा न.भू.क्र. ३०३ असा आहे या सर्व जागा नोटीस देणार यांचे स्वसंपादित मिळकती आहेत.

परंतु नोटीस देणार यांचे वृद्धापकाळाचा गैरफायदा घेऊन फसवणूक करून त्यांचा मुलगा प्रदीप चव्हाण याने बनावट संमतीपत्र तयार करून घेतले व वरील सर्व मौजे काटगांव, ता. तुळजापुर शिवारातील जमीन गट क्र. १८०/अ/१ क्षेत्र ०२ हे ०० आर व गट क्र. १८१/ड/५ क्षेत्र ०२ हे. ५७ आर या शेतजमीनीची स्वतःचे नावे नोंद करून घेतली. सदरचे संमतीपत्र व त्यावरून घेण्यात आलेली महसूली नोंद बनावट व बेकायदेशीर असून माझे हक्कावर बंधनकारक नाहीत. याबाबत आमचे अशील यांनी महसूल दफ्तरी वेळोवेळी आक्षेप दिलेला आहे तसेच सदर संमतीपत्र बनावट असलेबाबत व त्यावरून घेतलेल्या नोंदी कमी करणेबाबत उपविभागीय अधिकारी तथा अध्यक्ष जेष्ठ नागरिक न्यायाधिकरण तुळजापूर यांचेकडे अर्ज दिलेला असून सदर वाद न्यायप्रविष्ट आहे.

सदर शेत जमिनीची मालकी व कब्जा अद्यापपावेतो आमचे अशील पंडित सुदाम चव्हाण यांचा आहे. परंतु ७/१२ झालेल्या चुकीच्या नोंदीचा गैरफायदा घेऊन मुलगा प्रदीप व त्याची पत्नी माधुरी सदर मिळकत विक्री किंवा अन्य प्रकारे हस्तांतरित करण्याचे बेतात असल्याचे समजते. तसेच तुळजापूर न.प. हद्दीतील घरजागेवर बनावट कागदपत्रा आधारे खाजगी फायनान्स कंपनी कडून कर्ज घेतलेले असल्याचे समजते. सदर कर्ज देणार यांचा व सदर कर्जाचा माझ्याशी वा माझे मिळकतीशी कसलाही हक्क संबंध नाही वा सदर गैरप्रकारास मी बांधील नाही. परंतु आमचे आशिलाचा मुलगा प्रदीप व त्याची पत्नी माधुरी हे सदर मिळकती गुंड व भांडखोर व्यक्तींना विक्रीचे उद्देशाने दाखवत आहेत व अश्या व्यक्तींपासून आमचे आशिलाचे जीवितास व मालमत्तेस धोका आहे. आमचे आशिल वयोवृद्ध असून सदर मिळकत ही आमचे आशिलाचे उपजीविकेचे व वास्तव्याचे एकमेव साधन आहे.

तरी या जाहीर नोटिसद्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, मौजे काटगांव, ता. तुळजापूर शिवारातील जमीन गट क्र. १८०/अ/१ क्षेत्र ०२ हे. ०० आर व गट क्र. १८०/ड/५ क्षेत्र ०२ हे ५७ आर बाबत कोणीही कसल्याही प्रकारचा खरेदी, विक्री, गहाण, दान, करार, मदार, इत्यादि कोणत्याही प्रकारचे हस्तांतर, नोंदणीकृत वा अनोंदणीकृत दस्त करू नये, केल्यास तो आमचे हक्कावर बंधनकारक राहणार नाही व आम्हाला नाइलाजाने आपणाविरुद्धा कायदेशीर कार्यवाही करावी लागेल.

**सबब हे जाहिर प्रगटन दिले**
**दि.११/०६/२०२५**
**तर्फे,**
**ॲड. ए.ए. देशमुख,**
**प्रसाद कॉलनी, धाराशिव.**

**जाहीर प्रगटन देणार**
**पंडित सुदाम चव्हाण**